# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२९/३/२००७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २९/३/२००७ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा गुरुवार दिनांक २९/३/२००७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. सोनवणे नथु काशीराम | २३. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ३. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | २४. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ४. | श्री. गायकवाड दिलीप | २५. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | २६. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| ६. | श्री. उमाप रामदास राघोजी | २७. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | २८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | २९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ३०. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १०. | श्री. पवार नाना आनंदा | ३१. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| ११. | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ३२. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १२. | श्री. निकम शांताराम ओंकार | ३३. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| १३ | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ३४. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| १४. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ३५. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| १५. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ३६. | श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग |
| १६. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ३७. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| १७. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ३८. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| १८. | श्री. जेसवानी सतरामदास पुनमदास | ३९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| १९. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ४०. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| २०. | श्रीमती खिलनानी भावना रवी | ४१. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २१. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल | ४२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २२. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास | ४३. | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |
| | | ४४. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा. उपमहापौर :—१. श्री. तलरेजा विनोद चंदीराम, व मा.सदस्य / सदस्या २. श्रीमती जावळे संगिता रमेश, ३. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह, ४. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर, ५. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन), ६. श्री. वाघे शामु बाबु, ७. श्रीमती मोकल सीमा चंदाराम, ८. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ९. श्री. मोकल चंदाराम विठोबा, १०. श्री. एडके गणपत गोविंद, ११. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, १२. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, १३. श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र, १४. श्रीमती आहुजा निता प्रकाश, १५.श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा, १६. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, १७. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास, १८. श्री. साधवानी मोहन रहंदोमल, १९. डॉ. (श्रीमती) साधवानी जया , २० श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग, २१. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ, २२. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश, २३. श्री. पाटील विश्वनाथ गौतम, २४. श्री. भालेराव गौतम यशवंत, २५. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास, २६. श्री. मनवानी अन्नु (सनमुख), २७. श्रीमती पंजाबी दिपा नारायण, २८. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, २९. श्रीमती माखिजा किरण लखी, ३०. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज, ३१. श्री. बठीजा संजय रामचंद्र, ३२. श्रीमती दासानी मिनु राजकुमार, ३३. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ३४. श्री. वधारिया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

मा.आयुक्त श्री. सदाशिव कांबळे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या स्थानी श्री. नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते. तसेच खाली दर्शविलेले अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
२. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
३. श्री. एस.के.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
४. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. बी.सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता
६. श्री.मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग
७. श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
८. श्री. तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक

सांयकाळी ५.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**सचिव साहेब, मा. महापौर महोदया, अदयाप सभागृहात आलेल्या नाहीत. यास्तव आजच्या या सभेचे कामकाज चालविण्यासाठी श्री. किशोर वनवारी यांची पीठासीन अधिकारी म्हणुन निवड केली जावी.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–**श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या प्रस्तावास मी अनुमोदन देतो.

---

**महासभा ठराव क्र:** ३० अ | दिनांक:–२९/३/२००७

**सुचकाचे नाव:–श्री. जमनादास पुरस्वानी**

**अनुमोदकाचे नाव :–श्री. लाल पंजाबी**

ही महासभा सभेचे कामकाज चालु ठेवण्यासाठी श्री. किशोर वनवारी यांची सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते मंजूर**

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :–** प्रथम वंदे मातरम् होईल. कृपया आपापल्या आसनाशेजारी उभे रहावे.

मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी, मा. सदस्या श्रीमती कमला शर्मा, श्रीमती सुजाता रिजवानी, मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी, श्री. होशियारसिंह लबाना, श्री. राजु जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ झाल्या आणि श्री. किशोर वनवारी हे आपल्या आसनावर आसनस्थ झाले.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मा. महापौर महोदया, ही १० वी वेळ आहे. या १० सभांमध्ये मा. आयुक्त साहेब उपस्थित नाहीत. या सभागृहामध्ये ही वारंवार मागणी करण्यात आली आहे की, महासभेच्या वेळेत आयुक्तांनी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे. परंतु ही अतिशय दुर्भाग्य पुर्ण गोष्ट आहे की, जेव्हा कुणी नगरसेवक आयुक्तांना भेटण्यासाठी जातो तेव्हा आयुक्तांना वेळ नसते. व महासभेमध्ये लोकप्रतिनिधींच्या प्रश्नांना उत्तरे देण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा आयुक्त रजेवर जातात. अशाप्रकारची घटना एका वेळेस होवु शकते, दोन वेळा होवु शकते, वारंवार दहादा कशी होवु शकते? ज्या दिवशी महासभा असते त्याच दिवशी त्यांची आई, बहिण किंवा ते स्वत: आजारी पडतात. व जेव्हा महासभेची बैठक टळते तेव्हा ते कामावर येतात. महापौर महोदया, हा संपुर्ण सभागृहाचा अपमान आहे. या महासभेत आयुक्तांच्या या वर्तनाबाबतीत एक निंदा प्रस्ताव पारीत केला पाहिजे. व तो महाराष्ट्र शासनाकडे पाठवुन अशी शिफारस करण्यात यावी की उल्हासनगर महानगरपालिकेस जो आयुक्त देण्यात आला आहे त्यास आपल्या जबाबदारीची काही जाणीव नाही. आज उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रशासन तंग झाले आहे. आमच्या उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारच्या समस्या डोके वर काढत आहेत. महिन्यातुन एकदा महासभेची बैठक होते. परंतु त्या बैठकीतही आयुक्त उपस्थित नसतात. काय महानगरपालिकेच्या बैठकीकडे दुर्लक्ष करण्याचा कुण्या आयुक्तास अधिकार आहे? मी सभागृहास अशी विनंती करतो की, ज्या कारणासाठी दोन–तीन वेळा महासभेची बैठक स्थगित केली होती व पुढील महासभेत आयुक्तांनी उपस्थित राहिले पाहिजे असे महासभेचे निर्देश असल्याचे मा. सचिवांनी मा. आयुक्तांच्या कानी घालावे याकामी सचिवांना निर्देशित करण्यात आले होते. परंतु तरीही आयुक्तांनी पुन्हा तीन दिवसाची रजा घेतली. व त्याचवेळेस मी सांगितले होते की पुढील महासभांमध्ये आयुक्त येतील असे मला वाटत नाही व माझी ती शंका खरी ठरली. ही १० वी महासभा आहे. १० महासभांना आयुक्त उपस्थित नाहीत. जर त्यांनी तीन दिवसाची रजा घेतली आहे तर या सभेंची कारवाई तीन दिवसानंतर चालविली जावी. एक आयुक्त बेजबाबदारपणे वागत आहे त्याबाबतीत आजच्या महासभेमध्ये निंदा प्रस्ताव पारीत केला पाहिजे. शहरामध्ये कित्येक प्रकारच्या समस्या आहेत त्यांच्याबाबतीत आम्ही येथे आवाज उठवित असतो. व त्यावर जे निर्णय घेतले जातात त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त नसतात. आयुक्त नसतील तर महासभा चालविण्याचे औचित्य तरी काय आहे? या पाच वर्षामध्ये आम्ही काय केले? कोणते मुद्दे उपस्थित केले? कोणत्या मुद्दयांवर तासन्तास चर्चा झाली. तासन्तास चर्चा झाल्यानंतर मिनिटांमध्यें लिहिली गेली. त्याच्यावर कार्यवाही काय–काय झाली? ही आमची शेवटची महासभा आहे. पाच वर्षाचा ताळेबंद मी येथे मांडु इच्छित आहे. आज शहरामध्ये कच–याचे ढिग पडले आहेत. पाण्याची समस्या आहे. कोणत्याही विभागामध्ये कोणतेही काम होत नाही. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अतिशय खराब आहे. मालमत्ता कराची योग्य प्रमाणात वसुली होत नाही. असे कित्येक मुद्दे आहेत. ज्या मुद्दयांवर महासभेमध्ये वेळोवेळी आवाज उठविण्यात आला आहे. महापौर महोदया, जर आपणाकडे वेळ असेल तर आपण आमचे ऐकुन घ्यावे. मी आपणांस संबोधुन बोलत आहे. व जर आपणाकडेही वेळ नसेल तर मी बसुन घेतो. जनप्रतिनिधी या नात्याने या सभागृहाची भावना लक्षात घेण्याचा प्रयत्न करा. जोपर्यंत आयुक्त येत नाही तोपर्यंत ही सभा स्थगित केली जावी व आयुक्तांना ताकिद देण्यात यावी की ज्यावेळी पुढील महासभा असेल त्यावेळी आपण उपस्थित राहीले पाहिजे व पाच वर्षाच्या ताळेबंदावर चर्चा झाली पाहिजे. स्मशानामध्ये लाकडे मोफत मिळतील की मोफत दिली जात आहेत काय? महानगरपालिकेच्या भाजीमार्केटमधील जे गाळे दयायचे होते ते देण्यात आले आहे काय? वाहतुक सुरळीत करायची होती ती सुरळीत झाली काय? ना फेरीवाला क्षेत्रातुन हातगाडया उचलायच्या होत्या त्या उचलल्या जात आहेत काय? अशा किती समस्या आहेत? महासभेमध्ये तासन्तास चर्चा झाली त्यातुन परिणाम काय निघाला? या महापालिकेचे प्रशासन निद्रीस्त आहे. या प्रशासनामध्ये जबाबदारी स्विकारण्यास कुणी तयार आहे किंवा नाही? मी सभागृहास अशी विनंती करेन की, ही महासभा स्थगित केली जावी. व पुढील महासभेत आयुक्तांनी उपस्थित राहणे बंधकारक केले जावे. व आयुक्तांच्या आचरणाबाबतीत निंदा प्रस्ताव पारीत केला पाहिजे. धन्यवाद ।

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–मा. महापौरजी, व सहकारी हो, आजची ही विशेष महासभा आहे. ही महासभा बोलावण्याची आम्ही नोव्हेंबर डिसेंबरमध्ये मागणी केली होती निश्चीत अशी तारीख मला आठवत नाही. आम्ही मागणी केल्यानंतर आचारसंहिता लागु झाली. जी सभा बोलविण्यासाठी पहिले काही विलंब झाला असेल त्यानंतर आचारसंहिता लागु झाली त्यामुळे सभा आयोजित केली नाही. व आज २९ मार्च रोजी ही सभा आयोजित करण्यात आली आहे. मला असे वाटते की, हे तिन्ही मुद्दे अतिशय गंभीर व संवेदनशिल आहेत. व शहराच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे मुद्दे आहेत. पहिला जो विषय आहे, मिळकत कराचे दर कमी करण्याबाबतचा. व त्यानंतरचा दुसरा जो विषय आहे अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी जो दंड आकारला जात आहे तो कमी

करण्याबाबतचा मिळकत करात कपात करण्याबाबत या आगोदर सुध्दा आम्ही ठराव पारीत केला होता. शासनाकडुन तो रद्द करण्यात आला होता. त्यानंतर आम्ही विचार केला की, कोणत्याही परिस्थितीत मिळकत कराचे दर कमी झाले पाहिजे. व हा विषय २९ मार्च रोजी महासभेत येणे हे काही योग्य वाटत नाही. कारण की हा वित्तीय वर्षाचा शेवटचा दिवस आहे. व हे सर्व धोरणात्मक निर्णयाचे विषय आहेत. मध्यंतरी सुभाष देसाई आमच्या बरोबर होते. व शिवसेना भाजपाचे काही लोक श्री. रामानंद तिवारी यांच्याकडे गेले होते. याबाबत श्री. हरदास माखिजा यांना सुध्दा सांगण्यात आलेले होते. श्री. रामानंद तिवारी यांनी आम्हांस सांगितले की, अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करण्यासाठी जो दंड आकारला जात आहे तो कमी करण्यासाठी महासभेचा एक ठराव शासनाकडे आला पाहिजे. आम्ही वेगवेगळया पक्षांनी तेथे निवेदने दिली आहेत. परंतु त्यांचे म्हणणे असे होते की, निवेदनानुसार सरकार चालत नाही. याबाबत आपला एक ठराव आला पाहिजे. व मला असे वाटते की, हा जो ठराव आहे तो कोणत्या प्रकारे असला पाहिजे. खासकरुन या विषयाबाबत सर्व संमती असली पाहिजे. मिळकत कराचे दर कमी तर झाले पाहिजेत परंतु ते कसे करावेत. आमच्याकडे दोन–तीन प्रस्ताव आहेत. गुजरात मधील सरकारने केला होता तसा एक प्रस्ताव जसे की चाळीस चौरस मिटरपर्यंत एक हजार रुपये दंड ४० मिटरपासुन १०० मिटरपर्यंत सात हजार रुपये दंड आणि एकशे एक चौरस मिटरपेक्षा जास्त असेल तर जास्तीत जास्त १० हजार रुपये दंड. व दुसरा एक असा प्रस्ताव होता की जसे महाराष्ट्र शासनाने बाजरभावानुसारचा प्रस्ताव दिला आहे, यानुसार सरकारकडे आम्ही कोणता प्रस्ताव दयावा याबाबतीत विचार करावा लागेल. यासाठी आपण सर्व संमती घेतली तर अतिशय चांगले होईल. व तसेही २००२ मध्ये निवडून आलेल्या सदस्यांचा आजचा शेवटचा दिवस व क्षण आहे व मला असे वाटते की, हे धोरणात्मक निर्णय नव्याने निवडुन आलेल्या सदस्यांनी घेतले तर अधिक चांगले होईल. यासाठी माझी सूचना होती जेव्हा आम्ही अनौपचारीक बैठक घेत होतो तेव्हा सर्वांची अशी इच्छा होती की हे धोरणत्मक निर्णय निवडून आलेल्या नव्या सदस्यानीं घेतले तर अधिक चांगले होईल. यासाठी माझी अशी सुचना आहे की हे धोरणात्मक निर्णय निवडून आलेल्या नविन सदस्यांनी घेतले तर अधिक चांगले होईल. आजच्या सभा सुचनेवरील हे विषय वगळण्यात यावेत. याबाबत निवडून आलेल्या नव्या सदस्यांनी विचार करावा. जसे श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले की आजच्या सभेत आयुक्त सुध्दा नाहीत जेव्हा आयुक्त महासभेत नसतात तेव्हा ते आपला बचाव करण्यासाठी सांगतात की मी त्या सभेत नव्हतो. ठरावावर कार्यवाही न करण्यासाठी कारणे शोधतात. यासाठी माझी विनंती आहे की, हे विषय पुढील महासभेत यावेत. व त्या सभेसाठी आयुक्तांनी उपस्थित असणे अतिशय महत्वाचे व आवश्यक आहे.

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**</u>मा. महापौर महोदया, श्री. दिलीप लालवानी व श्री. लाल पंजाबी यांनी जे म्हटले ते बरोबर आहे. जोपर्यंत चुक सुधारण्याची आपणांस संधी आहे तोपर्यंत चुक सुधारली पाहिजे. दंड आकारणी कशी असली पाहिजे यासाठी महासभेपुढे प्रस्ताव आला होता. ती आकारणी शासनाकडुन आलेली असल्यामुळे काही लोकांनी विरोध केला नसला तरी आम्ही त्यास विरोध केला होता. अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याचा शासनाचा जो उद्देश आहे तो सफल होणार नाही असेही म्हटले होते. म्हणुन या प्रस्तावाच्या बाबतीत पुन्हा चुक होता कामा नये. श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, एक विषय अर्थसंकल्पावर परिणाम करतो तर दुसरा विषय धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचा आहे. त्यामुळे या दोन्ही विषयावर संशोधन झाले पाहिजे. व दंड आकारणी चा जो विषय आहे त्याबाबत मध्येच मी जेव्हा अनाधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याची मोहिम चालु होती तेव्हा आम्ही त्या संदर्भात नगर विकास विभागाचे प्रधान सचिव श्री. रामानंद तिवारी यांच्याकडे श्री. सुभाष देसाई साहेबांबरोबर गेलो होतो व त्यांना आम्ही सांगितले होते की, अनाधिकृत बांधकामे नियमित का होत नाही? अनाधिकृत बांधकामे नियमित करुन घेण्याची ही संधी आहे या संधीचा फायदा लोक का घेत नाहीत? लोक या मोहिमेत सामिल का होत नाहीत? त्यावेळी त्याची कारणे सांगण्यात आली की ही जी दंड आकारणी आहे ती खुपच जास्त आहे. म्हणजेच आता जर एखादया बांधकामाची किंमत दोन लाख रुपये आहे तर दंड आकारणी सुध्दा जवळ जवळ तेवढीच होत आहे त्यामुळेच लोकांकडुन याकामी प्रतिसाद मिळत नाही. त्यावेळी त्यांनी सांगितले की जर असे असेल तर याबाबतीत आमच्याकडे काहीतरी प्रस्ताव यावयास पाहिजे होता. आजपर्यंत आमच्याकडे कुणी संपर्क साधला नाही. व सांगितले नाही की, ही जी दंड आकारणी केली आहे ती जास्त आहे. ती कमी केली जावी. त्यानंतर आम्ही हा प्रस्ताव ठेवला होता परंतु तो येता–येता बराच विलंब झाला आहे. तिसरी सार्वत्रिक निवडणूक होवुन दोन महिने झालेले आहेत. या दोन महिन्याच्या अंतरामध्ये थोडीशी उदासिनता आली आहे. महासभेमध्ये सुध्दा कमी लोकप्रतिनिधी उपस्थित आहेत. म्हणुन जेव्हा पुर्ण संख्या बळाने लोकप्रतिनिधी उपस्थित राहतील तेव्हा या प्रस्तावावर विचार मंथन करतील. जो वास्तविक प्रस्ताव आहे जो शासनाकडे मान्यतेसाठी पाठविता येईल व जो लोकांना परवडेल. त्या बैठकीच्या दरम्यान जी चर्चा झाली त्यावेळेस मी त्यांना एक प्रश्न केला होता की, उल्हासनगरमधील ज्या निर्वासीतांना महाराष्ट्र शासनाने किंवा भारत सरकारने

१३ रुपये किंवा जास्तीत जास्त १६ रूपये या हिशोबाने जागेचा किंवा सनदेचा दर ठेवला आहे. हाच दर २००४ पर्यंत होता. उप–विभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडुन सनद मिळत होती. परंतु ८५ च्या अगोदरची जी बांधकामे आहेत जी फक्त बेकायदेशीर आहेत त्यांना आज ३६०० रुपये प्रति चौरस मिटर प्रमाणे दंड आकारला जात आहे. म्हणजेच २००४ या वर्षापर्यंतचा १३ रुपये प्रति चौरस मिटरचा दर कुठे आणि १९९५, ९६ किंवा त्या अगोदरच्या बांधकामासाठी २६०० रुपये प्रति चौरस मिटर जागेचा भाव हा जो फरक आहे तो अतिशय जास्त आहे आणि चुकीचा आहे. १३ रुपये प्रति चौरस मिटर हा जो दर ठेवण्यात आलेला आहे तो निर्वासीतांसाठी ठेवण्यात आलेला आहे. व शासनाने हा जो एक विशेष कायदा केला आहे तो सुध्दा निर्वासीतांसाठीच तर एका ठिकाणी एक व दुस–या ठिकाणी एक तर हे सुध्दा आम्ही स्विकृत केले होते परंतु एक तर दंड आकारणी जास्त , जमिनीची जी किंमत आहे जसे की १३ रुपये प्रति चौरस मिटर होती ती सुध्दा नाही. परंतु २६०० रुपये सुध्दा नाही. याच्यामधील काहीतरी तडजोड निघाली पाहिजे. अशी आम्ही विनंती केली होती आणि ती त्यांनी मान्य केली होती. व अशा प्रकारचा प्रस्ताव आला पाहिजे किंवा आमच्याशी संपर्क साधला पाहिजे. आमच्याकडे जर कुणी आले नाही तर आम्ही विचार करणार कसा? यासाठी एक भरीव असा प्रस्ताव तयार करुन सविस्तर विचार मंथन करुन शासनाकडे पाठविला पाहिजे. मी या दोघांच्या मताशी सहमत आहे. आजची ही सभा स्थगित करुन या विषयांबाबत निवडुन आलेल्या सदस्यांनी विचार करावा किंवा या विषयांवर विस्ताराने संशोधन करुन प्रस्ताव तयार करावा व तो शासनाकडे पाठविण्यात यावा. व दुसरा विषय अर्थसंकल्पावर परिणाम करणारा असल्याने यावर संशोधन होणे जरुरीचे आहे. धन्यवाद ।

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :–</u>मा. महापौरजी, दुस–या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या आम्हां सदस्यांचा आजचा सभेचा शेवटचा दिवस आहे. आमचे जे नविन सहकारी महानगरपालिका निवडणूकांमध्ये निवडुन आले आहेत त्या सर्वांचे मी अभिनंदन करतो आणि शुभेच्छा देतो. त्यांच्या खांदयावर शहराची फार मोठी जबाबदारी आहे. व मला पुर्ण खात्री आहे की जबाबदारी ते समजुन घेतील व येणा–या पाच वर्षामध्ये शहर विकासाचे ते कामे करतील. व ज्या संवेदनशिल विषयाबाबत विरोधी पक्ष नेता श्री. धनंजय बोडारे, भाजपाचे वरीष्ठ सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी ज्या सुचना केल्या आहेत मी त्यांचा पुर्णपणे आदर करतो. परंतु एक गोष्ट आपण विसरता कामा नये. मुंबई उच्च न्यायालयाने उल्हासनगर शहरवाशियांना अठरा महिन्याची मुदत दिली होती या मुदतीमध्ये आपण आपले अनाधिकृत बांधकाम नियमित करुन घ्या. याबाबत महाराष्ट्र शासनाने जो एवढा मोठा निर्णय घेतला तो जो घेतला नसता तर संपुर्ण शहर उध्वस्त झाले असते. या गोष्टीचा सुध्दा आपणांस विचार केला पाहिजे. मी या सभेच्या माध्यमातुन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. आमदार श्री. विलासरावजी देशमुख, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. पवार साहेब, महाराष्ट्राचे संपुर्ण मंत्रीमंडळ खास करुन नामदार राजेश टोपेजी, विधानपरिषदेचे उपसभापती नामदार डावखरे साहेब, उल्हासनगर शहराचे आमदार पप्पु कालानी, शहराच्या महापौर श्रीमती ज्योती कालानी, विधान परिषदेमधील आमचे काही सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवानी, श्री. गुरुमुख जगवानी, श्री. रामनाथ मोतेजी, श्री. नितीन गडकरी, श्री. उध्दव ठाकरेजी, श्री. अनंत तरेजी या सर्व मोठ मोठया नेतांचा मी शहराच्या वतीने आभार व्यक्त करु इच्छितो. या सर्व लोकांनी आपली ताकद लावुन हे शहर वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु जे काम व्हावयास पाहिजे होते ते झाले नाही. या गोष्टीकडे आपण लक्ष दिले पाहिजे. आता आता मला माहित पडले आहे की, बांधकामे नियमित करण्यासाठी सादर केलेल्या प्रकरणातील जवळ जवळ दोनशे प्रकरणे नकारात्मक पत्रासह परत आली आहे. त्यांची काही कारणे आहेत. मला यातील काही तांत्रिक ज्ञान नाही. प्रकरण निकाली काढण्यामध्ये कोणत्या प्रकरणात काय कारण दिले आहे? मला असे वाटते की आपल्या महानगरपालिकेचे जे नगरचनाकार आहेत त्यांनी या गोष्टीचा खुलासा करावा की नगरविकास विभागाकडुन एक पत्र आहे आहे. शहरातील ज्या खास मुद्दयाबाबत आपली नेते मंडळी लढत होती. त्याबाबतचे ते पत्र आहे. त्यात लिहिले आहे की, कोणतीही इमारत नियमित करण्यासाठी त्याइमारतीमध्ये जिना, पॅसेज व बाल्कनी जी आहे तिचे क्षेत्र त्यामध्ये घेतले जावु नये. या एक मुदयामुळे ब–याचशा केसेस निघुन जात होत्या. याबाबतीत मी विचारु इच्छितो काय ते पत्र नगरविकास विभागाकडुन आपल्या महानगरपालिकेत पोहोचले आहे? काय आमच्या शहरातील आर्किटेक्टना त्याची माहिती मिळाली आहे किंवा नाही? मला असे वाटते की, आमच्या नगररचनाकारांनी याबाबीचा खुलासा केला तर त्यापुढे मी आणखी बोलु शकेन.

<u>श्री. अ.पा.गुरगुळे (नगररचनाकार):–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त, श्री. हरदास माखिजा साहेबांनी आता जो मुद्दा उपस्थित केला बाल्कनी व पॅसेजचे क्षेत्र वगळण्याबाबतचे शासनाकडुन अदयाप कोणतेही पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले नाही. याबाबतीत शासनाकडुन कोणतेही स्पष्टीकरण मिळाले नाही.

मा. सदस्य श्री. हरदास मखिजा :— परंतु मला जे माहित पडले आहे त्यानुसार असे समजते की, ....................
..............................................................................................................................

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मा. महापौरजी, नगररचनाकारांकडुन मी या गोष्टीचा खुलासा मागु इच्छितो की, वर्तमानपत्रामध्ये नेहमी छापुन येते की, बांधकाम नियमित करुन घेण्यासाठी फॉर्म भरण्याची मुदत ३१ मार्च पर्यंत आहे ते खरे आहे काय? कारण लोकांना असे वाटते की, ३१ मार्च पर्यंतच फॉर्म घेतील त्यानंतर घेणार नाहीत असे काही आहे काय?

श्री. अ.पा.गुरगुळे (नगररचनाकार):—शासनाकडुन असा कोणताही खुलासा आलेला नाही. ती जी ३१ तारीख निश्चित केली आहे ती जिल्हाधिकारी साहेबांनी निश्चित केली आहे. कारण की ३१ तारखेपर्यंत जर प्रकरणे सादर झाली तर पुढील दोन महिन्यामध्ये ती आम्ही निकाली काढु शकु.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—जेव्हा आपण याबाबतची नोटिस बजावली होती त्यावेळेस आपण तारीख लिहिली होती काय?

श्री. अ.पा.गुरगुळे (नगररचनाकार):—आर्डिनंन्स वटहुकूमांच्या हिशोबाने साठ दिवसामध्ये ..........................

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— मी ते नाही विचारत जेव्हा याबाबतच्या नोटिसा देण्यात आल्या त्यावेळेस लोकांना आपण हे सांगितले होते काय की ३१ मार्च पर्यंतच आपण अर्ज करु शकतात. ही तारीख आपण नागरीकांना सांगितली होती काय?

श्री. अ.पा.गुरगुळे (नगररचनाकार):—होय ३१ मार्च ही तारीख सांगितली होती.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—वर्तमानपत्रामध्ये अशी काही जाहिरात करण्यात आली होती काय असल्यास कोणत्या वर्तमानपत्रामध्ये अशी जाहिर सुचना प्रसिध्द केली होती ते दाखवा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— हे खरे आहे, जेव्हा गौल मैदान शेजारी एका इमारतीचे निष्कासन होत होते तेव्हा असे सांगण्यात येत होते की, अनाधिकृत बांधकाम नियमित करुन घेण्या कामी भरावयाच्या फॉर्मची मुदत संपली आहे. याबाबतची शेवटची तारीख कोणती आहे त्याबाबत आयुक्तांनी वर्तमानपत्रामध्ये मोठया प्रमाणावर प्रसिध्दी दिली पाहिजे. घरी पत्र पाठविले व सांगितले की ३१ तारीख फॉर्म भरण्याची शेवटची तारीख आहे तर हे चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—फॉर्म भरण्याची शेवटची तारीख कोणती आहे ते लोकांना कसे माहित पडेल?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—नगररचनाकार साहेब, मला हे सांगा की ३१ मार्च ही फॉर्म भरण्याची शेवटची तारीख आहे याबाबत महानगरपालिकेने मोठया प्रमाणात वर्तमानपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द केली आहे काय? होय किंवा नाही सांगा.

श्री. अ.पा.गुरगुळे (नगररचनाकार):—३१ मार्च ही शेवटची तारीख आहे याबाबत वर्तमानपत्रामध्ये कोणतीही प्रसिध्दी दिलेली नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—३१ मार्चनंतर आपण अर्ज स्विकाराल किंवा नाही?

श्री. अ.पा.गुरगुळे (नगररचनाकार):—स्विकारु ना, स्विकारु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—स्विकाराल ना? ठिक आहे.

**मा. महापौर :—**या तिन्ही विषयाबाबत सभेचे असे मत आहे की, ते आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यांत यावे. व हे तिन्ही विषय सर्व संमतीने आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. १ :—** उल्हासनगर शहरात घरपट्टी दर कमी करणे

**विषय क्र. २:—** उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याकरीता आणि तत् संबंधित किंवा तद्नुषंगित कायदयात व संबंधित नियमात दंड आकारणी कमी करण्याच्या दृष्टीकोनातून शासनास सुधारणा सुचविणे.

**विषय क्र. ३:—** उल्हासनगर शहरातील कचरा वाहतुक ठेकेदार मे. ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग यांचा करार रद्द करणे.

**प्रस्तावना**

१. उल्हासनगर शहरात घरपट्टी दर कमी करणे

२. उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याकरीता आणि तत् संबंधित किंवा तद्नुषंगित कायदयात व संबंधित नियमात दंड आकारणी कमी करण्याच्या दृष्टीकोनातून शासनास सुधारणा सुचविणे.

३. उल्हासनगर शहरातील कचरा वाहतुक ठेकेदार मे. ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग यांचा करार रद्द करणे.

वरील तिन्ही प्रस्ताव हे धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचे व महापालिकेच्या अर्थसंकल्पावर परिणाम करणारे आहेत. सध्या अस्तित्वात असलेल्या महासभेची मुदत लवकरच संपृष्टात येणार असल्याने या तिन्ही विषयांबाबतचा निर्णय नव्याने निवडुन आलेल्या सदस्यांच्या महासभेने घ्यावा असे प्रस्तावित.

**विशेष महासभा ठराव क्र:** ३२ **दिनांक:—२९/३/२००७**

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी
अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव उपरोक्त तिन्ही प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाजातुन वगळण्यास मान्यता देत आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :—** ही सभा समाप्त. यानंतरची जी सभा आहे ती सुरु करण्यांत येईल.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१५/५/२००७

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १५/५/२००७ रोजीच्या
विशेष महासभेचे इतिवृत्त.

## वि—१

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा मंगळवार दिनांक १५/५/२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

२. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३६ | श्री.एडके गणपत गोविंद |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३८ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३९ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४० | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ८ | श्री. यादव रामसागर जनार्दन | ४१ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४२ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४३ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४४ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १२ | श्री. विजय खंडु सुपळे | ४५ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४६ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४७ | श्री. शेखर केशव यादव |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४९ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५० | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५१ | श्री. किशोर जग्यासी |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २० | श्री. राजू जग्यासी | ५३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २१ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५५ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २३ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी | ५७ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २५ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ५८ | श्री. मोहन साधवाणी |
| २६ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५९ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २७ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६० | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २८ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६१ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २९ | श्री. लाल पंजाबी | ६२ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३० | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६३ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३१ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६४ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३२ | श्रीमती शकुंतला पाटील | ६५ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३३ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६६ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३४ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६७ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र, २. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ३. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ४. श्री. लालबिहारी बुझारत यादव, ५. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, ६. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, ७. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई).

आयुक्त श्री. सदाशिव कांबळे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या स्थानी श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त, (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते. तसेच खाली दर्शविलेले अधिकारी सभेस हजर होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

९. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
१०. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
११. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
१२. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
१३. श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
१४. डॉ. के. आर. खरात, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१५. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१६. श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
१७. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१८. श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पा.पु.
१९. श्री. सेल्वन, उप–अभियंता, पा.पु.
२०. श्री. सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग
२१. श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी
२२. श्री. तुकाराम तारदाळकर, मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी, लघुलेखक
२. कु. शकुंतला गावित, लघुलेखक
३. श्री. तानाजी पतंगराव, लिपिक

दुपारी ३.२० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u> मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब तसेच सचिव साहेब, सभेचे कामकाज चालु करण्यापुर्वी मी दोन शोक प्रस्ताव मांडु इच्छितो. उल्हासनगर शहरातील प्रख्यात कोनार्क कंपनीचे भागीदार, जेष्ठ समाजसेवक व सेवादल कॉंग्रेसचे पुर्व संघटक सचिव श्री. नानीक सुखेजा यांचे दि. १२/५/२००७ रोजी निधन झाले आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेतील पुर्व नगरसेवक श्री. नारायण पंजाबी यांची मुलगी श्रीमती रोशनी मनिष वाधवा हीचेही दिनांक १४/५/२००७ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. या दोघांना महापालिकेच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात यावी असा मी प्रस्ताव देत आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया श्रध्दांजलीसाठी मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर शहरातील प्रख्यात कोनार्क कंपनीचे भागीदार, जेष्ठ समाजसेवक व सेवादल कॉंग्रेसचे पुर्व संघटक सचिव श्री. नानीक सुखेजा यांचे दिनांक १२/५/२००७ निधन झाले आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री. नारायण पंजाबी यांची मुलगी श्रीमती रोशनी मनिष वाधवा हीचे दिनांक १४/५/२००७ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. २० अ** **दिनांक:—१५/५/२००७**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. नानीक सुखेजा व श्रीमती रोशनी मनिष वाधवा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—** मा. महापौरजी, मा. उप—महापौरजी, माझ्याकडे एक प्रस्ताव आलेला आहे. आपले नगरसेवक श्री. गणपत एडके व दुसरे श्रीमती जयश्री सुर्वे यांचे पती श्री. सुनिल सुर्वे यांची प्रकृती ठिक नाही. श्री. गणपत एडके यांना हृदयावरील शस्त्रक्रीयेसाठी काही आर्थिक मदत पाहिजे आहे. यासाठी असा प्रस्ताव आहे की, आपले दरमहाचे जे मानधन आहे त्यातील एक महिन्याचे अर्ध्ये अर्ध्ये मानधन या दोघांना आर्थिक मदत म्हणुन देण्यात यावे.

**सदस्या श्रीम. सुरेखा वेलकर :—** मा. महापौर महोदया याबाबतचे एक पत्र मी सभागृहास सादर करीत आहे.
उल्हासनगर महानगरपालिकेच्या वार्ड क्र. ३८ मधीन नगरसेवक श्री. गणपत एडके यांना हृदय विकाराचा त्रास जाणविल्याने त्यांनी वैद्यकिय तपासणी केली असता हृदयाचे वॉल निकामी झाल्याने बदली करण्याच्या सुचना वैद्यकिय अधिका—यांनी दिल्या आहेत. सदरचे ऑपरेशन करीता अंदाजित रक्कम रुपये २२५०००/— इतका खर्च अपेक्षित आहेत. नगरसेवक श्री. एडके यांची आर्थिकस्थिती हालाखीची असल्याने त्यांना सर्व सन्माननिय नगरसेवकांचे मानधनातून प्रत्येकी ३०००/— मदत दिल्यास त्यांचे हृदयाचे वॉल बदलणेचे ऑपरेशन करणे शक्य होईल तरी कृपया त्यांना आर्थिक मदत मिळणेसाठी सहकार्य करावे ही विनंती.

**महापौर :—** हा विषय विशेष महासभेमध्ये आणता येणार नाही. तो यानंतरच्या चार वाजता होणा—या सर्वसाधारण महासभेत आणता येईल.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याकरीता आणि तत् संबंधित किंवा तद्नुषंगित कायदयात व संबंधित नियमात दंड आकारणी कमी करण्याच्या दृष्टीकोनातून शासनास सुधारणा सुचविणे.

------------------------------------------------------------

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u> आजच्या विशेष महासभेचा जो विषय आहे तो अतिशय महत्वपुर्ण असा विषय आहे. या विषयाबाबत संपुर्ण उल्हासनगर शहराच्या वतीने महाराष्ट्र शासनाचे तसेच मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानतो. या विषयासाठी सर्व राजकीय पक्षाच्या नेते मंडळींनी आम्हांला जे सहकार्य दिले त्या नेते मंडळींमध्ये भाजपाचे जेष्ठ नेते श्री. नितिन गडकरीजी, आमदार श्री. कपिल पाटील, शिवसेनेचे श्री. सुभाष देसाई साहेब, कॉग्रसचे श्री. संजय दत्त या सर्व नेते मंडळींनी उल्हासनगर शहर वाचविण्यासाठी आणि हा अध्यादेश काढण्याकामी सहकार्य केले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. आम्ही काही दिवसापुर्वी श्री. रामानंद तिवारी साहेबांना भेटलो होतो त्यावेळेस त्यांना आम्ही लोकांनी सांगितले होते की, उल्हासनगर मधील अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याकामी अध्यादेशामध्ये जो दंड दर्शविला आहे तो अतिशय जास्त आहे. त्यावेळेस त्यांनी सांगितले होते की, शासनाने सदरचा दंड कमी करण्याबाबत आपणाकडुन आम्हांस अदयापपर्यंत कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. त्यावेळेस आम्ही विचार केला की, याबाबत महासभेमध्ये विषय आणु. याबाबतीत आपणांस निर्णय घेतला पाहिजे. व शासनास याबाबतचे एक विनंती पत्र दिले पाहिजे की, जी दंड आकारणी सुचविली आहे ती कमी केली पाहिजे. याबाबत आम्ही जेव्हा राज्यशासनाच्या मंत्री महोदयांकडे तसेच अधिका–यांकडे जेव्हा जात होतो तेव्हा ते नेहमी सांगत की आम्ही उल्हासनगरसाठी एवढा चांगला अध्यादेश काढला आहे. परंतु आपले शहरवाशी त्याचा फायदा घेत नाहीत. तेव्हा आम्ही सर्वांनी एकत्र बसुन एक निर्णय घेतला की, आपण सर्व लोक याबाबत शहरामध्ये एक मोठे चांगले वातावरण तयार करु. याबाबत आपले जे काही अधिकारी आहेत त्यांनी व आयुक्त साहेबांनी चांगले सहकार्य दिले. व गेल्या एक–दोन महिन्यामध्ये जे वातावरण तयार केले त्याचा परिणाम असा झाला की, ८५५ अनाधिकृत इमारतीपैंकी ब–याचशा इमारतीधारकांनी आपली अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करुन घेण्यासाठी अर्ज सादर केले आहेत. व आजच्या तारखेपर्यंत जवळ–जवळ ९९ टक्के लोकांनी आपले अर्ज सादर केले आहेत. याबाबत वेळोवेळी जे नागरीक आम्हांला भेटत ते असे सांगत की, अनाधिकृत बांधकाम नियमाधीन करुन घेण्यासाठी जो दंड आकारला जात आहे तो अतिशय जास्त आहे तो कमी करण्यासाठी आपण काहीतरी करा. बांधकामे नियमाधीन करुन घेण्यासाठी जो प्रतिसाद मिळत नव्हता त्याचे सर्वात मोठे हेच कारण होते. हा कायदा तयार करण्यामागे जो उद्देश होता तो असा होता की, या शहराचा जो इतिहास आहे तो असा की हे शहर १९४७ नंतर सिंध प्रांतातुन आलेल्या शरणार्थीसाठी वसविलेले शहर आहे. म्हणुन या शहराची जी ओळख आहे ती शरणार्थीचे शहर या रुपाने आहे. आणि जेव्हा हे शहर निर्माण झाले तेव्हा येथे नगरपालिका किंवा महानगरपालिका अस्तित्वात नव्हती. या शहरात जी नगरपालिका आली ती १९६२ मध्ये आली. आणि त्यानंतर १९७४ मध्ये शहर विकास आराखडा तयार करण्यात आला. म्हणजेच अगोदर शहर वसले आणि त्यानंतर विकास आराखडा आला. त्यामुळे नंतर विकास आराखडयामध्ये रस्ते दर्शविण्यात आले. इतर आरक्षणे नंतर दाखविण्यात आली. त्यावेळेस सर्वांना याची काळजी होती की आपणांस राहण्यासाठी जागा कशी भेटेल म्हणुन बरेचसे लोक एकत्रितपणे जवळ जवळ राहत होते. त्यानंतर शहरात दाट लोकवस्ती निर्माण झाली. आणि त्यामुळे आजची ही समस्या निर्माण झाली आहे. परंतु आम्हांला या गोष्टीचा अतिशय आनंद आहे की शासनाने आमची ही समस्या समजावुन घेतली आहे व शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याकामी अध्यादेश काढला आहे. परंतु त्यासाठीची जी दंडाची जी रक्कम आहे ती अतिशय जास्त आहे. यासाठी शासनास आपणांस सर्वांचा असा आग्रह असला पाहिजे की ही दंडाची रक्कम कमी केली पाहिजे. आपणांस जी जमिन मिळाली आहे ती आरक्षित जमिनीपैकी मिळालेली आहे. आणि आता अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करतांना जी दंडाची रक्कम आकारली जात आहे ती जमिनीचे बाजारमुल्य लक्षात घेवुन आकारली जात आहे. त्यामुळे ती जास्त आहे. परंतु कुणी व्यक्ती जेव्हा उच्च न्यायालयात दाद मागतो आणि त्यानुसार त्याच्याकडुन जी जमिनीची किंमत घेतली जाते की आरक्षित जमिनीच्या मुल्यानुसारची घेतली जाते. बाजारमुल्यानुसारची घेतली जात नाही. यासाठी अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करण्यासाठी शासनाने जमिनीचे जे मुल्य ठरविले आहे ते बाजारभावानुसारचे असल्याने त्यावर आकारण्यात येणारी दंडाची रक्कम जास्त असल्याने ती कमी करण्यासाठी आपण राज्य शासनाकडे धाव घेतली पाहिजे. बॅरेक मध्ये राहणारा व्यक्ती असो, इमारतीमध्ये राहणारा व्यक्ती असो त्या सर्वांनी आपली अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करुन घेण्याकामी दंडाची रक्कम कमी करुन घेण्यासाठी शासनाकडे गेले पाहिजे. यासाठी सर्वांनी एकत्रित आले पाहिजे. व एकमताने ठराव पारीत केला पाहिजे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>मा. महापौरजी, हा जो विषय आहे. शहरामध्ये ज्या अनाधिकृत इमारती बांधण्यात आल्या आहेत त्या शासकिय जमिनिवरील असल्यातरी त्या नियमाधीन करुन घेण्यासाठी दंडाची जी रक्कम ठरविण्यात आली आहे ती कमी करुन घेण्यासाठी राज्य शासनाकडे शिष्ट मंडळ घेवुन गेले पाहिजे. ही समस्या मागील एक वर्षापासुन निर्माण झालेली आहे. शासकिय जमिनीवरील बांधकामदार, इमारतदार, व दारिद्रिय रेषेखालील लोक

आपले बांधकाम नियमाधीन करुन घेण्यासाठी दंडाची एवढी मोठी रक्कम भरु शकणार नाहीत. शहरामध्ये असे काही लोक आहेत की त्यांना दोन वेळचे जेवण मिळणे मुश्किलीचे झाले आहे. असे लोक दंडाची एवढी मोठी रक्कम भरु शकणार नाहीत. आज महासभेत असा विषय आला आहे की, याबाबत आपण राज्य शासनाकडे जावु या व त्यांना असा प्रस्ताव देवुन, दंडाची रक्कम काही अंशी कमी करुन घ्यावी. व आपली अनाधिकृत बांधकामे नियमित करुन घ्यावी. यासाठी माझे तर असे म्हणणे आहे की, आता आताच माझे मित्र श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की हे निर्वासीतांचे शहर आहे हे बरोबर आहे. १९४७ मध्ये देशाच्या फाळणीच्या वेळी सिंध प्रांतात या लोकांची जी घरेदुकाने होती कमाईची जी काही साधने होती ती नष्ट झाली. असे लोक उल्हासनगरमध्ये आले व जेथे जेथे त्यांना जागा मिळाली तेथे ते राहु लागले. तर हे शहर नगरपालिका, महानगरपालिका स्थापन होण्या अगोदर आणि विकास आराखडा तयार होण्या अगोदर वसलेले आहे. याबाबत राज्य सरकार मधील मंत्री महोदयांनी याचाही विचार केला पाहिजे की हे जे लोक शरणार्थी आहेत. शरणार्थींकडुन दंड काय घ्यायचा? याचा शासनाने विचार केला पाहिजे. म्हणुन मला असे वाटते की, जसे श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की दंडाची रक्कम काही अंशी कमी करुन अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करुन घेतली जावीत त्यासाठी महापालिकेमध्ये विविध राजकिय पक्षांचे जे गटनेते आहेत ते त्याच बरोबर सभागृह नेता व मा. महापौर, उपमहापौर यांनी महापालिकेच्या वतीने एक ठराव केला पाहिजे व तो शासनास दिला पाहिजे की हे जें शरणार्थी आहेत तसेच शासकिय जमिनीवर आणि झोपडपट्टयांमध्ये राहणारे जे लोक आहेत त्यांच्यासाठी दंडाची ही रक्कम कमी केली पाहिजे. एवढेच नाही तर कोणतेही शुल्क न घेता अशी बांधकामे नियमाधीन केली पाहिजेत. राज्य शासनाने या सर्वांना दिलासा दिला पाहिजे. यासाठी आजच येथे ठराव पारीत केला पाहिजे व एक चांगल्या प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे गेला पाहिजे. व शासनाकडे जर हे शिष्टमंडळ घेवुन जात असतील तर प्रत्येक पक्षाचा गटनेता तसेच सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता या सर्वांनी गेले पाहिजे व शासनास हे सांगितले पाहिजे की, हे शहर कधी, कसे व कोणत्याप्रकारे वसले आहे, आता या शहरासाठी कमाईचे काही साधन राहिलेले नाही. १० वर्षामध्ये येथे कमाईचे एकही साधन राहिलेले नाही शहर एकदम उदास झालेले आहे. म्हणुन शासनास अशाप्रकारचा ठराव दयावा की हे निर्वासीतांचे शहर आहे त्यांच्यासाठी या नियमामध्ये थोडीफार सुट दिली पाहिजे. तसे केले तर फार चांगले होईल. शासन सुध्दा मान्य करेल की हे निर्वासीतांचे शहर आहे. मी सभागृहास विनंती करतो की अशाप्रकारचा ठराव करुन लवकरात लवकर शासनास पाठवावा अशी विनंती करतो.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—सर्वात प्रथम तर मी मा. महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती व सर्व नगरसेवकांना धन्यवाद देवु इच्छितो की, त्यांनी सत्ता सांभाळताच दिनांक ५/४/२००७ पासुन आज १५/५/२००७ पर्यंतच्या या ४० दिवसामध्ये आमच्या मा. महापौरांच्या निवेदनानंतर हा विषय महासभेत आला आहे निवडणूक काळात त्यांनी शहरवाशियांना आश्वासन दिले होते की, आपले बांधकाम नियमित करुन घेण्याची आपणांस एक संधी मिळाली आहे सर्व प्रभाग अधिकारी, सर्व कनिष्ठ अभियंता तसेच प्रशासनातील सर्व अधिका—यांना धन्यवाद देतो त्यांनी घरोघरी जावुन ८५५ इमारती नियमित करण्यासाठी जी वेळ निर्धारीत करुन दिली होती त्या वेळेच्या आत त्यांनी सर्व मिळकत धारकांची भेट घेवुन त्यांना आवाहन करुन त्यांची बांधकामे नियमित करुन घेण्यासाठी जी संचिका तयार करुन अर्ज सादर करावयाचे होते ते १०० टक्के काम पुर्ण केले आहे. यासाठी मी त्या सर्वांचे अभिनंदन करतो व सर्वांना धन्यवाद देतो की त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे हे काम केले आहे. दुसरी गोष्ट अशी की आजचा हा जो विषय आहे शासनाने अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करण्यासाठी दंडाची जी रक्कम निश्चित करुन दिली आहे ती पाहता २००६ चे बाजारमुल्य आहे रु. १६०० ते २६०० या दरम्यान वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळे बाजार मुल्य आहे त्यानुसार जर दंड आकारला तर फार मोठया समस्येस तोंड दयावे लागेल. या शहरामध्ये बरेचसे गरीब लोक राहतात. १९४७ मध्ये जेव्हा देशाची फाळणी झाली त्यावेळेस बरेचसे लोक येथे येवुन राहु लागले. जे त्यावेळेस आपले घरदार सोडुन येथे आले होते, नव्या उमेदीने त्यांनी आपले जीवन येथे सुरु केले. व ६० वर्षामध्ये ते आपले घर तयार करण्याच्या स्थितीपर्यंत येवुन ठेपले.हे शहर १३ चौरस किलोमिटर क्षेत्रामध्ये वसलेले आहे. काही अडचणींमुळे काही लोकांना अनाधिकृत बांधकामे करावी लागली. शासनाकडुन बाजार मुल्य १६०० ते २६०० रुपये निश्चित केले आहे. ते खुपच जास्त आहे. कारण की भारत सरकारने हे शहर शरणार्थीसाठी शहर व ही जमिन शरणार्थीसाठी जमिन असे घोषित केले होते. जेव्हा देशाची फाळणी झाली तेव्हा येथिल जमिन शरणार्थीसाठी आरक्षित केली होती व त्याची आरक्षित अशी किंमत त्यावेळेस निर्धारीत केली होती. ती त्यावेळेस १३ रुपये चौरस वार अशी होती. व जागेची जी सनद दिली जात असे ती १३ रुपये चौरस वार या हिशोबानेच दिली जात होती. ती आजपर्यंत दिली जात होती. आज सुध्दा सनद साठी न्यायालयात कुणी जात असेल तर त्याबाबतीत न्यायालयाचा जो आदेश असतो तो १३ रुपये चौरस वार या हिशोबाने जमिनीची किंमत घेतली जावी असाच असतो. यासाठी आजचा जो ठराव आहे तो श्री. बी.बी. मोरे यांनी

म्हटल्याप्रमाणे सर्व संमतीने पारीत केला जावा. शहराच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी आम्ही लोक निवडुन आलो आहोत. शहरातील नागरीकांची अनाधिकृत बांधकामे कमीत कमी दंड भरुन कशी नियमित करता येतील हेच आमचे कर्तव्य ठरते. या ठरावांवर सर्वांची सहमती व्हावी अशी मी सभागृहास विनंती करतो.

__सदस्य श्री. सतिश चहाळ :–__मा. महापौर महोदया, उपमहापौर, आयुक्त साहेब, अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याचा आजचा हा जो मुद्दा आहे या मुद्दयाबाबत समाजकारण करतांना राजकारण करु नये. अशी माझी समज आहे. दुसरी गोष्ट अशी की, मागील वेळेस बांधकामे नियमित करतांना या शहरामध्ये हा:हाकार माजला होता. त्यावेळेस माजी महापौर व उल्हासनगरचे आमदार यांनी सुध्दा फार मोठी सहकार्याची भुमिका घेतली होती. निर्वासीतांची छावणी म्हणुन येथिल लोकांना फायदा मिळाला पाहिजे त्याचबरोबर झोपडपट्टीमध्ये राहणा–या व दारिद्रय रेषेखाली जीवन जगणा–या लोकांनाही आपली अनाधिकृत बांधकामे नियमित करतांना दंडाच्या रक्कमेची सुट मिळाली पाहिजे. तसेच यामध्ये राजकारण आणु नये. सर्व पक्षांनी मिळुन या बाबतीत पाठपुरावा करावा व ज्यामुळे उल्हासनगर वाशियांचा फायदा व्हावा.

__सदस्य श्री. राजु जग्यासी :–__मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने मी या प्रस्तावाचे स्वागत करतो. यामध्ये एक मुददा जोडु इच्छितो की, निवडणुकीच्या काळात मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री आपल्या शहरामध्ये आले होते. व त्यांनी भर सभेमध्ये असे म्हटले होते की, या शहरातील ८५५ इमारती व इतर अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी जो अध्यादेश काढण्यात आला आहे त्यामध्ये दंडाची जी रक्कम दर्शविली आहे ती आम्ही कमी करु. यासाठी माझी अशी सुचना होती की हा मुद्दा जर आपण प्रस्तावात अंतर्भुत केला की आमच्या मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांनी भर सभेमध्ये हे आश्वासन दिले आहे. तर त्या ठरावास अधिक वजन प्राप्त होईल असे मला वाटते. व हा प्रस्ताव सर्व संमतीने पारीत केला जावा. तसेच विरोधी पक्षांच्या वतीने मी सांगु इच्छितो की, शहराच्या हिताचा कोणताही मुद्दा असल्यास त्याबाबत आमची भुमिका सहकार्याची राहील. त्याबाबत आम्ही आपणाबरोबर असु. शहर विकासाची कामे सर्व संमतीने पारीत केली जातील. धन्यवाद.

__सदस्य श्री. धनंजय बोडारे :–__मा. महापौर, उप–महापौर, गेल्या एक दिड वर्षापासुन उल्हासनगर शहरामध्ये एक वेगळे वातावरण आहे. त्यातुन मार्ग काढण्यासाठी सर्व पक्षांच्या वतीने महाराष्ट्र शासनाला विनंती करावी. व दंड आकारणी कमी करुन घ्यावी. उल्हासनगरमध्ये जे संभ्रमाचे वातावरण आहे ते निवळण्यासाठी हा एक प्रयत्न आहे. अध्यादेश जारी झाल्यानंतर जिल्हाधिकारी, येथिल आयुक्त व संबंधीत अधिका–यांच्या लोकप्रतिनीधींबरोबर बैठका झाल्या. त्या प्रत्येक वेळेस लोकप्रतिनिधींनी सांगितले की हा अध्यादेश जरी असला तरी त्याची अंमलबजावणी होवु शकत नाही कारण की तो वस्तुस्थिती दर्शक नाही. परंतु प्रशासनाने त्यावेळेस त्याकडे दुर्लक्ष केले. आम्ही ओरडुन ओरडुन सांगत होतो की हे शक्य नाही. आम्ही जे सांगत आहोत ते सिध्द झाले. श्री. राजु जग्यासी यांनी सांगितले की, निवडणूक काळात मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले आहे. परंतु त्याचा उल्लेख आपणांस येथे करता येणार नाही. कारण निवडणुकीमध्ये जी आश्वासने दिली जातात ती पाळली जातातच असे नाही आणि लोकप्रतिनिधींपेक्षा प्रशासनाचे लक्ष आपण येथे केंद्रीत केले पाहिजे. कारण अध्यादेश काढतांना शासनाने निर्णय घेतला. परंतु त्याची अंमलबजावणी करतांना तो कश्याप्रकारचा असावा हे प्रशासन अधिका–यांनी ठरविलेले आहे. त्यामुळे मा. मुख्यमंत्री किंवा उप–मुख्यमंत्री यांनी काय आश्वासन दिले किंवा आमच्या श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की गोल मैदान येथे एका इमारतीचे बांधकाम निष्कासीत करत असतांना आमच्या श्री. सुभाष देसाई साहेबांनी श्री. रामानंद तिवारी साहेबांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा केली. त्यावेळीच मी सांगितले होते की हे शक्य नाही. लोकांचा प्रतिसाद का नाही? असे त्यांनी विचारले. त्यावर आम्ही त्यांना सांगितले की, हे वस्तुस्थिती दर्शक नाही जी दंड आकारणी आहे ती खुपच जास्त आहे. म्हणजेच अपेक्षित रक्कमेच्या दुप्पट. अपेक्षेपेक्षा दुप्पट मिळत असेल तर वेगळी गोष्ट आहे परंतु येथे अपेक्षेपेक्षा दुप्पट दयावे लागत आहे. घराची किंमत जर एक लाख रुपये असेल आणि ते नियमित करुन घेण्यासाठी दंडाची रक्कम जर दोन लाख असेल तर प्रतिसाद कसा मिळेल? हे सांगण्याचा आम्ही प्रयत्न केला. त्यावर त्यांनी सांगितले की, याबाबतीत आमच्याशी कुणी संपर्क साधला नाही. ही मागील एक–दिड महिन्यापुर्वीची गोष्ट आहे. श्री. सुभाष देसाई साहेब, श्री. लाल पंजाबी असे दोन–चार लोक आम्ही श्री. रामानंद तिवारी साहेबांकडे गेलो होतो व त्यानंतर ही प्रक्रिया चालु झाली. त्यावेळेसच त्यांनी आम्हांस आश्वासन दिले होते. आमच्याकडे असा काही प्रस्ताव आला तर आम्ही शिफारस करु. परंतु लोक संपर्कच करत नाहीत. त्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही लोक हे सर्व करत आहोत. व त्यास एवढा चांगला प्रतिसाद मिळत आहे की जो प्रतिसाद गेल्या एक–दिड वषापासुन मिळत नव्हता तो गेल्या एक–दिड

महिन्यापासुन मिळत आहे.  ८५५ इमारतींना ज्या नोटिसा पाठविण्यांत आल्या आहेत त्या सर्वच्या सर्व लोकांनी आपली बांधकामे नियमाधीन करुन देण्यासाठी अर्ज केले आहेत यासाठी कर्मचा—यांना सुध्दा मी धन्यवाद देतो की, त्यांच्या आवाहनाला जवळ जवळ ९९ टक्के लोकांनी प्रतिसाद दिला आहे.  व केवळ ५—६ लोक बाकी आहेत. ज्यांच्या मिळकती आढळुन येत नाहीत.  श्री. रामानंद तिवारी साहेबांशी चर्चा झाल्याप्रमाणे तसेच मा. मुख्यमंत्री, उप—मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही झाली पाहिजे.  कारण सुध्दा तसेच आहे. त्यांच्याशी चर्चा करतांना सर्व पक्षांच्या नगरसेवकांनी ही बाब त्यांच्या निदर्शनास आणुन दिली, काल सुध्दा आमची बैठक झाली.  त्या बैठकीत महापौर होत्या, उप—महापौर होते, स्थायी समितीचे सभापती होते, आम्ही सर्वांनी तेथे मुद्दे उपस्थित केले.  रुपये १६०० ते २६०० हे जे २००६ चे दर लावले आहेत ते चुकीचे आहे.  हा जो अध्यादेश निघाला आहे तो निर्वासीतांचे पुनर्वसन करण्यासाठी.  अशाप्रकारचा अध्यादेश महाराष्ट्रात कुठेही निघाला नाहि तो फक्त उल्हासनगर वाशियांसाठीच काढण्यात आला आहे.  अशावेळी एका बाजुला तुम्ही २६०० रुपये असा दर लावता आणि दुस—या बाजुला उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १३ रुपये दर लावता, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसारच तुम्ही या जमिनी नियमित करणार आहात. आणि याचा दर २६०० रुपये म्हणजे २६० रुपये प्रति मिटर हे चुकीचे आहे.  आतापर्यंतच्या चर्चेत सर्व राजकिय पक्षांच्या नेत्यांनी राजकारण बाजुला ठेवुन सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन चर्चा केली ही गरजच आहे.  त्याबद्दल सर्वांचे धन्यवाद.  याठिकाणी सर्व पक्षांच्या वतीने जो ठराव आहे तो मी या ठिकाणी वाचुन दाखवितो.

उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करावयाची कार्यवाही पदनिर्देशित अधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत चालू असून, उल्हासनगरमधील ब-याच मिळकत धारकांनी आपले बांधकाम नियमाधिन करणे बाबत अर्ज दाखल केले आहेत. सदर प्रकरणी पदनिर्देशित अधिका-यामार्फत अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करण्याची कार्यवाही चालू आहे.

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार शासनाने ठरवुन दिलेल्या सन — २००६ बाजार मुल्य दर तक्त्यानुसार जमिनीचे दर लावावेत असे ठरले आहे. सदरचे सन — २००६ चे बाजार मुल्य दर तक्ते उल्हासनगर शहरासाठी किमान रू. १६०० प्रति चौ. मी. ते कमाल रू. २६००/— प्रति चौ. मी. या प्रमाणे येतो. त्यामुळे साधारणतः हा दर रू. १६०/— प्रति चौ. फूट ते २६०/— प्रति. चौ. फूट येतो. सदरचा दर वाजवी दरापेक्षा खूपच जास्त असल्याने उल्हासनगरचे नागरीक भरू शकत नाहीत कारण उल्हासनगरचे नागरीकांना या जागा शरणार्थी म्हणून ६० वर्षापूर्वी दिल्या आहेत व त्या जमिनी अथवा बांधकामाच्या सनदा देणे बाकी असल्याने पुर्ण जागेची किंमत आज या मितीस आजच्या भावाने भरणे अशक्य आहे.

सदरचे नागरीकांना ६० वर्षापुर्वीच जमीनीचे ताबे दिलेले आहेत त्या वेळीस शासनाने राखीव दराने जमीनी (Reserve Price) देण्याचे घोषीत केले होते. त्यानुसार आजमितीसही सनदा ही हस्तांतरीत केल्या जातात तर अजमितीस ताब्यात आसलेल्या जमिनीस आरक्षित केलेल्या जमिनीचाच दर राखिव दराप्रमाणे घेणे योग्य राहील. कारण सदरची जमिन ही केंद्र शासनाने शरणार्थीसाठी आरक्षित केली होती. व या जमिनीसाठी अकृषीक परवानगीची सुध्दा आकारणी केली जात नाही. त्यामुळे अरक्षित जमिनिची रक्कम Reserve Price राखिव दरा प्रमाणे शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार होणे योग्य राहील. आज मितीस सुध्दा मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उल्हासनगर मधील जमिनीचा दर सनद हस्तांतरीत करणे कामी राखीव दरानेच आकारला जातो.

तसेच शासनाने १४ जानेवारी, २००६ च्या आध्यादेशातील अधिनियम क्र. — ३ (क) मधील फी च्या तक्त्यामध्ये १ ते ८ व ख, ग चे जे वर्गीकरण केले आहे ते वाजवी पेक्षा जास्तच आहे. त्यामुळे सदरची दंडाकित करण्यात येणारी रक्कम ही राखीव दराणे घेण्यात यावी. जेणे करून नागरीक दंडात्मिक होणा—या रक्कमा भरू शकतील त्यानुसार जमिनीचे दर व दंडात्मिक रकमेचे दर राखीव दराप्रमाणे घेणे योग्य राहील.  त्यासाठी शासनाकडे हा प्रस्ताव आम्ही मंजूरीसाठी पाठवित आहोत.

हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत होत आहे. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता तात्काळ मंजुरीसाठी शासनाकडे तात्काळ पाठवावा.  अशा प्रकारचा हा प्रस्ताव आहे. शासनाने कुठलीही योजना राबवितांना त्यामागचा उद्देश त्यानंतर त्याचे होणारे परिणाम, त्याचे तोटे, फायदे हे वास्तविक पाहता त्यांच्यासमोर हा अध्यादेश ठेवणे गरजेचे होते. येथे याबाबतीत वारंवार चर्चा झालेली आहे.  उशिरा का होईना पण यापुढे प्रशासनाने याची काळजी घ्यावी.  शासनाचा जो उद्देश आहे की उल्हासनगरच्या निर्वासीतांना फायदा दयायचा.  शासनाचा जो उद्देश आहे तो उल्हासनगर महानगरपालिकेतील प्रशासनाचा सुध्दा असावा व त्यानुसार त्यांनी वाटचाल करावी.  आणि अंमलबजावणी करण्यासाठी जो प्रस्ताव आम्ही मंजुर करत आहोत त्या व्यतिरिक्त या संबंधी येणा—या इतर अडचणी जेणेकरुन उल्हासनगरच्या नागरीकांना कसे फायदेशीर होईल तसे निर्णय, तसे निर्देश आपण दयावेत. अशी उप—सुचना मी अधिका—यांना देतो.  जेणेकरुन जास्तीत जास्त नागरीकांना त्याचा फायदा झाला पाहिजे

म्हणजेच लाल फितीमध्ये न अटकता, नागरीकांना त्रास न होता एखादी अडचण कशी सोडविता येईल? थोडा त्रास तुम्ही घेतला तरी चालेल. डोक्याला चालना दिली तरी चालेल. कर्मचारी आहात, सर्व अधिका—यांचा, कर्मचा—यांचा वापर करुन उल्हासनगर मधील नागरीकांना कमीत कमी त्रास होईल किंबहुना होणार नाही याची दखल आपण घ्या. अशी विनंती याठिकाणी करतो. जयहिंद। जय महाराष्ट्र।

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषय पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑

<u>विषय क्र. १ :—</u> उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याकरीता आणि तंत् संबंधित किंवा तद्नुषंगित कायदयात व संबंधित नियमात दंड आकारणी कमी करण्याच्या दृष्टीकोनातून शासनास सुधारणा सुचविणे.

<u>प्रस्तावना:</u>

उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करावयाची कार्यवाही पदनिर्देशित अधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत चालू असून, उल्हासनगरमधील बऱ्याच मिळकत धारकांनी आपले बांधकाम नियमाधिन करणे बाबत अर्ज दाखल केले आहेत. सदर प्रकरणी पदनिर्देशित अधिकाऱ्यामार्फत अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करण्याची कार्यवाही चालू आहे.

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार शासनाने ठरवुन दिलेल्या सन — २००६ बाजार मुल्य दर तक्त्यानुसार जमिनीचे दर लावावेत असे ठरले आहे. सदरचे सन — २००६ चे बाजार मुल्य दर तक्ते उल्हासनगर शहरासाठी किमान रू. १६०० प्रति चौ. मी. ते कमाल रू. २६००/— प्रति चौ. मी. या प्रमाणे येतो. त्यामुळे साधारणत: हा दर रू. १६०/— प्रति चौ. फूट ते २६०/— प्रति. चौ. फूट येतो. सदरचा दर वाजवी दरापेक्षा खूपच जास्त असल्याने उल्हासनगरचे नागरीक भरू शकत नाहीत कारण उल्हासनगरचे नागरीकांना या जागा शरणार्थी म्हणून ६० वर्षापूर्वी दिल्या आहेत व त्या जमिनी अथवा बांधकामाच्या सनदा देणे बाकी असल्याने पुर्ण जागेची किंमत आज या मितीस आजच्या भावाने भरणे अशक्य आहे.

सदरचे नागरीकांना ६० वर्षापुर्वीच जमीनीचे ताबे दिलेले आहेत त्या वेळीस शासनाने राखीव दराने जमीनी (Reserve Price) देण्याचे घोषीत केले होते. त्यानुसार आजमितीसही सनदा ही हस्तांतरीत केल्या जातात तर अजमितीस ताब्यात आसलेल्या जमिनीस आरक्षित केलेल्या जमिनीचाच दर राखिव दराप्रमाणे घेणे योग्य राहील. कारण सदरची जमिन ही केंद्र शासनाने शरणार्थीसाठी आरक्षित केली होती. व या जमिनीसाठी अकृषीक परवानगीची सुध्दा आकारणी केली जात नाही. त्यामुळे अरक्षित जमिनिची रक्कम Reserve Price राखिव दरा प्रमाणे शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार होणे योग्य राहील. आज मितीस सुध्दा मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उल्हासनगर मधील जमिनीचा दर सनद हस्तांतरीत करणे कामी राखीव दरानेच आकारला जातो.

तसेच शासनाने १४ जानेवारी, २००६ च्या आध्यादेशातील अधिनियम क्र. — ३ (क) मधील फी च्या तक्त्यामध्ये १ ते ८ व ख, ग चे जे वर्गीकरण केले आहे ते वाजवी पेक्षा जास्तच आहे. त्यामुळे सदरची दंडाकित करण्यात येणारी रक्कम ही राखीव दराणे घेण्यात यावी. जेणे करून नागरीक दंडात्मिक होणा—या रक्कमा भरू शकतील त्यानुसार जमिनीचे दर व दंडात्मिक रकमेचे दर राखीव दराप्रमाणे घेणे योग्य राहील.

वरिलप्रमाणे महासभेच्या मंजूरीसाठी प्रस्तावित.

<u>विशेष महासभा ठराव क्र. २१</u> <u>दिनांक :—१५/५/२००७</u>

सुचकाचे नाव :— १. श्री. धनंजय बोडारे
२. श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :–१. श्री. राजु जग्यासी

२. श्री. बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याकरीता आणि तत् संबंधीत किंवा तद् अनुषंगिक कायदयात व संबंधीत नियमाप्रमाणे दंड आकारणी कमी करण्याच्या दृष्टीकोनातुन शासनास खालील सुधारणांची शिफारस करीत आहे.

१. शासनाच्या धोरणानुसार ठरवून दिलेल्या सन २००६ च्या बाजार मुल्य दर तक्त्यानुसार जमिनिचे दर लावण्याऐवजी राखीव दराप्रमाणे आकारणे.

२. शासनाने १४ जानेवारी, २००६ च्या अध्यादेशाावरील अधिनियम क्र. ३ (क) मधील फी च्या तक्त्यामध्ये १ ते ८ व ख, ग चे जे वर्गीकरण केले आहे ते वाजवी पेक्षा जास्तच आहे. त्यामुळे सदरची दंडाकित करण्यात येणारी रक्कम ही राखीव दराने घेणे.

इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदरहु ठरावा अंतर्गचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो निर्णय अंतिम असेल.

सुचकांची सही/– १.

२.

अनुमोदकांची सही/– १.

२.

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–**मा. महापौरांच्या आदेशानुसार ही सभा येथे समाप्त होत आहे. पुढील सभेची सुरुवात करण्यात येत आहे.

सांयकाळी ४.०५ वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१३/७/२००७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १३/७/२००७ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—२

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शुक्रवार दिनांक १३/७/२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

३. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

४. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३६ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३८ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३९ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४० | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४१ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४२ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४३ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४४ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४५ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १३ | श्री. विजय खंडु सुपळे | ४६ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४७ | श्री. शेखर केशव यादव |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४९ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १७ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५० | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १८ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५१ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १९ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५२ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५३ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २१ | श्री. राजू जग्यासी | ५४ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २२ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५५ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५६ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५७ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ५८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५९ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २७ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६० | श्री. मोहन साधवाणी |
| २८ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६१ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २९ | श्री. लाल पंजाबी | ६२ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| ३० | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६३ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३१ | श्रीमती शकुंतला पाटील | ६४ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३२ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३३ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६६ | श्रीमती वनवारी मोना अशोक |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६७ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३५ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६८ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, २. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ३. श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास, ४. श्री. ढोके जनार्दन किसनराव, ५. श्री.एडके गणपत गोविंद, ६. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), ७. श्री. मुकेश सोहन तेजी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२३.श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
२४.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
२५.श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
२६.श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
२७.श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
२८.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
२९.श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
३०.श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
३१. डॉ. जी.टी. जिंदे , वैद्यकीय आरोग्य अधिकारी
३२. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
३३.श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
३४.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
३५.श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पा.पु.
३६.श्री. सुखरामानी, प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग
३७.श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. कु. शकुंतला गावित
४. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १:— उल्हासनगर महानगरपालिकेस जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानात सहभागी होण्यास तसेच त्या अंतर्गत घेण्यात येणा—या विविध प्रकल्पांचे शहर विकास आराखडयास मान्यता मिळणे.

---

सदस्य श्री राजू जग्यासी :—मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मी आपणांस विनंती करतो की या विषयाबाबत आपण सभागृहास थोडीशी माहिती दिली तर बरे होईल.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—मा. महापौरजी, सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य.................................

**सदस्य श्री राजू जग्यासी :–**आयुक्त साहेब, आपण हिंदीत बोलाल तर अधिक चांगले होईल.

**सदस्य श्री बी.बी.मोरे :–**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सिंधी भाषिकांना मराठी शिकण्यासाठी पाठवावे लागेल.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–**जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण ही योजना देशातील मोठया शहरांच्या विकासासाठी तयार करण्यात आली आहे. . जास्त लोकसंख्येची जी शहरे आहेत त्यातील महाराष्टातील ५ शहरे जसे की, मुंबई, ठाणे, कल्याण,उल्हासनगर, अंबरनाथ या शहरांसाठी या योजनेतुन ५० टक्के निधी केंद्र व राज्य सरकारकडुन मिळणार आहे. हा निधी नविन रस्ते बांधणे, वाहतुकीची सोय करणे, जलवाहिन्या टाकणे, नाले व गटारे बांधणे, शहर रोषनाई, भुयारी गटार योजना राबविणे, झोपडपट्टी सुधारणा योजनेअंतर्गत गलिच्छ वस्त्यांमध्ये गरीब लोकांसाठी घरे बांधणे, यासाठी सव्वा दोन कोटीची योजना असून त्यातील ५० टक्के खर्च शासनाकडुन मिळणार आहे. ही योजना पाच वर्षासाठी आहे. जर आपण ती आपल्या शहरासाठी लागु करुन घेतली तर पुढील पाच वर्षामध्ये शहराच्या विकासामध्ये बराचशा फरक झालेला आपणांस दिसून येईल. आम्ही जो कार्यक्रम तयार केला आहे त्यानुसार पुढील पाच वर्षामध्ये आपणांस साडे सातशे कोटी खर्च करायचे आहेत व उर्वरीत रक्कम शासनाकडुन प्राप्त होणार आहे. आपणांस हा जो गोषवारा देण्यात आलेला आहे त्यामध्ये या योजनेवरील खर्चाचा पुर्ण तपशिल देण्यात आला आहे. ही संपुर्ण योजना बाराशे चौपन्न कोटीची असून येणा–या पाच वर्षातील सिमेंट व लोखंड यावरील महागाई लक्षात घेता ती एकुण पंधराशे नव्व्यान्नव कोटीची होईल. गोषवा–याच्या शेवटुन दुस–या तिस–या पानावर या बाबतची सविस्तर माहिती दिली आहे. गोषवा–यात जो मजकुर आला आहे त्याची मी पुनरावृत्ती करु इच्छित नाही. आम्ही जो कार्यक्रम तयार केला आहे त्यानुसार जर काम झाले तर पुढील पाच वर्षामध्ये अतिशय चांगले काम झाल्याचे आपणांस दिसुन येईल.

**सदस्य श्री बी.बी.मोरे :–**या विषयाबाबत सविस्तर माहिती दिली जावी या विषयाबाबत आम्हांस जो गोषवारा देण्यात आला तो आता आज दिनांक १३/७/२००७ रोजी सभागृहात देण्यात आलेला आहे. तो आम्ही वाचणार केव्हा आणि त्यावर चर्चा तरी कधी करणार? या विषयाबाबत सर्व गटनेत्यांची बैठक घेवुन चर्चा करावयास पाहिजे होती. परंतु तसे काही झालेले दिसत नाही. म्हणून गटनेत्यांची बैठक घेवुन त्यानंतरच हा विषय घेण्यात यावा व या विषयासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतुद करण्यात यावी. व त्यानंतरच ठराव पारीत करण्यात यावा. धन्यवाद ।

**सदस्य श्री. लाल पंजाबी :–**श्री.बी.बी. मोरे यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला की, या विषयाबाबत आयुक्त साहेबांनी गटनेत्यांची एक बैठक बोलवावयास पाहिजे होती. मला आठवते की, २३ – २४ तारखेला आयुक्त साहेबांनी सर्व गटनेत्यांची व प्रमुख लोकांची एक बैठक बोलावली होती. त्यावेळेस मी त्या बैठकीस उपस्थित नव्हतो कारण नागपुर येथे आमची बैठक होती. परंतु मला माहित आहे की त्यावेळेस गटनेत्यांची बैठक स्थायी समिती सभागृहामध्ये झाली होती. महासभेची सूचना निघाल्या नंतर आपणांस एक आठवडयाची मुदत मिळते. आपणांस जो गोषवारा वाटप केला जातो, त्यावर या सात दिवसामध्ये आपण अभ्यास केला पाहिजे. वेळेचा उपयोग करुन घेतला पाहिजे. म्हणून मी सांगु इच्छितो की, बैठक झाली आहे. तसेच आयुक्त साहेबांनी या प्रकल्पा विषयी बैठकीत सविस्तर माहिती दिली आहे. सर्वात प्रथम मी नविन आयुक्त साहेबांचे अभिनंदन करु इच्छितो की आल्या आल्याच ते या कामाच्या मागे लागले. आम्ही ब–याच दिवसापासुन वर्तमान पत्रात वाचत होतो. परंतु त्यावेळेस आमच्या लक्षात येत नव्हते की ही योजना काय आहे? वर्तमानपत्रात वाचत होतो की, बाराशे कोटीचा निधी मुंबई महानगरपालिकेस मिळाला आहे, अमुक एवढया कोटीचा निधी ठाणे महापालिकेस मिळाला. ठाण्याचे मला माहित आहे, स्टेशन बाहेरील परिसर विकसित करण्याचे काम जे २९ कोटीचे आहे, फक्त त्या एका जागेचे काम एक वर्षापासुन चालु आहे. जेव्हा मी इंडियन एक्सप्रेस , टाईम्स ऑफ इंडिया ही वर्तमान पत्रे वाचत असे त्यावेळेस मला असे वाटत असे की आमचे शहर एवढे मागे का आहे? अशा योजनेचे पैसे आम्हांस का मिळत नाहीत? काही दिवसांपुर्वीची गोष्ट आहे, मी व श्री. बोडारे साहेब काही कामासाठी कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त श्री. आर.डी. शिंदे यांच्याकडे गेलो होतो. त्याचवेळेस त्यांच्याकडे एक पत्र आले होते, पुर्ण भारतातील तसेच महाराष्ट्रातील शहरांची त्यांच्याकडे एक यादी होती. त्यावेळेस त्यांनी सांगितले की शासनाच्या योजनेतुन अमुक एवढे पैसे मिळालेले आहेत. त्यावेळी त्यांनी आम्हांस सांगितले की, आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या नावासमोर शून्य असा आकडा लिहिला आहे. मला जसे वाटत होते, आजचा टाईम्स ऑफ इंडिया वाचा, इतर काही पेपर आहेत ते वाचा, सर्व पेपर मी वाचले मुंबई महानगरपालिकेस एकाच

योजनेसाठी बाराशे कोटी मंजुर केले आहेत. त्यावेळेस आम्हांस वाटत होते की आपल्या येथे असे काम का होत नाही? ही चांगली गोष्ट आहे की आयुक्त साहेब हे आल्या–आल्याच या प्रकल्पाच्या मागे लागले. त्यांनी तो अहवाल तयार केला तो आज आपल्या समोर आहे. त्यातील महत्वाच्या ज्या गोष्टी आहेत त्यात शहरात पायाभुत सोयी सुविधांबाबत व दुसरी महत्वाची जी गोष्ट आहे जी आपण कधी विसरता कामा नये. शहरातील रस्ते, विकास कामे, वाहनतळ, शहरातील उड्डान पुल, जसे उल्हास स्टेशन, विठ्ठलवाडी स्टेशन आहे, खेमानी नाल्याचा प्रवाह वळविण्याचे काम आहे, शहाड येथिल नाल्याचा प्रवाह वळविण्याचे काम आहे अशी बरीचशी कामे आहेत, त्याचबरोबर पाणी पुरवठयाची सुधारीत योजना, तसेच जितकी रक्कम शहरातील मुख्यकामास मिळते तितकीच रक्कम, ६.१७ कोटीची जी रक्कम आहे ती गलिच्छ वस्तीसाठी आहे. मला चांगले आठवते आता सभागृहात श्री. हरदास माखिजा हे नाहीत. ते नेहमी म्हणायचे की, हा अतिशय महत्वपुर्ण असा ठराव आहे. त्यानुसार मला वाटते की, हा अतिशय महत्वपुर्ण असा ठराव आहे. १६०० कोटीची योजना सरकारकडे पाठवत आहोत. व जसे आयुक्त साहेबांनी सांगितले की, या योजनेचा फायदा ब–याचशा महानगरपालिकांना या पुर्वीच मिळालेला आहे. आपण तो फायदा मिळविण्यामध्ये खुप विलंब केला आहे. तर मला असे वाटते की, तो विलंब आपण भरुन काढला पाहिजे. व या योजनेचा पाठपुरावा करण्यासाठी आयुक्तांनी प्रयत्न करावेत. व आमच्या कार्यकाळामध्येच पैसे मिळतील असे पाहिले जावे. या प्रकल्पामध्ये शासनाकडुन मिळणारे अनुदान जे आहे ते फार मोठया प्रमाणावरचे आहे. शहरांमधील पायाभुत सुविधांसाठी केंद्र सरकारचे जे अनुदान आहे ते ३५ टक्के आहे. राज्य सरकारचे १५ टक्के , व स्थानिक स्वराज्य संस्थेचे ५० टक्के असे आहे. परंतु झोपडपट्टयांची जर आपण योजना पाहिली तर गृहनिर्माण योजनेसाठी केंद्र शासन ५० टक्के, राज्य शासन ३८ टक्के व संबंधित महानगरपालिका जी आहे ती २ टक्के व संबंधीत लाभार्थीचा त्यात १० टक्के सहभाग असणार आहे. तर अशी ही जी योजना आहे या योजनेसाठी कोणतेही राजकारण न करता मंजुर केली पाहिजे. याचबरोबर रस्ते रुंदीकरणाची जी योजना आहे त्याचबरोबर रेल्वे ओव्हर ब्रिजची जी योजना आहे, उल्हासनगर कॅम्प ३ व ४ यांना जोडणारा जो पादचारी पुल आहे, त्यासाठी अगोदरची तरतुद आहे. ट्रक टर्मिन्स इत्यादीसाठी योजना आहे. पार्किंग सुविधासाठी योजना आहे. यासाठी मला असे वाटते की, या विषयाबाबत राजकारण बाजुला सारुन विचार केला पाहिजे. व शहराच्या भविष्यासाठी अश्या चांगल्या संधी पुन्हा पुन्हा कधी येत नसतात, अशा ब–याचश्या संधी आपल्या हातुन अगोंदरच निघुन गेल्या आहेत. उदाहरणादाखल मी सांगु इच्छितो की, अडीच कोटीच्या रक्कमेकडे सुध्दा आपण लक्ष दिले नाही. दलित वस्तीचा तो निधी आपल्या हातुन निघुन गेला. म्हणुन अशा संधी पुन्हा पुन्हा येत नाहीत. आपण या संधीचा पुर्ण फायदा उचलला पाहिजे. तरच आपण शहराच्या भविष्याचा विचार करु शकतो. नाहीतर अशी संधी पुन्हा कधी येणार नाही. म्हणुन कोणताही संकोच न करता हा ठराव सर्वसंमतीने पारीत केला जावा. धन्यवाद ।

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>सन्माननिय महापौरजी, या विषयास या आराखडयास आमचा विरोध नाही. माझ्या म्हणण्याचा उद्देश एवढाच आहे की, याबाबत चर्चा झाली पाहिजे. या उल्हासनगर शहरामध्ये १९९७ मध्ये महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यावेळी तीन प्रवेशद्वारांचा प्रस्ताव पारीत झाला. त्यातील दोन प्रवेशद्वारे तयार झाली. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचे तिसरे प्रवेशद्वार अदयाप तयार झालेले नाही. आता या प्रस्तावावर बोलतांना आयुक्त साहेबांनी सांगितले की, ही योजना पाच वर्षामध्ये तयार झाली पाहिजे. प्रवेशद्वाराच्या प्रस्तावाला १५ वर्ष होवुन सुध्दा ते अदयाप पुर्ण झाले नाही. आयुक्त साहेब या महापालिकेमध्ये पाच वर्ष राहणार असतील तर हा प्रस्ताव सर्व संमतीने पारीत करण्यास काही हरकत नाही. परंतु या ठिकाणी आयुक्त साहेब जर सहा महिने किंवा वर्षभरच राहत असतील, आमचा या प्रस्तावास विरोध नाही. तुम्हांस मदत करण्याचा आमचा विचार आहे. परंतु १५ वर्षापासुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचे प्रवेशद्वार अदयाप तयार झाले नाही. म्हणुन ही योजना उल्हासनगर महानगरपालिकेत राबवत असतांना तिला जर १०–१५ वर्ष लागली तर ते बरोबर होणार नाही. त्यामुळे तुम्ही हा जो आराखडा आणलेला आहे त्यास गालबोट लागेल. तसे होवु नये म्हणुन सर्वांच्या संमतीने पारीत झाला पाहिजे. हा तुमचा प्रस्ताव अतिशय चांगला आहे. शहराच्या हिताचा आहे. त्यासाठी आम्ही सहकार्य दिले पाहिजे हे बरोबर आहे परंतु या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे. आणि यासाठी करोडो रुपयाचा खर्च येणार आहे त्याची अर्थसंकल्पामध्ये तरतुद केली पाहिजे. अशी तरतुद करायची झाली तर त्यास एक–एक वर्ष लागतो. आणि म्हणुन माझी सभागृहास पुन्हा विनंती आहे की, हा विषय थोडा लांबणीवर टाकला तर बरे होईल. धन्यवाद ।

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मा. महापौर महोदया व आयुक्त साहेब, श्री. लाल पंजाबी यांनी प्रशासनाचे अभिनंदन केले आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो व त्यांना धन्यवादही देतो. हा प्रस्ताव पाच—सहा महिन्यापुर्वीच यावयास पाहिजे होता. बाकीच्या महानगरपालिकांचे /नगरपालिकांचे याबाबतचे प्रस्ताव महासभेमध्ये मंजुर होवुन ते राज्य शासनाकडे पाठविण्यात आले होते. राज्य शासनाकडुनही त्यास मंजुरी मिळुन ते केंद्र शासनाकडे गेले आहे व मंजुरी मिळण्याच्या वाटेवर आहे. परंतु आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेचा प्रस्ताव नसल्यामुळे तसेच एमएमआरडीए मुंबई प्रादेशिक महानगराच्या अंतर्गत ही महानगरपालिका असल्यामुळे बाकीच्या महानगरपालिकांचे प्रस्ताव खोळंबले आहेत. हि माहिती मला वाटते खरी आहे. या प्रस्तावास एक वर्षापुर्वी चालना दयावयास पाहिजे होती. ती आजतागायत रखडलेली आहे. तुम्ही आल्या—आल्याच या कामी लक्ष घातले तसेच श्री. आर. डी. शिंदे साहेबांचे खरे तर अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी अतिरिक्त कार्यभार स्विकारल्यानंतर या प्रस्तावास चालना दिली. त्या अगोदरचे आयुक्त एक—एक वर्ष येथे राहून सुध्दा त्यांनी या प्रस्तावाकडे लक्ष दिले नाही. तुम्ही हा प्रस्ताव हाती घेतला आहात त्याबद्दल तुमचे अभिनंदन. इथे अशी स्थिती आहे, ''दैव देते आणि कर्म नेते.'' आम्हांला दैवाने दिले होते दिल्ली देवु इच्छित होती परंतु घ्यायची आमच्याकडे अक्कल नव्हती. त्यामुळे आतापर्यंत आम्ही पोहचु शकलो नाहीत. श्री. बी.बी. मोरे साहेब, हा एक अतिशय चांगला असा प्रस्ताव आहे. त्यास उगीचच विलंब करण्यामध्ये काही अर्थ नाही. आतापर्यंत वेळ गेलेला आहे. आणि शासनाचे नियम आणि धोरणे कधीही बदली होतात. त्यांचा फायदा योग्य वेळी घेणे हेच योग्य असते. जर आता आम्ही फायदा घेतला नाही तर उदया कदाचित शासनाचे धोरण बदलेल. व त्यावेळी डोक्यावर हात मारण्याची आपणावर पाळी येईल. उदया ही योजना बंद पडली तर काय करणार आपण? तुम्ही म्हणतात त्याप्रमाणे आयुक्त साहेब येथे पाच वर्ष राहतील. विरोध करु नका. हे आयुक्त असतील किंवा दुसरे चांगले आयुक्त येतील. परंतु शासनाची योजना जर का एकदा बंद पडली तर आपण कितीही प्रस्ताव पाठविले तरी ती येणार नाही. म्हणुन प्रस्ताव जावु दया. मागच्या गटनेत्यांच्या सभेमध्ये मा. महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती व गटनेते होते. त्यावेळेस आयुक्त व प्रशासनाच्या वतीने स्लाईड्ज् दाखविल्या होत्या. आणि सर्व योजना समजावुन सांगितली होती. त्याला आम्ही मान्यताही दिली होती. व लवकरच शासनाकडे मान्यतेसाठी पाठवा म्हणुन सांगितले होते त्यानुसार पाठविलीही असेल परंतु कायदेशीर तरतुदीप्रमाणे या महासभेची मंजुरी असणे आवश्यक आहे. आणि त्यामध्ये सुधारणा काय करायच्या त्या आपणांस सुचवायच्या आहेत. श्री. बी.बी. मोरे साहेबांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या प्रवेशद्वाराचे काम गेल्या पंधरा वर्षापासुन प्रलंबित आहे कारण काय तर पैसा, आणि हा पैसा जर आम्हांला शासनाकडुन जर पाहिजे असेल तर हा प्रस्ताव पारीत करण्यास आमची काही हरकत नाही. कुणाचीही हरकत नाही. सदस्यांची असु शकत नाही. नागरीकांची असु शकत नाही.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—**असे काही असेल तर आम्ही सर्व सहमत आहोत. सभागृहाने हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत करावा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**श्री. मोरे साहेब, मला वाटले तुम्हांला समजावुन सांगतांना मला घाम येईल. परंतु तसे काही नाही.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**श्री.बी.बी. मोरे साहेब, आपले अभिनंदन आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**श्री. मोरे साहेब, त्यामध्ये सुधारणा एक करायची आहे. या प्रस्तावामध्ये दोन योजना आहेत. त्यामध्ये एक आहे, पृष्ठ क्र. ४ वर एक नोंद आलेली आहे. झोपडपट्टयांमधील रहिवाश्यांचे रहिवास विभागत बहुमजली इमारत बांधुन त्यामध्ये स्थानांतर करुन आरक्षित भुखंडाचा महानगरपालिकेला उपयोग करता येईल. या करीता शहर विकास आराखडयात या योजनेअंतर्गत पहिल्या पाच वर्षाकरीता गृह निर्माण योजना......... या बाबत आमचे असे म्हणणे आहे की, हा जो शहर विकास आराखडा आहे तो १९७४ चा आहे. त्यानंतर ४८ झोपडपट्टया शासनाच्या वतीने अधिकृत झोपडपट्टया म्हणुन घोषित करण्यात आल्या आहेत आणि ९८ झोपडपट्टया अघोषित आहेत. आणि त्याठिकाणी असलेले आरक्षण यामध्ये आता जो बदल केलेला आहे व शहर विकास आराखडयामध्ये बराच बदल झालेला आहे. आणि मग त्या विकास आराखडयाचा विचार करणार की १९७४ चा विकास आराखडयाचा विचार करणार? माझें एकच म्हणणे आहे की, ज्या ठिकाणी झोपडपट्टया आहेत त्याचठिकाणी त्यांना मुलभुत सुविधा देवुन तेथे बहुमजली इमारत कश्या तयार करता येतील त्यासाठी आरक्षणात कसा बदल करता येईल याचा विचार करा. तो उल्लेख करा. आरक्षित जागेवरच्या झोपडपट्टया हलवुन इतर ठिकाणी स्थलांतरित करुन बहुमजली इमारती बांधुन त्यांना तेथे बसवायचे आणि आरक्षणाचे जे प्रयोजन आहे ते

वापरायचे. तसे न करता ९८ साला नंतरचा जो विकास आराखडा बनवणार आहोत तो शहराच्या हिताचा बनविणार आहोत. म्हणुन आहे त्या झोपडपट्टया त्याच ठिकाणी ठेवुन त्यांना या योजनेचा फायदा देण्याचा आपण प्रयत्न करावा. तसा बदल यामध्ये करावा अशी प्रशासनास विनंती आहे.

यानंतर १३३ कोटीची जी पाणी पुरवठा योजना आहे.जिला बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर दृमंजुरी दिली आहे तर ते जर झाल तर तो निधी आपण कुठे वापरणार आहोत? जास्तीत जास्त निधी उभारा. मी सुरुवाती पासुन वाचुन दाखवितो. उल्हासनगर शहरामध्ये १३०० हेक्टर जागेमध्ये २८९ हेक्टर क्षेत्र झोपडपट्टयांनी व्यापलेले आहे. उल्हासनगर शहर पहिल्यापासून उद्योगधंद्यांचे शहर म्हणून ओळखले जात असल्याने रोजगारानिमित्त आलेल्या लोकांमुळे झोपडपट्टया वसल्या आहेत. या वस्त्यांमध्ये समाजाच्या विविध थरातील लोक राहत असून त्यात मागासवर्गीयांची संख्या जास्त आहे. या झोपडपट्टयांपैकी ४८ झोपडपट्टया घोषित असून ९१ झोपडपट्टया अघोषित आहे. बहूतांशी झोपडपट्टया महानगरपालिकेच्या विकास आराखडयात दर्शविलेल्या आरक्षित जागांवर वसल्या आहेत. झोपडपट्टयांमधील रहिवाशांचे रहिवास विभागात बहूमजली इमारती बांधून त्यामध्ये स्थलांतर करून आरक्षित भूखंडाचा महानगरपालिकेला उपयोग करता येईल. हा जो शब्द आहे त्या झोपडपट्टया तेथुन स्थलांतरीत करुन आरक्षित भुखंडाचा महापालिकेला उपयोग करता येईल यास माझा विरोध आहे. विरोध म्हणण्यापेक्षा त्याठिकाणी अशी सुधारणा व्हावी की, झोपडपट्टया आहेत. त्याठिकाणी या सुविधा पुरविण्यात येतील. ९८ च्या विकास आराखडयामध्ये जो फेरबदल केला आहे तो विचारात घेतला पाहिजे. आताच्या प्रस्तावानुसार ९१ झोपडपट्टया अघोषित आहेत. आणि त्याची जी चर्चा झाली ती नमुद केली आहे. आणि त्याच्यानंतर अंमलबजावणी तुम्ही करणार आहात. हे अगोदरच स्पष्ट झाले आहे.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>आरक्षित भुखंडांवर जेथे–जेथे झोपडपट्टया आहेत त्या सगळयाच काढल्या जातील असे नाही. एखादा विभाग या योजनेसाठी आवश्यक असेल तर त्या भुखंडाचा महापालिकेस उपयोग करता येईल. समजा एखादया विभागामध्ये १००० झोपडया आहेत त्यातील काही भुखंडावर बहुमजली इमारत बांधून तेथे झोपडपटटीधारकांना स्थलांतरीत करता येईल व उर्वरित भुंखंड महापालिकेस आवश्यकत्या कामासाठी वापरता येईल घोषित झोपडपट्टयाचेच पुर्नवसन केले पाहिजे असे नाही अघोषित झोपडपट्टयांचेही पुर्नवसन केले जावु शकते व त्यांचे पुर्नवसन कोठे ही केले जावू शकते.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौर, यामध्ये १३३ कोटीची पाणी पुरवठा योजना आहे, जी योजना आम्ही या अगोदरच बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वानुसार हाती घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. असे असतांना ही योजना या प्रकल्पामधील हाती घेतली जावु शकते का? एवढे सांगितले जावे.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>याबाबतीत सदर योजना बांधा, वापरा व हस्तांतरीत करणे बाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु काही कारणास्तव योजना न झाल्यास सदरची योजना जवाहर नेहरु नागरी पुनरुत्थान अभियाना खाली घेण्यात आली आहे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>एक किरकोळ सुधारणा आहे. आपण जेव्हा ठराव तयार कराल त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी. पेज नं. ३ वर ट्रक टर्मिनन्स इत्यादीसाठी या शिर्षक अंतर्गत जो मजकुर आला आहे. ६५५ कोटी दर्शविले आहेत.मला वाटते की टंकलेखनाची चुक असावी. परंतु आपण जेव्हा अंतीम ठराव तयार कराल त्यावेळेस याबाबतची योग्य ती सुधारणा केली तर बरे होईल. रक्कमांचे जे आकडे आहेत ते तपासुन लिहिले तर बरे होईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>सचिव साहेब, आणखी एक दुरुस्ती आहे. पेज नं. ३ वर ट्रक टर्मिनन्स इत्यादीसाठी या शिर्षाअंतर्गतच्या तीन नंबरच्या ओळीवर असे लिहिले आहे की, उल्हासनगर शहरामध्ये सध्यस्थितीत मोठया ट्रकसाठी ट्रक टर्मिनन्स नाही. हिराघाट येथे सध्या जो टेम्पो स्टॅण्ड आहे तो अदयापपर्यंत अधिकृतपणे आपण त्यांना दिलेला नाही. साईड नं. १९३ जी आहे याबाबतीत आपण उल्लेख करा. आताची जी स्थिती आहे ती अशी की, बोट क्लबच्या बाहेरच्या बाजुला टेम्पो स्टॅण्ड लावला आहे तो बेकायदेशी आहे. व आपण या प्रस्तावामध्ये लिहिले आहे की टेम्पो स्टॅण्ड आहे. हे चुकीचे आहे. तो आजपर्यंत आपण त्यांना अधिकृतपणे दिलेला नाही. त्यांच्यासाठी १९३ क्रमांकाचे आरक्षण आहेत. तसेच दुसरी एक सुधारणा आहे. अनु.क्र.५ वर गरीबांकरीता मुलभुत सुविधा या शिर्षका अंतर्गतच्या मजकुरामध्ये मुद्रणदोष आहे. त्यामध्ये लिहिले आहे की केंद्र

शासनाकडुन ५० टक्के, राज्य शासनाकडुन ३८ टक्के व महानगरपालिकेकडुन २० टक्के या २० टक्क्याच्या ठिकाणी २ टक्के अशी नोंद केली जावी. मी सुचविलेल्या या दोन्ही बाबींमध्ये सुधारणा केली जावी.

**महापालिका सचिव :—** ठिक आहे ? पास? सर्वसंमतीने?

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**सर्वसंमतीने.

**महापालिका सचिव :—** सर्वसंमतीने?

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

विषय क्र. १ :– उल्हासनगर महानगरपालिकेस जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानात सहभागी होण्यास तसेच त्या अंतर्गत घेण्यात येणा–या विविध प्रकल्पांचे शहर विकास आराखडयास मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. केंद्र शासनातर्फे संपूर्ण देशभरातील झपाटयाने वाढ होणा–या निवडक शहरांसाठी समयबध्द पदधतीने सर्व आवश्यक त्या सोयी सुविधांमध्ये सुधारणा करण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचे ठरवले असून सदर कार्यक्रम ‘जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान’ या नावाने हाती घेण्यात आला आहे. २००५–०६ ते २०११–१२ अशी मुदत असलेल्या या अभियानात केंद्र शासनामार्फत उल्हासनगर महानगरपालिकेचा मुंबई प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या भूप्रदेशामध्ये येत असल्याने समावेश केलेला आहे. सदर अभियानांतर्गत पुढील ३० वर्षाचा शहराच्या वाढीचा विचार करून भविष्यवेध २०३१ (व्हीजन २०३१) तयार करणे तसेच त्यामधील पाच वर्षासाठीचा शहर विकास आराखडा तयार करणे व या विकास आराखडया अंतर्गत प्रस्तावित योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर) तयार करणे अपेक्षित आहे.

उल्हासनगर शहराचा विकास व सुशोभिकरण करणेसाठी नविन रस्ते बाधंणे, जलवाहिन्या टाकणे, नाले व गटारे बांधणे, शहर रोशनाई, भूयारी गटार योजना राबविणे, झोपडपट्टी सुधारणा इत्यादी सुविधांबाबत दिवसेंदिवस वाढत असलेली लोकसंख्या लक्षात घेऊन त्यामध्ये किती प्रमाणात सुधारणा करणे आवश्यक आहे याचे महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीशी सुसंगत आराखडा तयार करणे कामी उल्हासनगर महानगरपालिकेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांना सादर करण्याकरीता भांडवली गुंतवणूक योजना (Capital Investment Plan) व आर्थिक व्यवस्थापन (Financial Operation Plan) तयार करणेसाठी निविदा कार्यवाही करून मे. शाह टेक्निकल कंन्स्लटंसी प्रा. लि यांना दिनांक १४/१/२००६ रोजी कार्यारंभ आदेश दिले होते. केंद्रशासनाचे यथाचित सहाकार्याने उपरोक्त ‘जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाकरीता तयार करावयाच्या शहर विकास आराखडयाचे काम मे. शाह टेक्निकल कंन्स्लटंसी प्रा. लि. यांचेवर त्यांचेशी केलेल्या याच संविदंमध्ये अंतर्भूत करून त्यांना दिनांक २/९/२००६ रोजी शहर विकास आराखडा तयार करणेचे काम सोपविण्यात आले. याकामाची मुदत दिनांक १५/१०/२००६ पर्यत होती. परंतू या दरम्यानच्या काळात महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका आल्याने सदर कामाची प्रगती संथगतीने झाली.

सदर सल्लागार संस्थेने उल्हासनगर महानगरपालिकेचा शहर विकास आराखडा पुस्तिका तयार करण्याचे काम महानगरपालिकेतील सर्व खाते प्रमुखांशी विचार विनिमय करून व्हिजन २०३० पर्यंत प्रस्तावित केलेल्या व त्यातील नजीकच्या काळात अत्यावश्यक असलेल्या विविध विभांगाकडील नागरी सुविधा कामांचा समावेश करून उपरोक्त अभियानासाठी संस्थेने विकास आराखडयाचे प्रारूप तयार करण्यात आले आहे.

सदर शहर विकास कार्यक्रम पुढील पाच वर्षात पूर्ण करण्याचे प्रस्तावित असुन त्यामध्ये खालील योजना अंतर्भत करणे योग्य होणार आहे.

## १) एकात्मिक रस्ते विकास योजना टप्पा–१ मधील अपूर्ण कामे पूर्ण करणे. (एकूण तरतूद रू. ७.०० कोटी)

उल्हासनगर महानगरपालिकेने वर्ष १९९९ मध्ये एकात्मीक रस्ते विकास कार्यक्रम हाती घेतला होता. या कार्यक्रमाच्या टप्पा–१ मध्ये ३३ रस्त्यांचे रूंदीकरण करून पूर्नबांधकाम हाती घेतले होते. त्यापैकी २८ कामे पूर्ण झाले असुन ४ कामे बाधित बांधकामांचे निष्कासन न झाल्याने अपूर्ण आहेत. एक काम

सुरवातीपासून वगळण्यात आल्याने हाती घेतले नाही. त्यानंतर महानगरपालिकेने ६ कामे हाती घेतली होती. त्यामध्ये ४ रस्त्यांची कामे (पूर्ण) आहेत. एक कल्व्हर्टचे काम (पूर्ण) आहे. व एक प्रवेशव्दाराचे काम प्रगतीपथावर आहे. प्रवेशव्दाराचे अर्धे काम पूर्ण झाले असुन या मार्गातून वाहतूक सुरू करण्याकरीता बाधित बांधकामांचे निष्कासन न झाल्यामुळे उर्वरित अर्ध्याभागाचे काम हाती घेण्यात विलंब होत आहे.

उपरोक्त नमुद एकात्मीक रस्ते विकास कार्यक्रमामधील ४ अपूर्ण रस्ते व एक प्रवेशव्दार पूर्ण करणेकरीता अंदाजे रू. ७.०० कोटी खर्च अपेक्षित असून हे काम वर्ष २००७ ते २०१० पर्यंत करणेकरीता शहर विकास आराखडयामध्ये प्रस्तावित आहे.

## २) शहरामधील रस्त्यांचे रूंदीकरण, सिमेंट कॉक्रीटीकरण करून सुधारणा करणे (एकूण तरतूद रू. २८२ कोटी)

उल्हासनगर शहराचा सद्यस्थितीतील विस्तार शहरातील उद्योगधंद्याचे स्वरूप व त्यात दिवसेंदिवस होत असलेली वाढ शहरातील अंतर्गत व बाहेरून शहरामध्ये होणारी वाहनांची वाहतूक वर्दळीची तीव्रता जास्त आहे. यामध्ये जड वाहनांची वाहतूकही जास्त आहे.शहरामधील रस्त्यांवरील अतिक्रमणामुळे रस्त्यांची रूंदी विकास आराखडयाप्रमाणे उपलब्ध नाहीत. त्यादृष्टीने शहरात असलेले रस्त्यांचे रूंदीकरण व सिमेंट कॉक्रीटीकरण आवश्यक आहे. उल्हासनगर शहरामध्ये एकूण १२५ किमी रस्ते आहेत त्यापैकी ८८ किमी रस्ते डी.पी मध्ये दर्शविलेल्या मार्गाने अस्तित्वात आहेत. या रस्त्यांमध्ये एकात्मिक रस्ते टप्पा–१ मधील रूंदीकरण झालेले रस्तेही आहेत या रस्त्यांची सुधारणा, सिमेंट कॉक्रीट व उर्वरित रस्त्यांचे रूंदीकरण सुधारणा, सिमेंट कॉक्रटीकरण करण्याची कामे आवश्यक आहे. त्याशिवाय शहरात ३६ किमी रस्ते अस्तित्वात आहेत. परंतू ह रस्ते डी.पी. मध्ये दर्शविलेले नाहीत. सदर रस्ते फार पूर्वीपासून अस्तित्वात असल्याने व महानगरपालिकेने वेळोवेळी सुस्थितीत ठेवल्याने सदर रस्त्यांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांचे आवश्यकतेप्रमाणे रूंदीकरण मजबूतीकरण करणे आवश्यक आहे. तसेच ३३ किमी डी.पी. मध्ये दर्शविलेल्या परंतू अस्तित्वात नसल्याने रस्त्यांचे बांधकाम करणे आवश्यक आहे. हे सर्व रस्ते सिमेंट कॉक्रीटीकरणाने बांधणे असल्यास रू. ५६६.३७ कोटी अथवा डांबरीकरणाने बांधणे असल्यास रू. ३९५ कोटी खर्च अपेक्षित आहे.

शहर विकास आराखडयामध्ये पुढील ३० वर्षा करीता एकूण ५६४ कोटीची रस्त्यांची कामे प्रस्तावित असून सुरवातीच्या पाच वर्षामध्ये २८२ कोटीची कामे प्रस्तावित आहेत.

## ३) रेल्वे उड्डाणपूल, पादचारी पूल (एकूण तरतूद रू. १०.८० कोटी)

उल्हासनगर शहरामध्ये पुणे लिंक कडून येणारी वाहतूक पवई चौकातून जात असल्याने पवई चौकात वारंवार वाहतूक कोंडी होत असते. ही वाहतूक शहाडकडे जातांना सेक्शन १७ चौकातून जात असल्याने या चौकाचे व रस्त्यावर वाहतूकीची कोंडी असते. भविष्यात वाढणारी वाहतूक पहाता विठ्ठलवाडी स्टेशन जवळ पूणा लिंक रस्ता व शांतीनगर मध्ये कल्याण–अंबरनाथ रस्ता जोडणारा मार्ग व रेल्वे उड्डाणपूल बांधणे प्रस्तावित आहे. तसेच उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील अर्धवट असलेले पूलाचे बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहेत. तसेच उल्हासनगर रेल्वेस्टेशन जवळ उल्हासनगर–४ व उल्हासनगर–३ यांना जोडणारा पादचारी पूल २६ जूलै, २००५ च्या पूरामध्ये वाहून गेल्यानंतर याठिकाणी असलेला रेल्वेमार्गाखालील बोगद्यात नव्यानपे पादचारी पूल बांधणेस रेल्वे खाते तयार नाही. रेल्वेतर्फे येथे रेल्वे पादचारी पूल प्रस्तावित आहे. या कामास अंदाजे रू. ५० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

अशाप्रकारे दोन रेल्वे उड्डाणपुल एक पादचारी पूल यावर अंदाजे रू. १२ कोटी खर्च अपेक्षित आहे. सुरवातीच्या पाच वर्षाच्या कालावधीत रू. १०.८० कोटी खर्च अपेक्षित आहे.

## ४) ट्रक टर्मिनस इत्यादीसाठी (एकूण तरतूद रू. १५ कोटी)

उल्हासनगर शहरामध्ये असलेले उद्योगधंदे, वाहन दुरूस्ती केंद्र व दूकाने यामुळे शहरामध्ये रस्त्यांवर जडवाहनांची वर्दळ तसेच पार्किंग असते. उल्हासनगर शहरामध्ये सद्यस्थितीत मोठया ट्रकसाठी ट्रक टर्मिनस नाही. टेंपोसाठी हिराघाट येथे तात्पुरता स्टॅड आहे. तसेच नवजीवन बॅक, हुकूमतराय अपार्टमेंट, हॉस्पीटल रोड, येथे टेंमोची पार्किंग होते. त्यातून रस्त्यांवर वाहतूकीची नेहमी कोंडी असते. याकरीता विठ्ठलवाडी स्टेशनसमोरील पार्कींगच्या जागेमध्ये ट्रक टर्मिनस प्रस्तावित आहे. या कामास अंदाजे रू. १५.०० कोटी खर्च अपेक्षित आहे.

अ) शहरामध्ये पार्कींग सुविधा कामी रू. ५.०० कोटी खर्च गृहीत धरलेली आहे.

ब) रेल्वे स्टेशन लगतचा परिसर विकसीत करणेकामी रू. ५.०० कोटी खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रमाणे रू. ६५५ कोटी खर्च अपेक्षित असून त्यापैकी २०१२ पर्यंत रू. ३४५ कोटी खर्च अपेक्षित धरलेला आहे.

## ५) गरीबांकरीता मुलभूत सुविधा (**BSUP**) अंतर्गत (एकूण तरतूद रू. ६१७ कोटी)

या योजनेच्या दोन उप योजना आहेत १) गृहनिर्माण योजना २) मुलभूत सोयी सुविधा योजना. या योजना केंद्रशासन, राज्यशासन, महानगरपालिका, लाभार्थी यांच्या यथाचित सहकार्याने शासनाने आखून दिलेल्या प्रमाणात निधी उपलब्ध करून राबविणे आहे. गृहनिर्माण योजनेअंतर्गत केंद्रशासन ५० टक्के, राज्यशासन ३८ टक्के, महानगरपालिका २ टक्के लाभार्थी १० ते १२ टक्के असा सहभाग असणार आहे. मुलभूत सोयी सुविधा अंतर्गत केंद्रशासन ५० टक्के, राज्यशासन ३० टक्के, महानगरपालिका २० टक्के अशा प्रमाणात सहभाग असणार आहे. उल्हासनगर शहरामध्ये १३०० हेक्टर जागेमध्ये २८९ हेक्टर क्षेत्र झोपडपट्टयांनी व्यापलेले आहे. उल्हासनगर शहर पहिल्यापासून उद्योगधंद्यांचे शहर म्हणून ओळखले जात असल्याने रोजगारानिमित्त आलेल्या लोकांमुळे झोपडपट्टया वसल्या आहेत. या वस्त्यांमध्ये समाजाच्या विविध थरातील लोक राहत असून त्यात मागासवर्गीयांची संख्या जास्त आहे. या झोपडपट्टयांपैकी ४८ झोपडपट्टया घोषित असून ९१ झोपडपट्टया अघोषित आहे. बहूतांशी झोपडपट्टया महानगरपालिकेच्या विकास आराखडयात दर्शविलेल्या आरक्षित जागांवर वसल्या आहेत. झोपडपट्टयांमधील रहिवाशांचे रहिवास विभागात बहूमजली इमारती बांधून त्यामध्ये स्थलांतर करून आरक्षित भूखंडाचा महानगरपालिकेला उपयोग करता येईल. या करीता शहर विकास आराखडयात या योजनेअंतर्गत पहिल्या पाच वर्षाकरीता गृहनिर्माण योजनेअंतर्गत रू. ५०७ कोटी खर्चाची व अशा निर्माण होणा—या वसाहतींमध्ये रस्ते, ड्रेनेज, पाणीपूरवठा, रस्ते, दिवाबत्ती इ. मुलभूत सोयी सुविधांकरीता रू. ११० कोटी खर्चाची तरतूद अशी एकूण ६१७ कोटी खर्चाची तरतूद प्रस्तावित आहे.

## ६) पाणी पुरवठा योजना — रू. १३३.२४ कोटी

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाण्याच्या स्वतंत्र स्त्रोत, घेवून योजना नसल्यामुळे सद्यस्थितीत म. औ. विकास मंडळाकडून उल्हासनगर महानगरपालिका रू. ७००० प्रति द.ल.लि. या दराने शुध्द पाणी विकत घेते. या करीता उल्हासनगर महानगरपालिकेचा स्वत:चा पाण्याचा स्त्रोत विकसीत करणे आवश्यक आहे. या प्रकल्पाची माहिती खालील प्रमाणे आहे.

प्रस्तावित योजना सन २०३८ ची लोकसंख्या १०,८०,००० गृहीत धरून १९५ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेची प्रस्तावित केली असून या योजने मध्ये खालील कामाचा समावेश केलेला आहे.

१) उद्‌भव विहीर

२) पंपिग मशिनी व पंप हाऊस

३) प्रक्रिया पूर्व पाण्याची जलवाहीनी

४) जलशुध्दीकरण केंद्र

५) मुख्य संतूलन टाकी

६) शुध्द पाण्याची जलवाहीनी

७) उंच जल कुंभ

सदर योजना ''बांधा वापरा व हंस्तातरण'' करा या तत्वांवर करणे बाबतचा निर्णय झालेला आहे. परंतू काही कारणास्तव योजना न झाल्यास सदरची योजना जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान अभियान खाली घेण्यात आली आहे.

## ७) पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे बळकटीकरण करणे— रू. २५ कोटी

उल्हासनगर शहरातील अस्तित्वातील वितरण वाहिन्या फार जूने व पुरेशा व्यासाच्या नसल्यामुळे शहरात नव्याने वितरण वाहिन्या टाकण्याच्या कामाचा समावेश केला आहे. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर शहरातील पाणी पुरवठयात सुधारणा होईल.

## ८) पाणी पट्टी महसूल वाढविणे

मिटर पदधतीच्या अवलंब करणे:— रू. ३७.५० कोटी

उल्हासनगर शहरामध्ये घराच्या दर्जानुसार पाणी पट्टी आकारण्यात येते. त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

१) आर.सी.सी.छत — रू. १००/— प्रति माह

२) विटाचे बांधकाम — रू. ६०/— प्रति माह

१) झोपडपट्टी भागात — रू. ४०/— प्रति माह

शहरातील पाणी पट्टीची वसुली प्रत्यक्ष पाण्याचा वापरानुसार होण्याच्या दृष्टिने शहरातील सर्व नळजोडण्यांना मिटर बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाचा समावेश करण्यात आला आहे.

## ९) मलनिस्सारण योजना —— रुपये ४९१.५० कोटी

उल्हासनगर शहरासाठी तात्कालीन महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळातर्फे पुर्ण केलेली भुयारी गटार योजना व मलशुध्दीकरण केंद्र सन १९९४ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले. सध्याची लोकसंख्या व नव्याने विकसीत झालेल्या भागात भुयारी गटार योजना राबविणे व अस्तित्वातील भुयारी गटार योजनेचे बळकटीकरण करणे नव्याने जलशुध्दीकेंद्र बांधणे आवश्यक आहे.

१) अस्तित्वातील भुयारी गटार योजनेचे बळकटी करण करणे :— ३२८ कोटी

२) मलशुध्दीकरण केंद्र बांधणे :— १६२.५० कोटी

## १०) खेमानी नाला वळविणे —— रुपये १.३० कोटी

उल्हासनगर शहरातील खेमानाी भागातील नाला हा उल्हास नदिस महाराष्ट्र औ. विकास मंडळाच्या उद्‌भवाच्या वरच्या बाजुस मिळतो व त्यामुळे उल्हास नदिचे पाणी दुषित होते. तरी नदीतील प्रदुषण टाळण्यासाठी सदरचा प्रवाह वळविणे आवश्यक आहे.

## ११) वालधुनी नाला सुशोभीकरण —— रुपये २२ कोटी

अंबरनाथ येळुन उगम होणा—या वालधुनी नाल्यामध्ये अंबरनाथ शहराच्या सांडपाण्याचा प्रवाह औद्योगीक क्षेत्राचा प्रवाह तसेच उल्हासनगर शहराचा सांडपाण्याचा प्रवाह मिसळतो. सदर नाल्याच्या दोन्ही बांधानवर अतिक्रमणे झालेली असल्यामुळे नाल्याच्या प्रवाहात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे पावसाळयात नाले भोवतालच्या भागात पुरपरिस्थिती निर्माण होते. सदर प्रस्तावात नाल्याची रुंदी वाढविण्याचे दोन्ही बाजुस संरक्षण भिंती बांधणे व नाल्याचे सुशोभिकरण करण्याचे काम प्रस्तावीत करण्यात आले आहे.

## १२) घनकचरा व्यवस्थापन :—

उल्हासनगर शहराच्या २००१ च्या जनगणनेनुसार ४७३७३१ लोकसंख्येप्रमाणे २७६ टन कचरा निर्माण होत आहे. सद्यस्थितीत खाजगी ठेकेदारामार्फत घरोघर फिरुन कचरा गोळा करुन तसेच कचराकुंडीमध्ये जमा होणारा कचरा वाहतूक करुन राणा ट्रेडींग, उल्हासनगर—१ येथिल डंपींग ग्राउंडवर टाकला जात आहे. तसेच २५ एकरची क्षेत्रफळाची जागा कांबा गावाजवळ निश्चित केलेली आहे. परंतू अदयाप ताबा मिळालेला नाही. घनकचरा व्यवसीपन नियम २००० प्रमाणे सुधारणा करणे आवश्यक आहे. खाजगी ठेकेदारांची मुदत २०१३ पर्यंत आहे. या मुदतीत सद्यस्थितीत सुरु असलेली व्यवस्था सुरु राहणार असल्याने त्यापुढील कालावधीसाठी २०१३ पुढील कालावधीकरीता करावयाच्या उपाययोजना जसे की नव्याने मशिनरी खरेदी करणे, कचरा टाकण्याकरीता ४५ एकर क्षेत्रफळाइतकी जागा संपादन करणे, विकास करणे, घनकचरा विल्हेवाटीकरीता आवश्यकतेप्रमाणे प्रोसेसिंग प्लांट लावणे इत्यादींवरील खर्च गृहित धरला आहे. सन २०१२ ते २०३१ या कालावधीमध्ये उपरोक्त उपाय योजनांकरीता रुपये ३.८० कोटी खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त योजनांची आर्थिक वर्षनिहाय प्रस्तावित खर्च खालील तक्त्यात दिलेला आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | एकुण प्रस्तावित खर्च कालावधी | वर्षनिहाय आवश्यक तरतुद रु.(लाखात) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २००७—०८ | २००८—०९ | २००९—१० | २०१०—११ | २०११—१२ |
| १ | पाणी पुरवठा योजना | ११९२५ | ८७५ | १३७५ | ३२२५ | ३२२५ | ३२२५ |
| २ | मलनिस्सारण योजना | १४६५० | ३०० | ३५० | ४५०० | ५००० | ४५०० |
| ३ | प्रमुख नाले | २७३४ | १३० | १३०२ | १३०२ | —— | —— |
| ४ | घनकचरा व्यवस्थापन | —— | —— | —— | —— | —— | —— |
| ५ | वाहतूक सुधारणा योजना (रस्ते,पुल इ.) | ३४४८० | २१० | ११७४० | १२३२० | ६६५० | ३५६० |
| | **एकूण** | ६३७८९ | १५१५ | १४७६७ | २१३४७ | १४८७५ | ११२८५ |
| ६ | गरीबांसाठी मुलभुत योजना | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १) गृहनिर्माण योजना | ५०७१३ | ११६८३ | १८५२० | ९११६ | ५६९७ | ५६९७ |
| | २) मुलभूत सुविधा | १०९७८ | २५२९ | ४००८ | १९७३ | १२३४ | १२३४ |
| | **एकूण** | ६१६९१ | १४२१२ | २२५२८ | ११०८९ | ६९३१ | ६९३१ |
| | **एकूण** | १२५४८० | १५७२७ | ३७२९५ | ३२४३६ | २१८०६ | १८२१६ |

उपरोक्त योजनांची आर्थिक वर्षनिहाय प्रस्तावित बाजारभावासह खर्च खालील तक्त्यात दिलेला आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | एकुण प्रस्तावित खर्च कालावधी | वर्षनिहाय आवश्यक तरतुद रु.(लाखात) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २००७—०८ | २००८—०९ | २००९—१० | २०१०—११ | २०११—१२ |
| १ | पाणी पुरवठा योजना | १६१७१ | १०२० | १६९९ | ४२२५ | ४४७९ | ४७४७ |
| २ | मलनिस्सारण योजना | २०२४६ | ३५० | ४३३ | ५८९६ | ६९४४ | ६६२४ |
| ३ | वाहतूक सुधारणा योजना | ४५३७१ | २४५ | १४५१० | १६१४१ | ९२३५ | ५२४० |
| ४ | नाले | ३४६७ | १५२ | १६०९ | १७०६ | —— | —— |
| ५ | गृहनिर्माण योजना | ६४७५३ | १३६२२ | २२८९० | ११९४४ | ७९१२ | ८३८६ |
| ६ | मुलभुत सुविधा | १४०१८ | २९४९ | ४९५४ | २५८५ | ७७१४ | १८१७ |
| | **एकूण** | १६४०२५ | १८३३८ | ४६०९५ | ४२४९६ | ३६२८३ | २६८१५ |

उपरोक्त नमुद केल्यानुसार JNNURM वरील रु. ३६७.८९ कोटी व BSUP अंतर्गत रु.६१६.९१ कोटी अशा रु. १२५५ कोटी या प्रस्तावित खर्चाची तरतूद सन २००७—२००८ ते सन २०११—१२ या कालावधीकरीता म्हणजेच एकूण पाच वर्षाच्या कालावधीकरीता असून, प्रचलित दरवाढीचा अंदाज घेता वरील विवरणाप्रमाणे प्रतिवर्षी अपेक्षित खर्चानुसार होणारी भाववाढ विचारात घेवून एकूण खर्च १६४० कोटी इतका अपेक्षित आहे व उल्हासनगर महानगरपालिकेस खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे आर्थिक तरतूद पुढील प्रत्येक वर्षी करणे अत्यावश्यक आहे.

## जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत खर्चाचा सहभाग दर्शविणारा तक्ता

| .क्र. | सहभागाचे प्रमाण | एकूण प्रस्तावित खर्च कालावधी २००७—२०१२ | वर्ष ०७—०८ | वर्ष ०८—०९ | वर्ष ०९—१० | वर्ष १०—१२ | वर्ष ११—१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्रशासन | २२३२६ | ५३० | ५१६८ | ७४७१ | ५२०६ | ३९५० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अनुदान ३५ टक्के | | | | | | |
| २ | राज्य शासन अनुदान १५ टक्के | ९५६८ | २२७ | २२१५ | ३२०२ | २२३१ | १६९३ |
| ३ | महानगरपालिका सहभाग ५० टक्के | ३१८९५ | ७५८ | ७३८४ | १०६७४ | ७४३८ | ५६४३ |
| | **एकूण** | ६३७८९ | १५१५ | १४७६७ | २१३४७ | १४८७५ | ११२८५ |

## गरीबांसाठी मुलभूत सुविधा [BSUP] अंतर्गत खर्चाचा सहभाग दर्शविणारा तक्ता

| सहभाग | सहभागाची टक्केवारी | भांडवली खर्च | वर्ष ०७–०८ | वर्ष ०८–०९ | वर्ष ०९–१० | वर्ष १०–१२ | वर्ष ११–१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| केंद्रशासन | गृहनिर्माण ५० टक्के | २५३५७ | ५८४२ | ९२६० | ४५५८ | २८४९ | २८४९ |
| | मुलभुत सुविधा ५० टक्के | ५४८९ | १२६५ | २००४ | ९८७ | ६१७ | ६१७ |
| राज्यशासन | गृहनिर्माण ३८ टक्के | १९२७१ | ४४४० | ७०३८ | ३४६४ | २१६० | २१६५ |
| | मुलभुत सुविधा ३० टक्के | ३२९३ | ७५९ | १२०२ | ५९२ | ३७० | ३७० |
| लाभार्थी | गृहनिर्माण १० टक्के | ५०७१ | ११६८ | १८५२ | ९१२ | ५७० | ५७० |
| | मुलभुत सुविधा –– | –– | –– | –– | –– | –– | –– |
| | | | | | | | |
| महानगरपालिका | गृहनिर्माण २ टक्के | १०१४ | २३४ | ३७० | १८२ | ११४ | ११४ |
| | मुलभुत सुविधा २० टक्के | २१९६ | ५०६ | ८०२ | ३९५ | २४७ | २४७ |
| **एकूण गृहनिर्माण** | | ५०७१३ | ११६८३ | १८५२० | ९११६ | ५६९७ | ५६९७ |
| **एकूण मुलभुत सुविधा** | | १०९७८ | २५२९ | ४००८ | १९७३ | १२३४ | १२३४ |
| **एकूण** | ० | ६१६९१ | १४२१२ | २२५२८ | ११०८९ | ६९३१ | ६९३१ |

| अ.क्र. | सहभागाचे प्रमाण | एकूण प्रस्तावित खर्च कालावधी २००७–२०१२ | वर्ष ०७–०८ | वर्ष ०८–०९ | वर्ष ०९–१० | वर्ष १०–१२ | वर्ष ११–१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्रशासन अनुदान | ५३१७२ | ७६३६ | १६४३२ | १३०१६ | ८६७२ | ७४१५ |
| २ | राज्यशासन अनुदान | ३२१३३ | ५४२५ | १०४५५ | ७२५८ | ४७६६ | ४२२८ |
| ३ | महानगरपालिका सहभाग | ३५१०४ | १४९७ | ८५५६ | ११२५० | ७७९८ | ६००३ |
| ४ | लाभार्थी | ५०७१ | ११६८ | १८५२ | ९१२ | ५७० | ५७० |
| | **एकूण** | १२५४८० | १५७२७ | ३७२९५ | ३२४३६ | २१८०६ | १८२१६ |

सदर जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानात महापालिकेचा हिस्सा ५० टक्के असल्याने प्रस्तावित करण्यात येत असलेल्या ६३७.८९ कोटीच्या आराखडयासाठी पुढील पाच वर्षात महापालिकेस ३१८.९५ कोटी रुपये शासनाकडुन मिळू शकतील व महापालिकेचा सहभाग ३१८.९५ कोटी रुपयांचा असेल. गरीबांसाठी मुलभूत सोयी सुविधा **[BSUP]** अंतर्गत गृहनिर्माण योजना केंद्र शासन : महाराष्ट्र शासन : महानगरपालिका : लाभार्थी यांनी करावयाच्या निधीचा सहभाग अनुक्रमे ५० टक्के : ३८ टक्के : २ टक्के : १० ते १२ टक्के असा आहे. या योजनेकरीता महानगरपालिकेस १०.१४ कोटी निधी उभारावा लागेल. मुलभुत सोयीकरीता केंद्र शासन : महाराष्ट्र शासन : महानगरपालिका यांचा निधीचा सहभाग अनुक्रमे ५० टक्के : ३० टक्के : २० टक्के असा आहे. त्यामुळे १०९.७८ टक्के कोटीच्या या योजनेकरीता रुपये २१.९६ कोटी इतका असणार आहे.

अशा प्रकारे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी अभियान **[JN NURM]** व गरीबांसाठी मुलभूत सोयी सुविधा **[BSUP]** या दोन्ही योजनेकरीता वर्ष २००७ ते २०१२ या पाच वर्षाच्या कालावधीकरीता रुपये ३५१.०० कोटी इतका निधी उभा करावा लागेल.

रुपये ३५१.०० कोटी इतका निधी उपलब्ध होणेकरीता अभियान कालावधीत सक्तीच्या तसेच वैकल्पिक सुधारणाद्वारे वाढीव निधी उभारणे अनिवार्य राहिल. महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती विचारात घेता यापेक्षा अधिक रक्कमेचा कार्यक्रम केल्यास महापालिकेस आर्थिक अडचण निर्माण होवू शकेल, तसेच यापेक्षा कमी रक्कमेचा आराखडा तयार केल्यास महानगरपालिका शासनाच्या अनुदानापासून वंचित राहिल. तसेच अभियानाचा हेतूही साध्य होणार नाही. त्यामुळे सादर केलेल्या आराखडयाचे स्वरुप हे इष्टत्तम तसेच पर्याप्त आहे व त्यास मंजूरी देणे आवश्यक आहे.

अभियानात समाविष्ट करावयाच्या भांडवली कामांवरील देखभाल दुरुस्ती खर्च हा साधारण वार्षिक १० टक्के म्हणजे १० कोटी अभिप्रेत आहे व सदर रक्कम ही कर दरातील सुधारणांद्वारे तसेच उपभोक्ता सेवाशुल्क वसुलीतुन भागविले जाणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या हिश्श्याची रक्कम प्रचलित अंदाजपत्रक विचारात घेता कर्ज घेवुन उभी करणे अनिवार्य आहे व २९३ कोटी रुपये कर्जाच्या मुद्दल व व्याजाच्या परतफेडीसाठी वार्षिक रु. ३३ कोटी रक्कम आवश्यक राहिल. म्हणजेच अभियानात प्रस्तावित केलेली सर्व भांडवली कामे हाती घेतल्यास वार्षिक ३३ कोटी रुपये वाढीव वित्तीय दायित्व येणे अपेक्षित आहे व सदर रक्कम ही कर सुधारणा व सेवाशुल्क दरवाढ उत्पन्नातून भागविल्याशिवाय अन्य पर्याय नाही.

उपरोक्त आर्थिक आकृतीबंधाप्रमाणे नियोजन करणे. उल्हासनगर महानगरपालिकेस आवश्यक आहे. सदर अभियानात भाग घेण्यासाठी प्रथमत: उल्हासनगर शहराचा विकास आराखडा (City Development Plan) मा. राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक आहे. व उपांगांचे तपशिलवार प्रकल्प अहवाल मा. महासभेच्या मंजूरीने राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडून मंजूर करून घेणे अशा प्रकारे अभियानांअंतर्गत

कार्यप्रणाली पार पाडावयाची आहे. या अभियानात भाग घेऊन निधी प्राप्त होण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका, राज्य शासन व केंद्र शासन यांचे दरम्यान केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार करारनामा करून देणे आवश्यक आहे.

या योजनेअंतर्गत सदर अभियानात करावयाच्या करारनाम्याव्दारे विविध प्रकारच्या खालील सक्तीच्या व वैकल्पिक सुधारणा करणे बंधनकारक राहणार आहे.

## सक्तीच्या सुधारणा :—

१) महानगरपालिकेच्या लेखा पध्दतीमध्ये, अत्याधुनिक व्दिनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करणे.
२) विविध नागरी सेवांसाठी संगणीय (इ गव्हर्नस)पध्दती सुरू करून 'जीआयएस' व 'एमआसएस' पदधतीचा अवलंब करणे.
३) जीआयएस पदधतीचा कार्यक्षम पध्दतीने मालमत्ता कर आकारणीमध्ये अवलंब करून उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत बनेल, त्यासाठी मालमत्ता करामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.
४) उपभोक्ता शुल्क आकारणी (User Charges) सुरू करणे, जेणेकरून योजनेतील कामांबाबतचा ऑपरेशन व मेंटेनन्स खर्च पुढील सात वर्षात वसूल करणे आवश्यक असेल
५) नागरी गरीब वर्गासाठी मुलभूत सुविधा पुरविण्याकरीता तरतूद करणे.
६) नागरी गरीब वर्गासाठी मुलभूत सुविधा पुरविणे या अंतर्गत गृह सुधारणा, पाणी पुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण इत्यादीचा समावेश असणे.

## वैकल्पिक सुधारणा :—

१) इमारत बांधकाम तसेच मालमत्ता विकसित करणेच्या मंजूरीची पध्दती सुटसुटीत व सुलभ होण्याच्या दृष्टीने संबंधीत उपविधी (बायलॉज ) मध्ये आवश्यक सुधारणा करणे.
२) प्रॉपर्टी टायटल सर्टिफिकेशन करणेची कार्यवाही सुरू करणे (महापालिका स्तरावर)
३) आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांकरीता गृह प्रकल्प राबविणेसाठी २० ते २५ टक्के विकसीत जागा राखून ठेवणे.
४) भूखंड व मालमत्ता नोंदणीचे संगणकीकरण करणे.
५) सर्व इमारतींमध्ये 'रेन वॉटर हारवेस्टींग' सक्तीचे करणेबाबत उपविधीमध्ये सुधारणा करणे.
६) रि—सायकल पाण्याचा पुन्हा वापर करणेसाठी उपविधीमध्ये तरतुद करणे.
७) आस्थापना खर्च कमी करण्यासाठी स्वेच्छानिवृत्ती योजना आणणे तसेच निवृत्त झालेली पदे कमी करणे.

उल्हासनगर महानगरपालिका हे चार लक्षपेक्षा जास्त लोकसंख्येचे शहर असल्याने, उल्हासनगर महानगरपालिकेचा समावेश , जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान अभियानात MMRDA मध्ये समाविष्ट न करता स्वतंत्र शहर म्हणून करणेस शासनास शिफारस करावी, कारण त्यामुळे महानगरपालिकेचा वाटा ५० टक्के ऐवजी ३० टक्के होईल असेही प्रस्तावित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रस्तावास मा. महासभेची मान्यता आवश्यक असून प्रस्तावांतर्गत मा. महासभेची खालील बाबींना मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) शहर विकास आराखडयास मंजूरी देणे.
२) महानगरपालिकेने करावयाच्या वैकल्पिक व सक्तीच्या सुधारणांना मंजूरी देणे.
३) विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यासाटी समंत्रक नेमण्यास व त्यासाठी लागणा—या खर्चास मंजूरी देणे.
४) जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पूनर्निर्माण अभियानांतर्गत विविध प्रकल्प समन्वय अभिकर्ता नियुक्ती करणे व शासनास अहवाल सादर करणेस व शासनाबरोबर विविध करारनामे करण्यास व इतर सर्व औपचारीक बाबी हाताळण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणे.
५) सदर गोषवा—यात दाखविल्याप्रमाणे दरवर्षी/प्राधान्याने अंदाजपत्रकीय तरतूद करण्यास मंजूरी देणे.
६) विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यासाठी आणि गरज भासल्यास खुल्या बाजारातून कर्ज उभारण्यास आयुक्तांना प्राधिकृत करणे.

७) सर्वसाधारण मिळकत कर सध्या २६.०० टक्के सदर दर २००३—०४ सालापासून सुधारीत केलेला नाही. जवाहरलाल नेहरू अभियानात सदर कर हा महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत करणे अनिवार्य असल्यामुळे अर्थसंकल्पात आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यास मंजूरी देणे.

८) सक्तीच्या सुधारणांमधील उपभोक्ता शुल्क व सेवांचे दर हे प्रत्यक्ष खर्चावर आधारीत ठरविणे आवश्यक असल्याने असे कराचे दर ठरविण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करणे. त्यापैकी पाणी पुरवठा दरामध्ये सुधारणा करण्याबाबतचे अर्थसंकल्पात आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यास मंजूरी देणे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेकरीता सादर करण्यात येत आहे. यासाठी महासभेची विशेष सभा बोलावण्यात यावी.

<u>विशेष महासभा ठराव क्र. ३४</u> <u>दिनांक :—१३/७/२००७</u>

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :—श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेस अनुसरुन उल्हासनगर महानगरपालिकेस जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानात सहभागी होण्यास तसेच त्या अंतर्गत घेण्यात येणा—या विविध प्रकल्पांना खालील बाबींच्या अंर्तभावांसह मान्यता देत आहे.

१) शहर विकास आराखडयास मंजूरी देणे.

२) महानगरपालिकेने करावयाच्या वैकल्पिक व सक्तीच्या सुधारणांना मंजूरी देणे.

३) विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यासाटी समंत्रक नेमण्यास व त्यासाठी लागणा—या खर्चास मंजूरी देणे.

४) जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पूनर्निर्माण अभियानांतर्गत विविध प्रकल्प समन्वय अभिकर्ता नियुक्ती करणे व शासनास अहवाल सादर करणेस व शासनाबरोबर विविध करारनामे करण्यास व इतर सर्व औपचारीक बाबी हाताळण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणे.

५) सदर प्रस्तावनेत दाखविल्याप्रमाणे दरवर्षी/प्राधान्याने अंदाजपत्रकीय तरतूद करण्यास मंजूरी देणे.

६) विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यासाठी आणि गरज भासल्यास खुल्या बाजारातून कर्ज उभारण्यास आयुक्तांना प्राधिकृत करणे.

७) सर्वसाधारण मिळकत कर सध्या २६.०० टक्के सदर दर २००३—०४ सालापासून सुधारीत केलेला नाही. जवाहरलाल नेहरू अभियानात सदर कर हा महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत करणे अनिवार्य असल्यामुळे अर्थसंकल्पात आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यास मंजूरी देणे.

८) सक्तीच्या सुधारणांमधील उपभोक्ता शुल्क व सेवांचे दर हे प्रत्यक्ष खर्चावर आधारीत ठरविणे आवश्यक असल्याने असे कराचे दर ठरविण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करणे. त्यापैकी पाणी पुरवठा दरामध्ये सुधारणा करण्याबाबतचे अर्थसंकल्पात आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यास मंजूरी देणे.

सुचकांची सही/—

अनुमोदकांची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २:— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी शहरामध्ये प्रवासी बससेवा सुरु करणे.**

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापालिका सचिव :—</u> पास? सर्वसंमतीने?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> आयुक्त साहेब, आम्ही ठराव पारीत करत आहोत परंतु ही बससेवा किती दिवसामध्ये चालु होईल? ती कधी पर्यंत आपण मंजुर करुन घेवुन याल?

<u>काही सदस्य :—</u>लवकरात लवकर.....

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> लवकरात लवकर म्हणजे? आपण जरा ऐकुन तर घ्या, आपण किती दिवसामध्ये मंजुरी मिळवाल? तसेच ज्या काही आपण अटी शर्ती ठेवणार आहोत त्यामध्ये ही एक अट असली पाहिजे की, जे ज्येष्ठ नागरीक आहेत त्यांच्यासाठी या बसचा पास निशुल्क असला पाहिजे. तसेच उल्हासनगर महापालिकेचे जेवढे नगरसेवक आहेत, त्यांना सुध्दा निशुल्क बससेवा मिळाली पाहिजे. मी तर कधी बसने प्रवास करत नाही. परंतु कधी बसने प्रवास करण्याचे मन झाले तर त्यासाठी या महापालिकेच्या सर्व नगरसेवकांना बससेवा निशुल्क असली पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, आम्ही सुध्दा बससेवेच्या या प्रस्तावाचे समर्थन करतो. या शहरामध्ये बससेवा चालली पाहिजे. शहरवासियांना ही सुविधा मिळाली पाहिजे. फक्त एका गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. यासाठी आपण जी निविदा मागवाल किंवा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर दयाल यापैकी जी काही योजना असेल त्याबाबतीत सांगु इच्छितो की आजपर्यंत मागविलेल्या निविदांबाबतीत जे काही घडले आहे ते याबाबतीत घडु नये. उदाहरणादाखल मी सांगु इच्छितो की पाणी पुरवठयाची चार निविदाकारांनी निविदा भरली होती. त्याबाबत प्रशासनाने स्वत: लिहून दिले होते की, यापैकी कुणीही पात्र नाही. त्यानंतरही त्यातील एकास निविदा देण्यात आली. या सर्व बाबी आपण लक्षात घ्या. कारण की याबाबतीत आम्ही तक्रार केली असुन त्याची चौकशी करण्याबाबतीचे पत्र आपणाकडे येणार आहे. म्हणुन या प्रस्तावाबाबतसुध्दा असे काही होवु नये. निविदा मागविण्याची सुचना राष्ट्रीय वृत्तपत्रात प्रसिध्द झाली पाहिजे. व याबाबतीत कोणतीही तक्रार येणार नाही याबाबीकडे आपण लक्ष दयावे. बाकी या प्रस्तावास आमचे समर्थन आहे.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—</u>मा. महापौरजी, या कामी परिवहन समितीची स्थापना लवकरात लवकर करण्यात यावी. आणि हे काम समितीच्या ताब्यात दयावे ही तुम्हांस विनंती आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मी सभागृहास सांगु इच्छितो की, हा फक्त धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे. कोणती निविदा काढली जात नाही?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> निविदा काढत नाहीत बरोबर आहे परंतु आयुक्तांना प्राधिकृत तर करत आहात ना? काय—काय पाहिजे ते त्यांना सांगा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>त्याबाबत तर आम्ही बसुन निर्णय घेवु.

**<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :</u>**–मा. महापौर, मा. उप–महापौर, मा. आयुक्त साहेब, आपल्या शहरामध्ये प्रवासी बससेवा सुरु होत आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे परंतु एका गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधु इच्छितो की उल्हासनगर शहर अतिशय लहान शहर असुन ते फक्त १३ चौरस मिटरचे आहे. आमच्या शहरातील बरेचसे लोक नोकरी व्यवसाय निमित्त वाशी, भिवंडी पर्यंत जातात. ही बससेवा तेथपर्यंत लागु केल्यास अधिक चांगले होईल. १३ चौरस किलोमिटरच्या शहरात बससेवा चालु करण्यास आपण बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर निविदा काढली तर कदाचित कुणी या कामी प्रतिसाद सुध्दा देणार नाही असे मला वाटते. यासाठी या बस सेवेसाठी भिवंडी वाशी पर्यंतचे क्षेत्र विस्तारीत केले तर खुप चांगले होईल.

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :</u>**–मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आपण ही जी बससेवा सुरु करत आहोत त्यापुर्वी आपण उल्हासनगरची स्थिती पाहिली पाहिजे. शहरामध्ये रस्ते बरोबर नाही. नेहरु चौक ते सिरु चौक हा जो बाजारपेठेचा विभाग आहे तेथुन बस जावु शकते काय? म्हणुन सर्वात प्रथम रस्त्यांची रुंदीकरण करुन चांगले रस्ते तयार करा. आज अशी स्थिती आहे की, नागरीक आपली स्वत:ची गाडी घेवुन जावु शकत नाही. शहरामध्ये बससेवा सुरु होते त्यास आमचा विरोध नाही ही एक आनंदाची गोष्ट आहे. नेहरु चौक ते सिरु चौक हा रस्ता अतिशय अरुंद आहे तेथुन या बस सुरु केल्यास अगोदरच्या वाहतुक कोंडीमध्ये वाढ होवुन आणखी वाहतुकीची कोंडी होईल. रोजच्या रोज शहरामध्ये अपघाताच्या घटना घडतात. म्हणुन शहरातील रस्त्यांचे रुंदीकरण करुन नंतरच बससेवा सुरु करावी.

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :–** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी शहरामध्ये प्रवासी बससेवा सुरु करणे.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२०) अन्वये नमुद आहे की, **''शहरात किंवा शहराबाहेरील लोकांची किंवा मालाची ने–आण करण्यासाठी छोटे लोहमार्ग, ट्राममार्ग बांधणे, बिनरूळाच्या ट्रामगाडया खरेदी करणे किंवा मोटर परिवहनाच्या सोयी संघटीत करणे व वरील सर्व गोष्टी सुस्थितीत राखणे किंवा त्यांची व्यवस्था पाहणे.''**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठी शहरामध्ये प्रवासी बस सेवा या पूर्वी एस.टी. महामंडळाकडून कार्यरत होती. परंतू मंडळाची ही सेवा तोटयात चालल्यामुळे काही वर्षापासून ही सेवा बंद करण्यात आलेली आहे.

शहराचा वाढता विस्तार व नागरीकांची आवक जावक खूप प्रमाणात वाढली आहे. सद्यपरिस्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेचे आर्थिक परिस्थिती सबळ नसल्यामुळे महानगरपालिका हा उपक्रम स्वत: स्वतंत्रपणे राबविण्यास असमर्थ आहे.

करीता ही सेवा खाजगी संस्थेमार्फत सुरू करणे योग्य राहील. जेणे करून नागरीकंना सेवाही मिळेल व महापालिकेला काही आर्थिक उत्पन्नही होईल.

यासाठी एस.टी. महामंडळाची व परिवहन विभागाची मंजूरी/नाहरकत दाखला आणि शासनाच्या मंजूरीच्या आधिन शासन नागरीक भागीदारी किंवा बिल्ट ओन ऑपरेट ट्रान्सफर या तत्वाखाली योजना राबविणे योग्य वाटते.

या उपक्रमासाठी महापालिकेमार्फत कोणताही खर्च केला जाणार नाही. तसेच व्यवस्था पाहता येणार नाही. बस सेवा कर्मचा–यांचा उल्हासनगर महानगरपालिकेशी काही सबंध राहणार नाही. कारण ते निश्चित केलेल्या कंत्राटदार यांचे कर्मचारी असतील. व त्यांना म.न.पा. च्या नोकरी बाबतचा हक्क मागता येणार नाही. तसेच त्यांचा महानगरपालिका कार्यालयासशी नोकरीचा हक्क प्रस्थापित होणार नाही.

निश्चित केलेल्या कंत्राटदार शासनाचे परिवहन विभागाच्या व इतर विभागाशी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करील तसेच सर्व शासकीय कर भरण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांची असेल.

उपक्रम राबवितांना अपघातातुन उद्‌भवणारे सर्व नुकसान भरपाई तसेच मदत देणे, वैद्यकीय मदत इत्यादीची जबाबदारी उल्हासनगर महानगरपालिकेवर राहणार नाही तर ती जबाबदारी संपुर्णपणे निश्चीत केलेल्या कंत्राटदार यांची असेल.

उल्हासनगर महानगरपालिका आणि परिवहन प्रकल्पासाठी निश्चित केलेल्या कंत्राटदार यांच्यामध्ये सामंजस्य करार ५ वर्षाचे कालावधीसाठी शासनाच्या मंजूरी नंतर करण्यात येईल. निश्चित केलेल्या कंत्राटदार वाहन इंधन तसेच चालक व वाहक सहीत उल्हासनगर म.न.पा. ला उपलब्ध करावी लागेल. व उल्हासनगर महापालिके अंतर्गत परिवहन उपक्रम या नावाने बस सेवा चालविण्यात येईल.

अकोला महानगरपालिकेनेही अशी योजना त्यांच्या क्षेत्रात महासभा ठराव क्र.६ दि. ०७/०५/२००७ अन्वये मंजूर करून राबविलेली आहे व ती व्यवस्थित कार्यरत आहे.

सदर प्रवासी बस सेवा उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रा मध्ये राबविण्या करीता पुढील बाबींची मान्यता महासभेकडून मिळणे आवश्यक वाटते.

१. महानगरपालिके अंतर्गत परिवहन उपक्रम स्थापित करण्याची मंजूरी देवून उल्हासनगर महानगरपालिका परिवहन उपक्रम या नावाने प्रवासी बस चालविण्याची मान्यता देणे.

२. परिवहन समिती स्थापन होई पर्यंतचे कालावधी पर्यंत स्थायी समितीच्या आधीन राहून प्रवासी बस सेवा योजना राबविण्यात येईल. तसेच परिवहन व्यवस्थापक यांची नियुक्ती होई पर्यंत आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या आधिन परिवहन योजना राबविण्यात येईल.

३. नागरीकांच्या तसेच महानगरपालिकेच्या मागणी नुसार वेळोवळी व्यावसायीक दृष्टया योग्य अशा मार्गावर बससेवा उपलब्ध करण्यासाठी व लागणा—या बसेसची संख्या व बसचा प्रकार इत्यादीसाठी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना प्राधिकृत करावे लागेल.

४. सदर प्रवासी बस सेवा खाजगी संस्थेमार्फत सुरू करणे करीता, शासनाचे विविध विभागांकडे पत्रव्यवहार करणे करीता तसेच अटी व शर्ती निश्चिती व निविदा करणेस आयुक्त यांना प्राधिकृत करावे लागेल.

सदर प्रस्ताव जनतेच्या सवलतीच्या दृष्टीने महासभेपुढे चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यासाठी सादर.

<u>विशेष महासभा ठराव क्र.</u> ३५ <u>दिनांक :—१३/७/२००७</u>

**सुचकाचे नाव :—श्री. मोहन साधवानी**

**अनुमोदकाचे नाव :—श्री. विनोद ठाकुर**

ही महासभा वरील प्रस्तावास अनुसरुन एस.टी. महामंडळाची व परिवहन विभागाची मंजूरी/ ना हरकत दाखला व शासनाच्या मंजूरीच्या अधिन शासन नागरीक भागीदारी किंवा बिल्ट ओन ऑपरेटर ॲण्ड ट्रान्सफर या तत्वाखाली उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रवासी बस सेवा योजना राबवण्यिास खालील बाबींच्या अंर्तभावासह मान्यता देत आहे.

१. महानगरपालिके अंतर्गत परिवहन उपक्रम स्थापित करण्याची मंजूरी देवून उल्हासनगर महानगरपालिका परिवहन उपक्रम या नावाने प्रवासी बस चालविण्याची मान्यता देणे .

२. परिवहन समिती स्थापन होई पर्यंतचे कालावधी पर्यंत स्थायी समितीच्या आधीन राहून प्रवासी बस सेवा योजना राबविणे. तसेच परिवहन व्यवस्थापक यांची नियुक्ती होई पर्यंत आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या आधिन परिवहन योजना राबविणे.

३. नागरीकांच्या तसेच महानगरपालिकेच्या मागणी नुसार वेळोवळी व्यावसायीक दृष्टया योग्य अशा मार्गावर बससेवा उपलब्ध करण्यासाठी व लागणा—या बसेसची संख्या व बसचा प्रकार इत्यादीसाठी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना प्राधिकृत करणे.

४. सदर प्रवासी बस सेवा खाजगी संस्थेमार्फत सुरू करणे करीता, शासनाचे विविध विभागांकडे पत्रव्यवहार करणे करीता तसेच अटी, शर्ती निश्चिती व निविदा करणेस आयुक्त यांना प्राधिकृत करणे

सुचकांची सही/–

अनुमोदकांची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u>पुढील सभा सुरु करायची काय?

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३०/७/२००७

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३०/७/२००७ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.**

वि—३

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा सोमवार दिनांक ३०/७/२००७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

५. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

६. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३६ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३८ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३९ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४० | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४१ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४२ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४३ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४४ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्री. विजय खंडु सुपळे | ४५ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४६ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४७ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४८ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४९ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५० | श्री. किशोर जग्यासी |
| १८ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५१ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १९ | श्री. राजू जग्यासी | ५२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २२ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५५ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २३ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ५७ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५८ | श्री. मोहन साधवाणी |
| २६ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५९ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २७ | श्री.नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६० | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २८ | श्री. लाल पंजाबी | ६१ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २९ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६२ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३० | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६३ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३१ | श्रीमती शकुंतला पाटील | ६४ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३२ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६५ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३३ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६६ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३४ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६७ | श्री. मुकेश सोहन तेजी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६८ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती संगीता राजेश कंडारे, २. श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी, ३. श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा, ४. श्री.एडके गणपत गोविंद, ५. श्रीमती महाडीक रजनी मोहन, ६. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, ७. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष

खालील अधिकारी सभेस हजर होते.

३८.श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
३९.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४०.श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
४१.श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
४२.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
४३.श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
४४.श्री. अ.पा. गुरगुळे, नगररचनाकार
४५.डॉ. जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
४६.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
४७.श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
४८.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
४९.श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता, पा.पु.
५०.श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, महाराष्ट्राच्या प्रथम महिला राष्ट्रपती झाल्या आहेत. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात यावे. अशी मी सभागृहाला, मा. महापौरांना व आयुक्तांना विंनती करते. महाराष्ट्राच्या प्रथम महिला राष्ट्रपती झाल्या आहेत.

---

## अभिनंदन प्रस्ताव

सुचकाचे नाव :– श्रीमती सुरेखा वेलकर

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मालती करोतिया

''जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।। तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा ।।'' या संत तुकारामांच्या ओळीचे स्मरण करत नवनिर्वाचीत राष्ट्राध्यक्षा प्रतिभाताई पाटील यांनी गोर–गरीबांच्या हितासाठी काम करण्याचा संकल्प सोडला. आणि देशाच्या तेराव्या राष्ट्रपती म्हणुन प्रतिभाताईंच्या रुपाने प्रथमच एक महिला या सर्वोच्च पदी व तीन्ही दलांच्या सर सेनापती पदी अरुढ झाली.

प्रतिभाताईंच्या कौटुंबिक पाश्वभुमीला सामाजीक व राजकीय कार्याचा उज्वल वारसा लाभला आहे. व्यवहारकुशलता, धोरणीपणा, सुसंस्कार, व प्रगतीचे पंख लाभलेल्या प्रतिभाताईंनी उच्च शिक्षणा सोबतच सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि विनम्रता या मुल्यांचा अंगीकार करुन सतत त्यांची जोपासना केली. त्यांच्यावरील संस्काराचे प्रतिबींब त्यांच्या प्रत्येक व्यवहारातुन उमटलेले दिसते. प्रतिभा ताईंच्या व्यक्तीमत्वात परंपरा आणि आधुनिकतेचा सुरेख संगम झालेला आहे. नव्या युगाचे नवे ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा अभिमान जोपासतांना त्यांनी भारतीय संस्कृती आणि परंपरेचा विसर पडु दिला नाही. एक प्रगल्भ आणि परिपक्क व्यक्तिरेखा त्यांनी राजकिय, सामाजिक जीवनात सशक्तपणे उभे केली आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक बाणा असलेले हे सुसंस्कुत व्यक्तीमत्व आहे. मुर्तीमंत ऋजुता, सात्विकता आणि शालिनता ही विशेषण प्रतिभाताईंच्या व्यक्तिमत्वाकडे पाहिल्यानंतर डोळयासमोर उभी राहतात. सोज्ज्वळ, सुस्वभावी, सौजन्यशील अशा गुणसमुच्चयांच्या धनी प्रतिभाताई प्रसंगी तितक्याच कठोर आणि कणखर भूमिका निभवतात. प्रतिभाताईंच्या डोईवरील पदर जसा कधी ढळला नाही तसे चेह–यावरील स्मितही कधी मावळले नाही. त्यामुळे सर्वपक्षीयांकडून त्यांना सदैव आदर आणि सन्मान लाभला. यामूळे मराठी मनाला झालेला आनंद अवर्णनीय आहे. म्हणुन उल्हासनगर महानगरपालिकेतील सर्व राजकीय पक्षांतर्फे त्यांचे अभिनंदन करण्याचे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ३५ क</u> <u>दिनांकः– ३०/७/२००७</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार भारताच्या तेराव्या राष्ट्रपती पदावर निवडून आलेल्या मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे अभिनंदन करीत आहे. आणि त्यांचा कार्यकाळ यशस्वी होवो अशी आशा व्यक्त करत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, गेल्या तीन–चार महिन्यापासुन विरोधी पक्ष नेत्याच्या नेमणुकीचा मुद्दा आपण प्रलंबित ठेवत आला आहात. मी आज पुन्हा एकदा आपणांस निवेदन करेन की, असा नियम आहे की, आपणांस विरोधी पक्ष नेता निश्चीत करावयाचा आहे व त्याची घोषणा सभागृहात करावयाची आहे. आजपर्यंत जे सभागृह चालले ते विरोधी पक्ष नेत्याविना. म्हणुन मी आपणांस पुन्हा एकदा निवेदन करेन की, मा. उप–महापौरजी, सभेच्या अगोदरच आपणाशी माझे बोलणे झाले. आपली भावना जाणुन मी खुपच खुष झालो. व त्याबद्दल मी आपली प्रशंसा करतो. म्हणुन मी संपुर्ण सभागृहासमोर पुन्हा एकदा निवेदन करतो की, विरोधी पक्ष नेत्याची आज घोषणा केली जावी धन्यवाद । मा. महापौरजी आपणांस माझी विनंती राहील की, आपण जी काही घोषणा कराल ती कायदेशीर असली पाहिजे. व मी विनंती करेन की याबाबतची घोषणा मा. महापौर करतील तर मला खुप आनंद होईल. कारण की, आज त्या या सर्वोच्च पदावर आहेत. उप–महापौरजी, माझी आपणांस विनंती आहे की, मा. महापौर आजपर्यंत महासभेत कधी बोलल्या नाहीत. मला असे वाटते की, त्यांनी याबाबतची घोषणा करावी. व ती कायदेशीर असावी.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी व आयुक्त साहेब, आज अर्थसंकल्पावरील विशेष महासभा आहे सन्माननिय सदस्य श्री. राजु जग्यासी हे वारंवार विरोधी पक्ष नेत्याच्या नेमणुकीबाबत बोलत आहेत.

आज त्याच्यासाठी विषय नाही आहे. त्यामुळे त्यांनी वारंवार मा. महापौरांना या कामी विनंती करुन आपला स्वत:चा अपमान करुन घेवु नये असे मी त्यांना याठिकाणी सांगु इच्छितो.

<u>महापौर :–</u>आजची ही विशेष महासभा आहे. पुढील महासभेत याबाबत निर्णय घेतला जाईल.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>येणा–या महासभेमध्ये आपण निर्णय घेणार असल्याचे बोलत आहात?

<u>महापौर :–</u>हा, म्हटंले ना?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>येणा–या महासभेत आपण निर्णय घ्याल? त्यावेळेस आपण कुणाच्या बोलण्यामध्ये येणार नाहीत, आपण निर्णय घ्याल?

<u>महापौर:–</u>होय, बोलेल ना? का नाही बोलणार?

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौरजी, पुढच्या महासभेत चर्चा होईल असे आपण सांगा. ते तुमच्याकडुन कबुल करुन घेतात. तुम्ही निर्णय दयाल का? त्या प्रस्तावावर चर्चा होईल. विरोधी पक्ष नेत्याच्या नेमणुकीबाबत चर्चा होईल. असे तुम्ही सांगा. अशी माझी तुम्हांला विनंती आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>आपण का महापौरांना शिकवत आहात? एवढया मोठया पदावर त्या आहेत.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>आपण का म्हणत आहात निर्णय दया म्हणुन? होवु दया ना चर्चा, पुढील महासभेत हा प्रस्ताव चर्चेस घेवु. परंतु आजच्या सभेत या प्रस्तावाबाबत आपण बोलावयास नको. आजची विशेष महासभा आहे. एवढे उताविळ का होत आहात?

<u>महापौर :–</u>मी सांगितले ना पुढील महासभेत चर्चा होईल म्हणुन?

<u>सदस्य श्री. सतीश चहाळ :–</u>मा. महापौर, उप–महापौर, ज्या सभेमध्ये विरोधी पक्ष नेता नसेल त्या सभेचे कामकाज पाहण्यामध्ये जनतेस किती आनंद मिळत असेल याचा आपण विचार केला पाहिजे. प्रत्येक वेळेस विरोधी पक्ष नेत्याच्या नेमणुकीबाबत टाळाटाळीचे उत्तर न देता, जी व्यक्ती त्या पदासाठी पात्र आहे त्या व्यक्तीस ते पद दिले पाहिजे. तसेच तुम्ही आता जे आश्वासन दिले की, पुढील महासभेत .............

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौरजी, हा विषय या महासभेमध्ये नाही आहे. अर्थसंकल्पाचा विषय हा आजच्या महासभेचा विषय आहे. तो चालु करण्यात यावा धन्यवाद ।

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>पुढील महासभेत घोषणा होईल.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १:–</u> स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००७–०८ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००६–०७ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

---

मा. महापौरांच्या वतीने मा. स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी यांना व्यासपीठावर येण्यास निमंत्रण दिले जात आहे. त्यांनी व्यासपीठावर येवुन अर्थसंकल्प सादर करावा.

यावेळी श्री. रामचंद्र पारवानी हे व्यासपीठावरील आसनावर आसनस्थ झाले.

**स्थायी समिती सभापती (श्री. रामचंद्र पारवानी):—**आमचे इष्ट दैवत भगवान झुलेलाल, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व आपल्या देशाच्या घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांचे स्मरण करुन, मा. महापौरजी, मा. उप—महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सभागृह नेता, विरोधी पक्ष, तमाम नेतागण, गटनेते, सर्व समित्यांचे सभापती, सन्माननिय नगरसेवक, नगरसेविका, अधिकारीगण, कर्मचारी, पत्रकार बंधु व उपस्थित नागरीक आपणा सर्वांचे सन २००७—२००८ च्या अर्थसंकल्पीय सभेमध्ये स्वागत आहे. आम्हांला या महानगरपालिकेत जनतेने निवडून पाठविले आहे. त्यांच्या ब—याचशा आशा—अपेक्षा आहेत. आम्हांस आमच्या कर्तव्यांची जाण आहे. या महानगरपालिकेच्या सभागृहाची रुपरेषा पाहिली तर ७५ नगरसेवकांमधुन ४४ सदस्य पहिल्यांदाच निवडून आले आहेत. किंवा काही कालावधीनंतर पुन्हा निवडून आले आहेत. त्याचप्रकारे स्थायी समितीची रुपरेषा पहाता १६ पैकी ९ सदस्य नविन आहेत. त्यामधील एक मी सुध्दा आहे. तरीसुध्दा महापालिका सदस्य, स्थायी समिती सदस्य व सभापती या नात्याने मी महापालिकेची आर्थिक स्थिती पाहिली तसेच एवढया वर्षापासुन महापालिकेचा कारभार कसा चालला आहे याचा अभ्यास केला असता असे माहित पडले की, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे. शहरामध्ये समस्यांची कमी नाही. व ही स्थिती आम्हांला पुर्वीच्या लोकांपासुन मिळालेली देणगी आहे. यामुळे त्यांपासुन तोंड लपविणे ठिक होणार नाही. या परिस्थितीस तोंड दयावे लागेल. प्रशासनाने स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना महानगरपालिकेच्यावतीने जबाबदा—या, विविध करांचे प्रचलित दर, कर्ज इत्यादी बाबींबाबत अवगत केले आहे. या सर्व बाबींची छाननी करतांना आम्हांला असे आढळून आले की, महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा बराचसा भाग अधिकारी, कर्मचा—यांचे पगार, शिक्षण मंडळ तसेच विद्युत देयक, कर्जाची परतफेड याबाबींवरच खर्च होत आहे. अशा परिस्थितीत जर शहराचा विकास करायचा असेल तर प्रशासनास आवश्यक तेवढा पैसा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाने महापालिकेची सध्याची हालाखीची स्थिती लक्षात घेवुन आम्हांस अर्थसंकल्पात व करांमध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित केले आहे. ते मी आज परिस्थिती पाहता आजची स्थिती लक्षात घेता अत्यंत कठिण परिस्थितीत तयार होणारा अर्थसंकल्प लोकप्रतिनिधी या नात्याने आम्ही मंजुर करु शकत नव्हतो. मंजूर तर काय त्या प्रस्तावित अर्थसंकल्पाची रुपरेषा पाहता त्यातील आकडे वाचुन आमच्या मनामध्ये थरकाप उडाला होता. प्रशासनाने कडु औषधाचे उदाहरण दिले होते. परंतु आम्ही शहराचे प्रतिनिधी असल्याने एवढी कटुता असलेला अर्थसंकल्प कसा मंजुर करु शकलो असतो? आज उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती, तसेच शहरवाशियांच्या समस्या व त्यांच्या अपेक्षा तसेच आजुबाजुच्या महानगरपालिकांचा विकास पाहता जे आवश्यक वाटले त्यानुसार सन २००७—२००८ चा अर्थसंकल्प तयार करुन स्थायी समितीने सादर केला आहे. व तो आज मी स्थायी समितीच्या वतीने महापालिकेस सादर करीत आहे. अर्थसंकल्पाच्या प्रक्रियेची आपणांस माहिती असेलच. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी अनुसार अर्थसंकल्पाची प्रक्रिया तीन टप्प्यामध्ये पुर्ण केली जाते. सर्वात प्रथम प्रशासनाच्या वतीनें उत्पन्न आणि खर्चाच्या अंदाजाचे विवरण तयार केले जाते. आणि ते स्थायी समितीस सादर केले जाते. ज्यावर अभ्यास करुन स्थायी समिती सदस्य अर्थसंकल्प तयार करतात. तिस—या टप्प्यामध्ये या अर्थसंकल्पास महासभेची मंजुरी मिळणे आवश्यक आहे. पहिल्या टप्प्यात प्रशासनाने स्थायी समितीसमोर जी आकडेवारी सादर केली होती ती याप्रकारची आहे.

| | |
|---|---|
| **उत्पन्न——** | रुपये ३१९ कोटी ७६ लाख |
| **खर्च ——** | रुपये ४०५ कोटी २६ लाख |
| **फरक ——** | रुपये ८५ कोटी ५० लाख |

रुपये ८५ कोटी ५० लाख ही तुट भरुन काढण्यासाठी करांमध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित केले होते ते याप्रकारे...

| | |
|---|---|
| **जकात ——** | ६ कोटी ५९ लाख |
| **मालमत्ता कर ——** | ४२ कोटी ७५ लाख |
| **पाणीपट्टी ——** | ३२ कोटी ८६ लाख |
| **भुयारी गटार जोडणी फी ——** | १ कोटी ५० लाख |
| **विविध सेवा ——** | ३५ लाख |
| **टॅंकर शुल्क ——** | १ कोटी ३७ लाख |
| **अग्नी सेवा——** | १ लाख |

यावेळेस उल्हासनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये एक नविन गोष्ट आहे ती अशी की या वर्षाचा अर्थसंकल्प जवळ जवळ ४०० कोटीचा आहे. जसे की अशा प्रकारचा अर्थसंकल्प यापुर्वी ना कधी पाहिला आहे, ना कधी ऐकला आहे. आपणांस हे माहित करुन घेणे आवश्यक आहे की यावेळेस ४०० कोटीचा अर्थसंकल्प तयार करण्यामध्ये मुख्य उद्देश काय आहे। याची मुख्य कारणे अशी आहेत की, जवाहरलाल नेहरु

नागरी पुनरुत्थान योजना या नावाची एक योजना जिचा फायदा इतर महानगरपालिकांप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेस सुध्दा मिळवायचा आहे. ज्यामुळे शहराचा सर्वांगीण विकास होवु शकेल. या योजनेनुसार आपल्या निधी पेक्षा अधिक मदत केंद्र व राज्य सरकार देणार आहे. अशा संधीचा फायदा घेणे आजची आवश्यकता आहे. या योजनेत महापालिकेस आपले अंशदान दयावे लागेल. व काही कर्ज सुध्दा घ्यावे लागेल. ही आवश्यकता पुर्ण करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने मालमत्ता कर, पाणी व इतर करांच्या दरामध्ये ८५ कोटी रुपयांची वाढ सुचविण्यात आली होती. परंतु स्थायी समिती सदस्यांनी फक्त मालमत्ता कर, पाणी व आणखी काही दरामध्ये नाईलाजास्तव थोडीसी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु या निर्णयामुळे शहराचा सर्वांगीण विकास होणे शक्य आहे. ज्याची कल्पना शहरवाशियांनी महापालिकेतील सत्तांतरानंतर केली होती. आजच्या परिस्थितीत थोडयाफार प्रमाणात कर वाढविण्याचा आमचा निर्णय शहराला विकासाच्या रस्त्यावर एक पाऊल टाकण्यास मदत करणारे आहे. कोणत्याही करांमध्ये वाढ न करण्याचे तसेच वाढता खर्च आणि कर्ज यांच्याकडे दुर्लक्ष करुन आम्हांसही लोकप्रियता मिळविता आली असती. परंतु असे करणे शहराच्या हिताचे झाले नसते. आम्हांला या शहरास बरेच काही दयायचे आहे व आपल्या कार्यकाळास सुविधा देणारा कार्यकाळ तयार करायचा आहे. यासाठी काही कडु निर्णय घ्यावेच लागतील. करांमध्ये वाढ करण्याची घोषणा ही काही अंशी त्रासदायक आहे. परंतु त्याचे फायदे भविष्यात शहरवाशियांना मिळतील. मी एक उदाहरण देवु इच्छितो की येथुन मुंबईला जातांना रस्त्याचा टोल भरण्यास विरोध केला जात होता. परंतु अतिशय चांगल्या रस्त्यांचा उपयोग करतांना व पेट्रोलमध्ये होणारी बचत पाहता ते निसंकोचपणे टोल भरत आहेत. पुर्वी गॅस सिलेंडर फक्त ६७ रुपयांमध्ये मिळत होता. परंतु तो मिळविण्यासाठी जो त्रास होत होता ते सर्वांना माहित आहे. आज प्रत्येक घरामध्ये २–२ सिलेंडर असून ३०० रुपयामध्ये एक गॅस सिलेंडर आपण खरेदी करत आहोत. या सर्व गोष्टी लक्षात घेता मालमत्ता कर व पाणी दरामध्ये स्थायी समितीच्या वतीने जी वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे ती या प्रकारची आहे.

**मालमत्ता कर**

पाणी पट्टी :– १० टक्के

पाणी पुरवठा लाभ कर :–०७ टक्के

**पाणी पुरवठा**

आरसीसी बांधकाम :– प्रतिमहा रुपये १०० ऐवजी रुपये २२५ प्रतिमहा

पज्याचे छप्पर :– प्रतिमहा रुपये ५० ऐवजी रुपये १२५ प्रतिमहा

झोपडी :– प्रतिमहा रुपये ४० ऐवजी रुपये १०० प्रतिमहा

या व्यतिरिक्त विविध विभागांमार्फत दिल्या जाणा–या नागरी सुविधांच्या दरामध्ये तसेच अन्य काही दरांमध्ये नाममात्र वाढ करण्यात आली आहे. ज्याची माहिती स्थायी समितीने पारीत केलेल्या ठरावामध्ये देण्यात आलेली आहे. वरीलप्रमाणेची वाढ तसेच नागरीकांकडे मिळकत करांपोटी तसेच पाणी बिलापोटी असलेली फार मोठया रक्कमेची थकबाकी लक्षात घेता स्थायी समितीने अर्थसंकल्प तयार केला आहे त्याची माहिती मी आपणासमोर सादर करीत आहे.

**जमा**

| | | |
|---|---|---|
| १ | जकात | ८३.७३ कोटी |
| २ | मालमत्ता कर | ५०.०० |
| ३ | पाणी पट्टी | ४५.०० |
| ४ | टनुदान | १०.०० |
| ५ | विशेष अधिनियमाखालील वसुली | ३.१२ |
| ६ | MISCL. संकिर्ण | २९.०३ |
| | Total (एकुण) | २२०.८८ |
| ७ | JNNURM अनुदान व कर्ज | १७१.९८ |
| | Total (एकुण) | ३९२.८६ |

खर्च

| | | |
|---|---|---|
| १ | पगार भत्ते व इतर प्रशासकिय खर्च | ३६.२५ कोटी |
| २ | एमआयडीसी | ३९.४० कोटी |
| ३ | कर्ज परतफेड | ३२.४३ कोटी |
| ४ | रस्त्याची विदयुत बिल | ३.११ कोटी |
| ५ | सार्वजनिक आरोग्य | ७.७९ कोटी |
| ६ | शिक्षण मंडळ | ६.३० कोटी |
| ७ | सरकारी व अन्य सेवा | २२.०२ कोटी |
| ८ | दिवाबत्ती विभाग | १.९० कोटी |
| ९ | उदयाने | १.६३ कोटी |
| १० | अग्निशमन | ०.७९ कोटी |
| ११. | दवाखाना व आरोग्य विषयी कार्यक्रम | ०.९७ कोटी |
| १२ | पाणी पुरवठा | ७.५४ कोटी |
| १३ | भुयारी गटार | २.१० कोटी |
| १४ | जलनिस्सारण विभाग | २.६० कोटी |
| १५ | बांधकाम | ३९.३९ कोटी |
| १६ | प्रभाग समिती | २.८२ कोटी |
| १७ | संकिर्ण | ६.८७ कोटी |
| | एकुण | २१३.९१ कोटी |
| | जे.एन.एन.यु.आर.एम. योजना | १७८.७९ कोटी |
| | एकुण | ३९२.७० कोटी |

## सुधारीत मालमत्ता कर, नळ जोडणी, मालमत्ता कर आकारणी तसेच थकबाकी वसुली

आपल्या शहरामध्ये असलेल्या घरे व दुकाने अशा जवळ जवळ १ लाख ५० हजार मिळकतींची मालमत्ता करापोटीची मागणी जवळ जवळ २५ कोटीची आहे. ती फारच कमी आहे. नव्याने बांधण्यात आलेल्या घरे व दुकानांना मालमत्ता कराची आकारणी करुन तसेच मालमत्तांचे पुन्हा मोजमाप केल्याने कर वसुलीमध्ये वाढ होवु शकते. अशा प्रकारे कित्येक अनाधिकृत नळ जोडण्या नियमित केल्या जावू शकतात. आमचे आयुक्त याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर करुन महापालिकेच्या महसुलामध्ये वाढ करतील अशी त्यांनी आम्हांला खात्री दिली आहे.

## जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान

जसे की मी आपणांस माहिती दिली होती की, जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान या योजनेचा उल्हासनगर महानगरपालिकेस लाभ मिळवुन दयायचा आहे. त्यानुसार या योजनेबाबत मी आपणांस काही माहिती देवु इच्छितो. एका बाजुने महानगरपालिकेची शहर आणि शहरवाशियांबाबतची वाढती जबाबदारी व दुस—या बाजुने उत्पन्नाची अपुरी साधणे या सर्व गोष्टी लक्षात घेता केंद्र सरकार व राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना मुलभुत नागरी सुविधा निर्माण करता याव्यात म्हणुन जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान योजनेच्या माध्यमातुन एक सुवर्ण संधी निर्माण केली आहे. आम्ही संपुर्ण शहरातील कामांची माहिती घेवुन १६०० करोड रुपयांची एक योजना तयार केली आहे. या योजनेनुसार ज्या सेवा अपेक्षित आहेत त्या याप्रकारच्या.........

१. रस्ते विकास कार्यक्रम
२. पाणी पुरवठा योजना
३. भुयारी गटार योजना
४. घनकचरा व्यवस्थापन
५. ट्रक टर्मिनल
६. पार्किंग सुविधा
७. रेल्वे उड्डान पुल

८. पादचारी पुल इत्यादी

सन २००७—२००८ पासुन २०११—२०१२ पर्यंत म्हणजेच येणा—या पाच वर्षातील वित्तीय कार्यक्रमाची माहिती याप्रकारे आहे.

| | सन २००७—०८ ते सन २०११ — २०१२ पर्यंत योजनेवरील खर्च | सन २००७—०८ साठी खर्च |
|---|---|---|
| रस्ते,पाणी पुरवठा, मल व जलनिस्सारण सुविधा | ८३१.२३ कोटी | १७.२२ कोटी |
| गलिच्छ वस्ती मध्ये घर बांधण्यासाठीची योजना | ६३१.३४ कोटी | १३२.८२ कोटी |
| गलिच्छ वस्ती मधील मुलभूत सुविधा | १३६.६७ कोटी | २८.७५ कोटी |
| **एकुण** | १५९९.२४ कोटी | १७६.७९ कोटी |

या योजनेतुन केंद्र आणि राज्य शासनाकडुन मदत मिळविण्यासाठी आयुक्तांबरोबर आम्ही प्रयत्न करु व मंजुर योजनेबाबत वेळोवेळी आपणांस माहिती देत राहु.

## उदयान सुशोभिकरण

शहरातील मुख्य उदयान जसे की गौल मैदान, सपना गाडन व अन्य काही उदयांने विकसित करण्याचे काम सुरु असून शहरातील इतर उदयाने विकसित करण्याचे काम बाकी आहे. आमच्या आयुक्तांनी या कामामध्ये रुची दाखविली आहे. यासाठी उदयानांचा विकास करण्यासाठी स्थायी समितीने २ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजुरी दिली आहे.

## शहर रोषणाई

शहरातील १४ हजार विदयुत रस्त्यावरील रोषणाईचे आटोमायझेशन करण्याचे काम विदयुत विभागाने हाती घेतले आहे. या रोषणाईला संचालीत करणारी १०० पॉईंट्जने आटोमायझेशन केले आहे. यावर्षी १०० नविन पॉईटस् चे आटोमायझेशन करण्याचा निर्णय घेतला आहे व त्यासाठी अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतुद ठेवण्यात आली आहे. ही योजना अंमलात आणल्यानंतर रस्त्यावरील रोषणाई बंद अथवा चालु करता येवु शकेल व विजेची बचत होईल.

## बस सेवा

आपले शहर लहान असले तरी शहरातील लोक हे व्यापार अथवा अन्य कारणासाठी मुंबई व जवळपासच्या उपनगरांनी जोडले आहे. या बससेवेच्या सुविधासाठी शहरवाशियांची ब—याच वेळेपासुन मागणी होती. आमच्या आयुक्त साहेबांनी धुळे महानगरपालिकेत याचा सफल असा प्रयोग केला आहे. हे लक्षात घेवुन उल्हासनगर शहरात सुध्दा बससेवा सुरु करण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे.

## महिला व बाल विकास तसेच अन्य कार्यक्रम

शहरातील गरजु महिला व बालकांचा विकास ही एक मोठी सांविधानिक जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेस सोपविली गेली आहे. तसे पाहिले तर प्रत्येक वर्षी या कार्यकमांतर्गत १५ लाखाची तरतुंद असायची. परंतु आमच्या सत्ताधारी पक्षाच्या श्रीमती मिना सोनेजी (सोडे) यांची उमेद बघुन या कार्यक्रमासाठी ३५ लाख रुपयाचा अर्थसंकल्प निश्चित केला आहे. तसेच अन्य राष्ट्रीय कार्यक्रम जसे की राष्ट्रीय युवा धोरण रुपये १५ लाख, समाजातील अपंग लोकांसाठी कल्याणकारी योजनेसाठी २० लाख, कृष्ठरोग कल्याण कार्यक्रम ५ लाख, एड्स, टी.

बी. प्रतिबंध उपाययोजनेसाठी ५ लाख तसेच मागासवर्गीय व दुर्बळ घटक वस्तीमध्ये मुलभुत सुविधांसाठी २२८ लाख इत्यादी अशा प्रकारे जरुरी तरतुद केली आहे.

पायाभुत सुविधांसाठी निधी

शहरातील अनाधिकृत इमारती नियमाधीन करण्यासाठी ५ कोटी रुपये या वर्षी मिळण्याची शक्यता आहे. या पैश्यांमधुन शहरातील मुख्य रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण तसेच अन्य विकास कार्यक्रम करण्याची योजना आहे. या पैश्यामधुन शहरामध्ये रुग्णालय बांधण्यात येईल.

अग्निशमन व ॲम्बुलन्स सेवा

शहरातील वाढणारी लोकसंख्या लक्षात घेवुन महानगरपालिकेतर्फे एक ॲम्बुलन्स तसेच एक शववाहिनी खरेदी करण्यासाठी तसेच इमारत व जान मालाची सुरक्षेसाठी अग्निशमनसाठी एक वाहन खरेदी साठी तरतुद ठेवली आहे.

शहरवासियांची प्राथमिक सुख सुविधा लक्षात घेता महापालिकेच्या विविध विभागांतर्गत योग्य तरतुद केली गेली आहे. स्थायी समितीच्या सदस्यांनी हा अर्थसंकल्प मंजुर केला आहे, महासभेतील सर्व सन्माननिय सदस्य सुध्दा या अर्थसंकल्पास सर्व संमतीने मंजुरी देतील असा माझा विश्वास आहे.

अर्थसंकल्प बनवतांना मा. आयुक्त, स्थायी समितीचे सर्व सदस्य, इतर सदस्य तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मला जो सहयोग दिला त्यासाठी मी त्यांचे हार्दिक आभार व्यक्त करतो. व मी माझे निवेदन संपवतो. जय हिंद । जय महाराष्ट्र । जय भिम । जय झुलेलाल ।

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहातील सर्व सदस्य, सर्वात प्रथम तर मी स्थायी समितीच्या सभापतींचे अभिनंदन करतो की ३९२ कोटी ६९ लाख ६५ हजाराचा सर्वात सुंदर असा अर्थसंकल्प या शहराच्या विकासासाठी जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान या योजनेचा समावेश या शहरात येणा—या ५ वर्षाच्या आत शहराची रुपरेषेचा कायाकल्प पालटून टाकेल. जी आपण ५ वर्षाच्या आत पाहिली आहे समस्यांवर समस्या, अंडरग्राउंड ड्रेनेजची समस्या व लोकांच्या समस्या, अशा अनेक समस्या ज्या जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियानात समावेश आहेत. या अर्थसंकल्पात फेरबदल करुन मा. आयुक्त साहेबांनी तो अर्थसंकल्प स्थायी समितीस सादर केला, त्यात पाणीपट्टीचे बिल जे आपण मालमत्ता करात भरतो तो १०० रुपयांनी वाढवुन ४५० रुपये केला होता तसेच बॅरेकचे ५० रुपयांनी वाढवुन २२५ व झोपडपट्टीचा ४० रुपयांवरुन १८० केले होते परंतु मी स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना धन्यवाद देतो की, त्यांनी पाणीपट्टीचे दर आरसीसी बांधकामासाठी १०० रुपयांनी वाढवुन २२५ केले आहे व बॅरेकचे ५० रुपयांनी वाढवुन १२५ व झोपडपट्टयांचे ४० रुपयांवरुन १०० केले आहे. आज आमचे शहर पाण्याच्या समस्येने त्रस्त आहे. आम्ही येथे पुष्कळश्या योजना आणल्या आहेत. तसेच आमचे असे नियोजन सुध्दा आहे की येणा—या दिवसात आम्ही त्या समस्येचे समाधान करु. त्यासाठी मी सभागृहास निवेदन करेन की, आपण जे स्थायी समितीमध्ये १०० रुपयांचे २२५ केले तर माझे असे म्हणणे आहे की त्याची कपात करुन १५० रुपये करावे म्हणजेच लोकांवर जास्त ओझे टाकले जावु नये. तसेच बॅरेकचे ५० रुपयांचे १२५ रुपये केले आहे त्याची सुध्दा कपात करुन ७५ रुपये करावे. म्हणजे आपण लोकांना येणा—या दिवसात चांगली सुविधा उपलब्ध करुन देवु. चांगली सुविधा जर लोकांना दिली तर आपण त्यांच्याकडुन चांगले काही मिळण्याचे हक्कदार बनु. तसेच आपण झोपडपट्टीचे ४० रुपयांवरुन १८० केले आहे त्याची ६० रुपये कपात करावी म्हणजेच पाणी बिल भरण्यासाठी गरीब जनतेस समस्या येवु नये. तसेच दुसरे म्हणजे हा जो आपण ३९२ कोटीचा जो अर्थसंकल्प सादर केला आहे त्यात आपण या गोष्टीचा उल्लेख करावा की जो पायाभुत सुविधांचा निधी आहे तो कमीत कमी ५ कोटी ते ८ कोटी आहे जो आपणांस मिळणार आहे, जे लोक बांधकाम नियमाधीन करुन तो पैसा आपणांस देणार त्याचा निधी आपण सरकारी रुग्णालयासाठी राखीव ठेवु या. तुम्ही समाविष्ट केले आहे की तो पैसा रुग्णालयासाठी खर्च होणार म्हणुन. परंतु त्यात गोष्ट आहे की तो पैसा आपण रुग्णालयाशिवाय कुठेच खर्च करणार नाही. जेणेकरुन येणा—या दिवसामध्ये या शहरास १००० खाटांचे रुग्णालय लाभेल. जसे आमचे स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी यांनी सांगितले आहे ते

काम आम्ही पुर्ण करु शकु. व यापुढे जावुन ते १००० खाटांचे रुग्णालय तयार करण्याचा आमचा जो उद्देश आहे तो असा आहे की या शहरामध्ये हैद्राबाद सिंध या ट्रस्टची सहा महाविद्यालये आहेत. त्यामध्ये कला वाणिज्य आणि विज्ञान, माहिती तंत्रज्ञान विधी महाविद्यालय आहे आणखी काही महाविद्यालय आहेत. परंतु येथे वैद्यकीय महाविद्यालय नाही आणि ते लोक ते तयार करु शकत नाहीत. त्याचे मुख्य कारण आणि मुख्य समस्या ही आहे की, या शहरामध्ये १००० खाटांचे रुग्णालय नाही. उल्हासनगर जिल्हा भाजपाचे अध्यक्ष श्री. लाल पंजाबी यांची हैद्राबाद सिंध ट्रस्टच्या पदाधिका–यांबरोबर एक बैठक सुध्दा झालेली आहे आणि ट्रस्टवाले या शहरामध्ये १० कोटी रुपये खर्च करण्यास तयार आहेत. अट एवढीच आहे की या महानगरपालिकेने त्यांना १००० खाटांचे रुग्णालय तयार करुन दयावे. यास्तव मी आपणांस निवेदन करेन की, पायाभुत सुविधा या शिर्षातर्गत जो काही निधी येईल तो आरक्षित ठेवला जावा. त्या निधीतुन आपण या शहरासाठी काहीना काही सुविधा देवु शकु. दुसरी गोष्ट अशी की मी आपणांस धन्यवाद देवु इच्छितो की अग्निशमन विभागाची जी इमारत पडण्याच्या स्थितीत आहे ती तयार करण्यासाठी आपण या अर्थसंकल्पात तरतुद केली आहे. मी आपणांस धन्यवाद देईल की, आपण शववाहिनीसाठी व अग्निशमन विभागासाठी जी व्यवस्था केली आहे व रुग्णवाहिकेसाठी आपण जो निधी ठेवला आहे त्याबाबत मी आपणांस धन्यवाद देतो. रुग्णवाहिका व शववाहिका लवकरात लवकर या शहरात आली पाहिजे यासाठी या प्रस्तावाचा आपण पाठ पुरावा केला पाहिजे. मी दुसरे आपणांस निवेदन करेल की या शहरामध्ये कोंडवाडा, कत्तलखाना तसेच भटके कुत्रे यांची व्यवस्था करण्यासाठी जी उपाययोजना नाही त्याबाबत सुध्दा आपण या अर्थसंकल्पामध्ये जी तरतुद ठेवली आहे, अशा प्रकारची तरतुद यापुर्वी ब–याच अर्थसंकल्पामध्ये करुन सुध्दा काम होत नाही. असे यावेळी होता कामा नये. व आपण हा जो अतिशय चांगला अर्थसंकल्प या शहरास दिला आहे त्यात पाणी पट्टी बाबत मी जे बदल सुचविले आहेत त्याप्रमाणे बदल करुन तसेच मालमत्ता करामध्ये कोणतीही वाढ न करता फक्त पाच बाबींच्या जकात दरामध्ये वाढ करुन शहरास एक चांगला अर्थसंकल्प जर आपण दिला तर तो एक फारच चांगला असा अर्थसंकल्प होईल. व या शहराच्या विकासामध्ये तो आठवण करण्यासारखा होईल. धन्यवाद ।

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. महापौरजी, उप–महापौर, आयुक्त साहेब, आता नुकताच सन २००७–२००८ चा अर्थसंकल्प सादर करणारे आमचे स्थायी समितीचे सभापती.........

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>कृपया हिंदीत बोलावे ही जी सभा आहे ती अतिशय महत्वपुर्ण अशी आहे. यासाठी आपण हिंदीत बोलावे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>यांनी या ठिकाणी सादर केला आहे. मी सदस्यांना सांगु इच्छितो की, काही लोक मराठीत बोलतात त्यावेळेला तुम्ही ऐकुन घेता. आणि ज्यावेळेस मी बोलतो, मी तर नेहमी हिंदीत बोलतो, परंतु हा जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे हा शहराच्या विकासाचा नाही, हा बोगस आहे. हा फुगलेला अर्थसंकल्प आहे. याच्यावर आम्हांला काही सुचना करावयाच्या आहेत. त्या या सभागृहामध्ये सर्वांनी समजावुन घ्याव्यात. आता या ठिकाणी जन्म दाखल्यासाठी २० रुपयाचे शुल्क दर्शविले आहे. ही २० रुपये ही एक लहानसी रक्कम आहे. आम्ही अशी सुचना करु इच्छितो की या कामी ५ रुपये घ्यावेत. मृत्यु दाखल्यासाठी २० रुपये दर्शविले आहेत. तो मोफत देण्यात यावा. अंत्यविधी दाखला देणे २० रुपये......

<u>काही सदस्य</u> :– मा.महापौर महोदया,....

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मध्येच कुणी बोलु नये, ज्याला ऐकायचे असेल त्यांने ऐकावे, ज्यांना ऐकायचे नसेल त्यांनी कृपया गप्प बसावे. जो सदस्य मा. महापौरांची परवानगी घेवुन बोलत आहे, त्यावेळेस तुम्ही गडबड करता हे बरोबर नाही. ज्यावेळेला तुम्ही बोलता त्यावेळेला आम्ही गप्प बसतो व ऐकुन घेतो. आणि म्हणुन ज्याच्याकडे ऐकुन घेण्याची पात्रता नसेल त्यांनी कृपया गप्प बसावे आणि हे सभागृहाने लक्षात घ्यावे. अंत्यविधी दाखला देणे २० रुपये त्याबाबत आमचे म्हणणे आहे की तो दाखला मोफत दयावा. आणि नोंदणी अनुज्ञेयतेचा दाखला देणे कामी २० रुपयावरुन ५० रुपये करावा. ड्रेनेज कनेक्शनसाठी इमारतींकडुन ५ हजार रुपये घेण्यात यावेत. कारण महानगरपालिकेला उत्पन्न जर वाढवायचे असेल तर काही गोष्टींबाबत आम्ही सुचना करतो त्या त्यांनी विचारात घ्यायच्या आहेत. याकामी झोपडपट्टीधारकांकडुन २०० रुपये घ्यावेत. पक्क्या घरमालकाकडुन ५०० रुपये घ्यावेत. जोता पुर्णत्वाचा दाखला देणे कामी येथे २००० रुपये दर्शविले आहे, आमचे म्हणणे आहे त्यांच्याकडुन ५००० घ्यावेत. इमारत बांधकामाबाबत ३००० रुपये घ्यावेत असे म्हटले आहे, आमचे म्हणणे आहे या कामी

५००० रुपये घ्यावेत. पुर्णत्वाचा दाखला, विकास हक्क वर्ग करणे ५ रुपये फुट प्रमाणे तर आमचे म्हणणे आहे २५ रुपये फुट प्रमाणे घ्यावेत. बांधकाम मंजुरी व पुर्णत्वाचा दाखला देणे कामी २५० रुपये घ्यावेत असे दर्शविले आहे आमचे म्हणणे आहे त्यांच्याकडुन ५०० रुपये घ्यावेत. अभियंता पर्यवेक्षक परवाना ५००० रुपये म्हटले आहे तर त्याऐवजी १००० घ्यावे. अभियंता पर्यवेक्षक २५० रुपये म्हटले आहे तर त्याऐवजी ५००० घ्यावे. नुतनीकरण परवाना, चित्रपट गृह १०० रुपये म्हटले आहे त्याऐवजी २५० रुपये घ्यावेत. रस्त्यावरील मंडप २५० रुपये म्हटले आहे त्याऐवजी १०० रुपये घ्यावेत. ना हरकत दाखला, जकातीचा दाखला १५० रुपये म्हटले आहे तो मोफत दयावा. मंजूर इमारत २५० रुपये म्हटले आहे त्याऐवजी ५००० घ्यावेत. बांधकामासाठी अग्निशमन दलाचा ना हरकत दाखला मिळणेबाबत ५००० रुपये घ्यावा. याप्रमाणे टॅकरच्या बाबतीमध्ये प्रति टॅकरला महानगरपालिका २५४ रुपये मोजत आहे. सदर टॅकर पाणी टंचाईच्या भागात विनाकारण महापालिका पुरवित आहे. त्यामुळे सन ९८—९९ पासुन जवळ जवळ ११ लाख टॅकर आकारणीसाठी झालेला खर्च आता ८४ लाख झाला आहे. यावरुन मोफत टॅकर मिळावे म्हणुन टॅकर मागणी वाढत आहे. म्हणुन ज्या ठिकाणी खरोखरच पाणी पोहचत नसेल अशाच ठिकाणी पाणी मोफत दयावे. इतर ठिकाणी टॅकरद्वारे मोफत पाणी देवु नये. दिनांक १/४/२००४ ते ५/४/२००५ पर्यंत टॅकरवर जे शुल्क आकारण्यात आले तेव्हा अचानक १०० टॅकर वरुन १५ टॅकर वर मागणी आली याचाच अर्थ मोफत टॅकर पुरविल्याने त्याचा नागरीक गैरफायदा घेतात व त्या खर्चाचा भुर्दंड महापालिकेवर पडतो. त्यामुळे इतर भागांवर त्याचा परिणाम होतो. म्हणुन ते शुल्क जादा आकारण्यात यावे. कारण महापालिकेतर्फे व्यवसायिकांना टॅकर पुरविल्यामुळे गैरफायदा होतो. या उल्हासनगर शहरामध्ये पाणी टॅकरबाबतीत बराचसा भ्रष्टाचार झाला आहे. आणि महाराष्ट्र शासनाने त्याची चौकशी सुध्दा चालु केली आहे. बांधकामाच्या स्वरुपाप्रमाणे आरसीसी व टियर गर्डर २०० रुपये म्हटले आहे त्याचे १५० रुपये करावे. पत्रेचे छत व विट बांधकाम १२५ रुपयावरुन १०० रुपये करावे. झोपडपट्टी धारकांसाठी १०० रुपये म्हटले आहे ते ५० करावे. आणि स्थायी समितीने सुचविलेला अर्थसंकल्प फुगविलेला आहे. तो असा मागील काही अर्थसंकल्पावर नजर टाकल्यास अंदाजित उत्पन्न व प्रत्यक्ष उत्पन्न यामध्ये बरीच तफावत दिसते. अंदाजित उत्पन्न आपण पुर्ण करु शकलो नाहीत. उदा. २००४—२००५ चे अंदाजित उत्पन्न १५९ कोटी ३८ लाख दर्शविले होते आणि आपण वसुली केली आहे १०१ कोटी ६७ लाख यामध्ये तफावत किती झाली? ५७ कोटी ७१ लाख त्याचप्रमाणे २००५—२००६ मध्ये १६२ कोटी ८७ लाख दर्शविले होते आणि वसुल केले आहेत १०९ कोटी १० लाख. तीन वर्षाचा अहवाल मी वाचला आपण १९९९ पासुनचा गोषवारा दिला आहे. कुठल्याही वर्षी अंदाजित उत्पन्न मिळु शकले नाही. यावेळेस आपण ३१९ कोटी ७६ लाखाचे अंदाजित उत्पन्न मिळविण्याचा संकल्प केला आहे. आम्ही असे मिळवणार याची सांशकता वाटते. या सर्व बाबींकडुन हा अर्थसंकल्प फुगविलेला आहे असे वाटते. जवाहरलाल नेहरु योजने अंतर्गत १७१ कोटी ९८ लाख मिळणार आहेत. आपण इतर अंदाजित उत्पन्न १४७ कोटी ७८ लाख दाखविले आहे. मागील उत्पन्न बघता २६ कोटी ३४ लाख आपण कसे वसुल करणार याचा खुलासा होत नाही. म्हणजेच हा अर्थसंकल्प म्हणजे आकडयांची अदलाबदल, २००७—२००८ चा अर्थसंकल्प आकडयांची अदलाबदल करुन फुगविलेला आहे, बोगस आहे. गरीबांवर अन्याय करणारा आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पास आमचा विरोध आहे. आता झोपडपट्टयांच्या बाबतीमध्ये आमचे स्थायी समितीचे सन्माननिय सभापती यांनी प्रस्ताव वाचुन दाखविला परंतु या शहराच्या दृष्टीकोनातुन झोपडपट्टयांसाठी आपण पाणी पुरवु शकत नाहीत. पाणी पुरवु शकत नसतांना देखील पाणीपट्टीत वाढ करणे म्हणजे गोरगरीबांना उल्हासनगर मधुन हलविणे असे एकंदरित वाटते. कारण पुर्वी झोपडपट्टीसाठी पाणीपट्टीचा दर ४० रुपये होता, पक्क्या घरांसाठी १०० रुपये होते. त्याच्यामध्ये तुम्ही जबरदस्त दुप्पट—तिप्पटीने वाढ केली आहे. तुम्ही संपुर्ण शहरामध्ये झोपडपट्टयांमध्ये पाणी पुरवु शकत नाहीत. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे पाणी साठविण्यासाठी झोपडपट्टयांमध्ये भांडी नसतात. १० बाय १० ची झोपडी असते. त्या झोपडीमध्ये तो पाण्याचा साठा करु शकत नाही. रोजच्या रोज दोन भांडी भरायची आणि त्याचे तुम्हांला दरमहा १०० ते १५० रुपये दयायचे हे बरोबर नाही. आमच्या मते हा अर्थसंकल्प चुकीचा आहे. त्याचप्रमाणे या उल्हासनगर शहरामध्ये टॅकरच्या बाबतीत महानगरपालिकेने जास्तीत जास्त शुल्क आकारावे आणि वसुल करावे. कारण महानगरपालिकेला जर खरोखरच उत्पन्न वाढवायचे असेल तर झोपडपट्टयांवरती, पाणी पट्टीवरती, मयतांवरती शुल्क आकारुन उत्पन्न वाढणार नाही. उत्पन्न यावर वाढेल १७ सेक्शन येथे जे कमावतात, ज्यांचे धंदे आहेत, ट्रॅव्हलींगचे जे धंदे करतात, ट्रॅव्हलीगच्या बसेस उभ्या राहतात, त्यांच्याकडुन तुम्ही वसुली केली पाहिजे. हिराघाट मध्ये व कौशल नगरमध्ये वर्षानुवर्ष गाडया उभ्या राहतात, ट्रक उभ्या राहतात त्यांच्याकडुन आपण एक नया पैसा वसुल करत नाही. म्हणजे महानगरपालिकेला तोटा आहे. म्हणुन या ठिकाणी आमचा एकच विचार आहे हा जो अर्थसंकल्प आहे तो फुगलेला अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प गरीब व मागासवर्गीयांच्या विरोधात आहे. या उल्हासनगर शहरामधील व्यापारी शहर सोडुन गेले आहेत. असे असतांना तुम्ही टॅक्स वाढवत आहात. पाणी पट्टी वाढवत आहात. शहर अर्ध्यावरती येवुन जाईल. आणि म्हणुन २००७—२००८ च्या या

अर्थसंकल्पाला आमचा विरोध आहे आणि या बाबतीत आम्ही सूचना केल्या आहेत त्या लक्षात घ्याव्यात. आणि त्याच्यावर फेरविचार करावा अशी माझी सदनाला विनंती आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, आणि स्थायी समितीचे सभापती, या शहराच्या बाबतीत धोका आहे हा अर्थसंकल्प, मी म्हणतो की कोणत्याप्रकारे आपण या शहराशी आणि आपल्या स्वत:शी धोका करत आहात? ते मी आपणांस काही आकडेवारीनुसार सांगु इच्छितो. ५ एप्रिल पासुन आपण येथिल कार्यभार स्विकारला आहे मा. महापौरजी. सर्वात प्रथम मी बोलेन आरोग्य विभागाबाबतीत. काय आपणांस कधी सवड मिळाली आहे किंवा स्थायी समितीचे सभापती जे आता अर्थसंकल्प सादर करत आहेत त्यांना कधी सवड मिळाली आहे की शहरामध्ये प्रत्येक चौकामध्ये जो कचरा पडला आहे तो जावुन पहावा., नाही. आपणांस या कामी सवड नाही? आपणांस केवळ याबाबतीत सवड आहे की, डंपींग ग्राउंडवर कच—याचे सपाटीकरण करण्यासाठी जी प्रोक्लेन मशिन लावली जाते त्याची निविदा कुणाला मिळत आहे?

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>मा. महापौरजी, माझे असे म्हणणे आहे की आपण यांना सांगावे की आपण केवळ अर्थसंकल्पावर चर्चा करावी.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>सभागृहनेताजी, मी आपणांस निवेदन करतो की आज आपण मला बोलु दयावे माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न करु नये. सर्व पत्रकार ऐकत आहेत. मा. महापौरजी आपण मला बोलु दयाल. आज अर्थसंकल्प आहे, आज आपण काही बाबींवर टॅक्स वाढविण्याचे प्रस्तावित केले आहे. टॅक्स वाढविण्याचे प्रस्तावित केले असतांना आज आपण लोकांना काय सुविधा देत आहात हे पाहण्याची आमची जबाबदारी आहे. आताच आपण सांगितले की, आमची जबाबदारी ठरते. आम्हांस या शहरास काय दयायचे आहे याबाबतीत सर्वात प्रथम आपणांस विचार करायचा आहे. गेल्या चार महिन्यामध्ये आम्ही लोकांना काय दिले आहे? त्याबाबतीत आपण विचार करायचा आहे. याबाबतीत मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, आपण शहरामध्ये कधी पाहणी केली आहे? की पुर्ण शहरामध्ये किती कचरा पडला आहे, शहरामध्ये रोगराई पसरत आहे. हे मी नाही बोलत, मागील सभेत श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनीच म्हटले आहे त्यानंतर काही झाले?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>मा. महापौरजी यांना खाली बसवा.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते त्यामुळे कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>श्री. राजु जग्यासी आपण विषयावर बोला ना?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:—</u>विरोधी पक्षांचा आवाज दाबु नका.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>महापालिका पुर्णपणे अपयशी ठरली आहे.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—</u>आमचा आवाज तुम्ही बंद करु शकत नाहीत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>शहरवाशियांना मुलभुत सुविधा तर दया.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>प्रभागांमध्ये साफसफाई चालु आहे वेळच्या वेळी कचरा उचलला जात आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, आपण महिला आहात, आपण माझ्या आईसारख्या आहात. मी आपला अतिशय आदर करतो. मी आपणांस अशी विनंती करेन की, आम्ही जो निवडून आलो आहोत तो शहराच्या जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी निवडून आलो आहोत. आमचे कर्तव्य ठरते की, शहरातील टॅक्स, पाणीपट्टचे, जकातीचे दर वाढवावे. परंतु त्याबदल्यात आम्ही लोकांना काय देत आहोत? याबाबतीत संपुर्ण सभागृहास, पत्रकारांना आणि शहरास माहिति पाहिजे. आजच्या सभेचे कामकाज आपण थेट प्रक्षेपणाद्वारे नागरीकांना दाखववायास पाहिजे होते. कारण की आज शहरवाशियांसाठी ही सभा फार मोठी आहे. गेल्या ४ महिन्यामध्ये

आपण काय केले? आपल्या जाहिरनाम्यात म्हटले आहे की आम्ही आपणांस स्वच्छ आणि सुंदर असे शहर देवु. त्यानुसार काय आहे का हे स्वच्छ सुंदर शहर? असे कोणी म्हणुन शकेल काय? आपलेच लोक ओरड करत असतात की हे काही स्वच्छ सुंदर शहर नाही.

यानंतर मी पाणी पुरवठा विभागाकडे वळतो. आपण दाव्यानुसार सांगु शकतात का की संपुर्ण शहरवाशियांना पाणी मिळत आहे म्हणुन व ते सुध्दा स्वच्छ आणि शुध्द पाणी मिळते? असा कोणी आहे का जो उभे राहून सांगु शकेल की शहरास स्वच्छ आणि शुध्द पाणी मिळत आहे म्हणुन? कोणी बोलु शकणार नाही.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u> ते सुध्दा पाण्याची मोटार न लावता?

<u>उप—महापौर :—</u>कृपया शिस्त पाळा, एका—एकाने बोला.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, मी आपणांस सत्य परिस्थिती सांगु इच्छितो. केवळ विरोधासाठी विरोध करायचा या भावनेने मी बोलत नाही. संपुर्ण सभागृहास मी विनंती करतो की, जी सत्यता आहे, ती मी आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो. आपण पाण्याचे बिल वाढवत आहात, काय संपुर्ण शहरामध्ये आज पाणी आहे? १०० टक्के संपुर्ण शहरामध्ये पाणी कधीच नव्हते ही सत्यता आहे. त्या नंतरही आज ८—१५ दिवसापासुन गोल मैदान विभागात पाणी येत नाही. आपण कुणी ही जबाबदारी ओळखली आहे काय की तेथे जावुन पाहणी करावी म्हणुन? लोकांची काय स्थिती आहे? केवळ टॅंकरची निविदा कुणाला जाते? त्या विषयाबाबत आपणांस रस आहे. ४ लोकांनी निविदा भरली आणि ती कुणाला दिली? यामध्ये आपणांस रस आहे. परिणाम काय ? भ्रष्टाचार. याबाबत राज्य सरकारकडुन चौकशी चालु आहे. हे काय आपणांस शोभा देते? व आपण येथे बसुन मोठ—मोठया गोष्टी करतात. आपला जाहिरनामा म्हणतो टॅंकरमुक्त शहर. तर काय हे टॅंकरमुक्त शहर आहे? हे मी नाही म्हणत आपला जाहिरनामा म्हणत आहे. हे झाले पाणी पुरवठा विभागाबाबत.

आता मी वळतो सार्वजनिक बांधकाम विभागाकडे. काय काम करत आहे सार्वजनिक बांधकाम विभाग? आपण लोक सुध्दा शहरात राहत आहात. आपण लोक सुध्दा या शहरातील रस्त्यांवररुन जा—ये करत असाल? तर आपणांस कुठेच असे आढळून आले नाही की, सार्वजनिक बांधकाम विभाग काय करत आहे? मा. आयुक्त साहेब, या बाबतीत मी आपणांस विशेष करुन सांगु इच्छितो की, ५ एप्रिलपासुन महासभेची रचना झाली आहे. त्या दिवसापासुन आजपर्यंत कोणत्या नगरसेवकाची किती रक्कमेची प्राकलने मंजुर झाली आहेत? याबाबत आपण प्रभागनिहाय विवरण तयार करावे. आणि याची इतिवृत्तांतात नोंद आली पाहिजे. व महासभेमध्ये हे मी आपणांस सांगत आहे. कोणत्या नगरसेवकाची किती रक्कमेची प्राकलने तयार झाली आहेत? लेखा शिर्षाचा काही हिशोबच नाही. ज्या लेखा शिर्षातुन आले त्या लेखाशिर्षातुन निधी गेला आणि प्राकलन मंजुर झाले. आणि आयुक्त साहेब, हे जाणुन आपणांस आश्चर्य वाटेल की, अदयाप अर्थसंकल्प मंजुर झालेला नाही. तरीही प्राकलने तयार करुन कामे सुध्दा सुरु झाली आहेत. महासभेनंतर मी याबाबत यादी देणार आहे.अदयापपर्यंत अर्थसंकल्प मंजुर झालेला नसतांना ज्या कामांची प्राकलने लेखा विभागाकडे गेली आहेत. व त्यातुन कित्येक कामे तर अशी आहेत की त्यांना कार्य आरंभ आदेश पत्र सुध्दा नाही मात्र काम चालु आहे. काय आमचे हे कर्तव्य नाही? शहरासाठी आम्ही काय करत आहोत? टॅंकरच्या निविदेमध्ये ३० लाखाचा घोटाळा नजरेस येत आहे. हा जो पैसा आहे तो गरीब जनतेकडुन घरपट्टीच्या, पाणीपट्टीच्या रुपाने गोळा केलेला आहे. त्याबाबत आमची काही जबाबदारी नाही काय? मागील वेळेस कोणत्या दराने ठेका दिला होता व आता कोणत्या दराने ठेका दिला आहे? मा. महापौरजी, मी आपणांस विनंती करतो की, ही आमची जबाबदारी आहे की आम्ही शहरामध्ये कोणत्या प्रकारे काम करत आहोत? आपला जाहिरनामा म्हणतो की, भ्रष्टाचार मुक्त महापालिका आम्ही देणार आहोत. मी तीन ते चार उदाहरणे देणार आहे. उदाहरणे दयायची झाली तर लांबच्या लांब यादी तयार होईल. पहिले उदाहरण ज्याचा आताच मी येथे उल्लेख केला, टेंडर घोटाळा ज्याची चौकशी चालु झाली आहे. ते काम गेले ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीला, दुसरे उदाहरण म्हणजे नाला सफाईचे काम, ते काम सुध्दा गेले ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीला तिसरे काम जे आता पाणी पुरवठा विभागामध्ये प्रलंबित पडले आहे, ड्रेनेजचे काम ३० लाखाचे काम, ते सुध्दा जात आहे ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीला. हे काय दर्शविते? आपण आपल्या मनाला विचारा आपण हे जे काही करत आहात ते योग्य आहे काय? प्रोक्लेनसाठी मागील वेळेस दोन निविदा आल्या होत्या, साडे नऊ हजाराच्या हिशोबाने ज्याने निविदा भरल्या त्यास आपण म्हणता की आपणाकडे अनुभवाचा दाखला नाही. आपल्याकडे स्वत:ची प्रोक्लेन नाही म्हणुन आपली निविदा उघडली जाणार नाही व ॲन्थोनी ज्या बाबत आपण सभागृहात ओरडत असतो की त्याचे काम समाधानकारक नाही त्यास आपण निविदा देण्यास तयारी चालविली आहे. मी धन्यवाद देईन आयुक्त साहेबांना, आयुक्त साहेबांनी ती निविदा रद्द केली आहे. मला माहिती मिळाली आहे की

आयुक्त साहेब त्याबाबत पुन्हा निविदा मागविणार आहेत. म्हणजेच साडे नऊ हजार रुपये दर लिहिणा–याची आपण निविदा न उघडता त्यास म्हणता की आपणाकडे स्वत:ची प्रोक्लेन नाही.आजपर्यंत तोच काम करत होता आपणांस माहिती असली पाहिजे. केवळ आपल्या माणसाला काम दयायचे आहे. त्यासाठी आपण कायदयात बदल करत आहात? हे आपल्याला अयोग्य वाटत नाही? या शहरातील व्यापारी वर्ग जो आहे, तो शहरातुन बाहेर जात आहे. आपण ज्याप्रकारे पाणीपुरवठा कर १० टक्के वाढविला आहे. पाणीपुरवठा उपकर वाढविला आहे.मी आपणांस सांगु इच्छितो की येथे काही व्यापारी व पत्रकार प्रेक्षक गॅलरीत उपस्थित आहेत. प्रत्येक करामध्ये जवळ जवळ १० ते १२ टक्के वाढ होईल आपण कितीही सांगा की आम्ही करांमध्ये कोणतीही वाढ केलेली नाही. परंतु ज्याप्रकारे आपण पाणी पुरवठा कर आणि पाणी पुरवठा उपकर वाढविला आहे.

<u>जकात:–</u> शहरातील व्यापार आपण स्वत: पाहता. ८५५ इमारतींबाबत हे शहर द्विधा मनस्थितीतुन जात आहे. शहरामध्ये व्यापार नाही. व अशा परिस्थितीमध्ये आपण जकातीचे दर वाढवत आहात. व आपला जाहिरनामा म्हणतो की आम्ही दरवर्षी जकातीचे दर कमी करत जावु. मी नाही म्हणत आपला जाहिरनामा म्हणत आहे. काय आहे हे? बोलायचे एक करायचे दुसरे? येथे मोठ मोठी भाषणे करायची. आपण आपल्या मनाला विचारा आपण काय करत आहात? मा. महापौरजी, प्रथम या शहरास काही सुविधा दिल्या जाव्यात. शुध्द पाणी दिले जावे. जकात दरामध्ये वाढ ही शहरातील व्यापार कसा वाढेल हे लक्षात घेवुन केली जावी. आम्ही व्यापारांना काय सुविधा देवु शकतो त्याबाबत विचार करा. बसल्या बसल्या आपण जकात कर वाढविला. मी आयुक्त साहेबांना एक विचारु इच्छितो की सध्या जकात वसुलीचे काम खाजगी अभिकर्त्यामार्फत चालु असतांना आपण जकात दरामध्ये वाढ करु शकतो का? कायदयानुसार करु शकतो का? कोणतीही नोटिस न देता करु शकतो का? आयुक्त साहेब याचा खुलासा करा. याबाबत कायदेशीर मत कोण देईल? याबाबत माहिती दिली तर मग मी पुढे बोलेन.

<u>आयुक्त (समीर उन्हाळे):– </u>कर वाढविण्याच्या संदर्भामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेचे जकात नियम १९९७ साली तयार करण्यात आले होते.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>आयुक्त साहेब, कृपया हिंदीत बोलाल तर बरे होईल.

<u>आयुक्त (समीर उन्हाळे):–</u>नियम क्र. ५ आणि २ उपनियम २ याप्रमाणे आहे. विथीन सेवन डेज ऑफ द पासिंग ऑफ सच रिझॉल्युशन, द कमिशनर शॉल पब्लीश इन द म्युनिसीपल एरिया ए नोटिस स्पेशिफाईंग––

ए) द रेट अॅट विच अॅण्ड द डेट फ्राम विच ऑक्ट्राय शाल बी लेव्हीड,

बी) द नंबर अॅण्ड लोकेशन ऑफ ऑक्ट्राय नाकाज् द रुटस् बाय विच अॅण्ड द टाईम विथिन विच गुड्स इनटेंडेड फॉर इमेजिएट एक्सपोर्ट शॉल प्रोसिड फ्राम दि इर्न्टन्स नाका टु द एक्झीट नाका अॅण्ड स्केल ऑफ डिपॉझिट फिक्सड् अंडर क्लॉज(बी) ऑफ सब रुल (I) अॅण्ड

३ ) द कॉर्पोरेशन, मे बी पासिंग ए रिझॉल्युशन फ्राम टाईम टु टाईम, डिसाईड टु इनक्रीज ऑर रिडयुस् दी रेट ऑफ ऑक्ट्राय ऑन ऐनी गुडस् विथीन द परमीशीबल लिमिटस् व्हेन द कॉर्पोरेशन डिसाईडस् टु इनक्रीज ऑर रिडयुस् द रेट अकॉर्डींगली, इट शॉल फॉलो द प्रोसीजर लेड डाऊन इन सब रुल(२) अॅण्ड द रेट सो इनक्रीज्ड ऑर रिडयुस्ड शॅल बी अॅप्लीकेबल फ्राम द डेट स्पेशिफायड बाय द कॉर्पोरेशन फॉर दॅट पर्पज.

उल्हासनगर महानगरपालिकेचा जो जकात नियम आहे त्यामध्ये उपनियम ५ (३) मध्ये अशी पध्दत दिली आहे की, यामध्ये कश्या प्रकारे बदल करायचा आहे? यामध्ये २ रा विभाग येतो तो असा की, आमचा ठेका चालु आहे. त्या कालावधीत जर काही काही बदल करायचा असेल तर त्यानुसार नगरविकास विभागाचा एक शासन निर्णय आहे, त्यामध्ये असे लिहिले आहे की, ठेका चालु असतांना सर्वसाधारणपणे कोणतेही बदल केले जावु नयेत जर करायचे असतील तर ''इट इज माय इंम्प्रेशन दॅट वुई हॅव टु टेक अॅपरुव्हल ऑफ स्टेट गर्व्हमेंट इन दिस रिगार्ड अॅण्ड वुई शॉल द.''आयुक्तांनी त्याबाबत राज्य सरकारकडुन मान्यता घ्यावी.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>म्हणजे आपल्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, जकात दरामध्ये वाढ करण्यासाठी राज्य सरकारकडुन परवानगी घ्यावी लागेल. या तीन चार बाबींमध्ये वाढ करत असाल तर.

<u>आयुक्त (समीर उन्हाळे):–</u>नियम ५ (३) जो आहे तो असे म्हणतो की, जर काही बदल करायचे असतील तर सात दिवसाची नोटिस दिली पाहिजे आणि ती महापालिका क्षेत्रामध्ये प्रसिध्द केली पाहिजे. तसेच शासन निर्णय जो आहे

तो असे म्हणतो की, ठेक्याच्या कालावधीमध्ये जर काही बदल करायचे असतील तर सर्वसाधारणपणे ते करण्यात येवु नयेत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>आपले म्हणणे असे आहे की, आपणांस शासनाकडुन याबाबतीत मार्गदर्शन घ्यावे लागेल. त्याअगोदर जकातीचे दर वाढविता येणार नाहीत. आपल्या म्हणण्यानुसार हे बरोबर आहे ना?

<u>आयुक्त (समीर उन्हाळे):—</u>होय.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>संपुर्ण सभागृहासाठी आणि व्यापा—यांसाठी ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे, जसे आयुक्त साहेबांनी सांगितले की, शासन निर्णयाचा दुसरा भाग जो आहे तो असा आहे की, जो पर्यंत त्याबाबत आयुक्त साहेबांना वरच्या पातळीवरुन म्हणजेच राज्य शासनाकडुन मंजुरी मिळत नाही तोपर्यंत ते त्या ठरावामध्ये बदल करु शकत नाहीत. मा. महापौरजी मी आपणांस विनम्रपणे निवेदन करेन की, कृपया करुन पहिले या शहरास, शहरवासियांना ज्या मुलभुत सुविधा दयायच्या आहेत त्यामध्ये आम्ही विरोधी पक्ष या नात्याने आपणांस पुर्णपणे सहकार्य करु. त्याबाबत आपण विचार करा. आणि त्यानंतर जर आपणांस वाटत असेल की या शहराच्या विकासासाठी एखादया करांमध्ये किरकोळ वाढ करायची आहे. तर त्याबाबतीत विचार केला जावु शकतो. मी प्रथमच आपणांस सांगितले आहे की, विरोध करायचा म्हणुन बोलायचे असा माझा स्वभाव नाही. मी आपणांस स्पष्टपणे सांगु इच्छितो की, आपण व आम्ही कोणत्याप्रकारे या शहरातील नागरीकांना मुलभुत सेवा सुविधा देवु इच्छितो? थकबाकी पहा, ५० कोटी रुपयांची रक्कम थकबाकी म्हणुन बाकी आहे. ती वसुल करण्यासाठी पथक नेमा. थकबाकी कोणत्याप्रकारे वसुल केली जावु शकते. ब—याचशा मिळकती आहेत. लग्नाचे हॉल आहेत, हॉटेल्स आहेत, त्यांची कर आकारणी होणे बाकी आहे. ती थकबाकी कशी वसुल केली जाईल? पाणी पुरवठा विभागामध्ये बिगर घरगुती नळजोडण्या आहेत. आयुक्त साहेब, आपणांस माहित नसेल मी आपणांस सांगु इच्छितो की, आजच्या तारखेला ज्या बिगर घरगुती नळजोडण्या आहेत त्या साधारणपणे सहा ते सात हजार असतील. प्रत्यक्षात संपुर्ण शहरामध्ये २० ते २५ हजार अशा मिळकती असतील जेथे नळ जोडणी आहे. आपण त्यांच्याकडुन पैसे घ्या. बाकी जी जनता टॅक्स भरते तिच्यावर आणखी कराचे ओझे लादणे व त्यांच्याकडुन वसुली करणे हा कुठला न्याय आहे? मी मा. महापौर, मा. आयुक्त व स्थायी समिती सभापतींना निवेदन करेन की, त्यांनी माझ्या या मुद्दयांवर विचार करावा. व यावर्षी करांमध्ये कोणतीही वाढ न करता आम्हांला, शहरवासियांना कोणत्या मुलभूत सुविधा दयायच्या आहेत त्यांवर विचार केला जावा. व येणा—या वर्षामध्ये जेव्हा आमच्याकडुन समर्थनाची अपेक्षा कराल तेव्हा आमचा पहिला उद्देश नागरीकांना मुलभुत सुविधा देणे हा राहिल. त्यानंतर आम्ही विचार करु शकतो. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त साहेब व स्थायी समिती सभापती, माझे मित्र श्री. राजु जग्यासी यांनी शहरातील स्थिती अतिशय चांगल्याप्रकारे सभागृहात प्रस्तृत केली. त्याबाबत मी काही बोलु इच्छितो. या अर्थसंकल्पाच्या अगोदर जेवढे काही अर्थसंकल्प सादर करण्यात आले ते या शहराच्या ज्या महापौर होत्या त्याच स्थायी समितीच्या सभापती होत्या त्यांनी सादर केले होते. त्या म्हणत सलग पाच वर्ष स्थायी समिती सभापती होण्याचा मला गौरव प्राप्त आहे. सलग पाच वर्ष या सभागृहात अर्थसंकल्प सादर करण्याचे मला सौभाग्य प्राप्त आहे. व त्यावेळी विरोधी पक्षामध्ये मी बसलेलो होतो व मी म्हटले होते की, या सलग पाच वर्ष अर्थसंकल्प सादर करत आहेत व शहराचे दुर्भाग्य होत आहे. मी सभागृहामध्ये आज सांगु इच्छितो की, मागील पाच वर्षामध्ये या शहराच्या महापौर व स्थायी समितीच्या सभापतींनी अर्थसंकल्प सादर केला आहे. व शहरास १२६ कोटीच्या कर्जामध्ये बुडविले आहे.

यावेळी काही सदस्य शेम शेम असा आवाज देत होते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ही सर्व माहिती माझ्याकडे आहे मी ती सर्व सदस्यांना देवु शकेन. सलग दोन वेळेस सन २००२—२००३ च्या अर्थसंकल्पामध्ये जेव्हा विरोधी पक्षामध्ये मी भारतीय जनता पार्टीचा गटनेता होतो त्यावेळेस त्यांनी ३९ बाबींवरील जकात दरात वाढ केली होती. व आता आम्ही वाढ केली आहे ती फक्त पाच बाबींवर व या पाचही बाबी त्या ३९ बाबींमध्ये समाविष्ट आहेत. त्या ३९ बाबींची यादी मी देईन. त्यांनी त्या ३९ बाबींवरील जकात दरामध्ये वाढ करुनही या शहरावर १२६ कोटीचे कर्ज केले आहे. दुस—या वेळेस २००४—२००५ मध्ये त्यांनी ९ बाबींवरील जकात दरात वाढ केली. त्यावेळेस आम्ही लोक ओरडत राहिलो की

शहरामध्ये काम होत नाही. जी भाषा मी बोलतो तीच भाषा श्री. राजु जग्यासी बोलत आहेत हे पाहून मला अतिशय आनंद झाला. ते म्हणतात की शहरामध्ये कचरा आहे, पाण्याची समस्या आहे, सार्वजनिक बांधकाम विभागात कामे होत नाहीत. परंतु १९९७ मध्ये जेव्हा या शहरामध्ये महानगरपालिका स्थापन झाली त्यावेळेस १९९७ व १९९८ ही दोन वर्ष वगळता या शहरावर सत्ता कोणी राबविली? या शहरावर शासन चालविणारे कोण होते? या चार महिन्यामध्ये व मागील पाच वर्षातील टॅंकरचे काम पाहिले तर असे दिसुन येईल की, २५ टक्के टॅंकर फे—यांची संख्या कमी झाली आहे. आपण दस्तऐवज पहा, सन २००२ पासुन २००६ पर्यंत टॅंकर मागणी साठी कुणी जात असे तर तेथे मारामारी होत होती. व आज टॅंकर मागणीची स्थिती पहिल्यापेक्षा कमी झाली आहे. आम्ही अशी काही जादुची छडी तयार केलेली नाही की, ती फिरविल्यामुळे रातोरात या शहरातील कचरा हटविला जाईल. आपण कधी असे ऐकले नसेल की महाराष्ट्रातील कोणत्याही महानगरपालिकेतील कच—याचा ठेका १० वर्षासाठी दिला आहे म्हणुन?

यावेळी काही सदस्य शेम शेम असा आवाज देत होते.

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**</u> सत्ताधारी पक्षाचा सदस्य असुन सुध्दा मी असा प्रश्न विचारला होता की, ॲन्थोनी काम करत नाही. मी आयुक्त साहेबांना धन्यवाद देतो. त्यांनी संपुर्ण आरोग्य विभागाची, स्वच्छता निरिक्षकांची, उपायुक्तांची बैठक बोलावुन चर्चा केली. त्यांनी ब—याचशा समस्या सोडविण्याचे प्रयत्न केले आहे. परंतु आमच्याकडे अशी काही जादुची छडी नाही की १० वर्षामध्ये आपण शहरामध्ये जो कचरा केला आहे तो एक मिनिटामध्ये आम्ही हटवु शकु.

यावेळी काही सदस्य शेम शेम असा आवाज देत होते.

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**</u>आपण केलेली दुर्गंधी हटविण्यासाठी आम्हांस काही वेळ लागेल. तसेच आपणांस सांगु इच्छितो की मालमत्ता करामध्ये २ वेळा आपण एवढी मोठी वाढ केली आहे. त्यावेळेस भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेचा त्यास कडाडुन विरोध होता. व आज आम्ही मालमत्ता करामध्ये कोणतीही वाढ केलेली नाही. या शहरास आम्ही जे वचन दिले होते की, आम्ही मालमत्ता कर वाढविणार नाहीत. मी दाव्यानिशी सांगु इच्छितो की, आजसुध्दा मालमत्ता करामध्ये १ रुपयाची सुध्दा वाढ केलेली नाही. राहिला पाण्याचा प्रश्न, आज जर आम्ही मुंबईला जातो याअगोदरच्या ५ वर्षामध्ये जेव्हा आमचे श्री. नितीन गडकरी हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री होते त्यांनी त्या शहरात बरेचसे उड्डान पुल तयार केले. आज आपण २० रुपये, ४० रुपये, ५० रुपये टोल टॅक्स भरतो. कुणी त्यास विरोध करतो का? नाही करत. कारण की, या अगोदर मुंबईला जाण्यासाठी ४ तासाची आम्हांस जी वेळ लागत होती तेथे आज आम्ही १ तासामध्ये मुंबईला पोहोचतो. पेट्रोलची आमची बचत होते. वेळेची बचत होते. त्याप्रमाणे या शहरास जर सुंदर बनवु इच्छित असाल तर आपणांस काही ना काही त्याग तर करावाच लागेल. आणि जर आम्ही घाबरत राहिलो तर आम्ही या शहरामध्ये कधीच सुधारणा करु शकणार नाहीत. आम्हांस भयमुक्त झाले पाहिजे. मी काही दिवसापुर्वी एका शेतक—यास विचारले भाऊ आपण गव्हाची शेती लावली आहे काय? त्याने मला सांगितले की नाही. मी विचारले का नाही लावली? त्याने सांगीतले की, मला भिती होती की पाऊस पडला नाही तर काय होईल? तर मी त्यास विचारले की आपण मक्याची शेती लावली असेल? त्याने मला उत्तर दिले की,मक्याची शेती सुध्दा मी लावली नाही मी त्यास विचारले मक्याची शेती का नाही लावली? त्याने सांगितले की यासाठी लावली नाही की त्यांवर जर कोणता रोग पडला तर? त्यावर मी त्यास विचारले की आपण कसली शेती लावली? त्यावर त्याने सांगितले की, मी कोणतीही जोखिम घेतली नाही. जर आपण जोखिम घेतली नाही तर या शहरास आपण प्रगतीच्या दिशेने नेऊ शकणार नाहीत. निवडणूका लढण्यामध्ये त्या हरण्याची जर भिती असेल तर आपण निवडणूका लढु शकणार नाहीत. हसण्यामध्ये वेडे म्हटंले जाण्याची भिती आहे, हसाल तर लोक म्हणतील वेडा आहे. रडण्यामध्ये कुणी आपणांस कमजोर म्हणेल याची भिती असते. आशेमध्ये निराशेची भिती. प्रत्येक गोष्टीमध्ये भिती आहेच आहे. आपण जर डोके पकडुन बसुन राहाल तर अशा परिस्थितीचा मुकाबला आपण कधी करु शकणार नाहीत. ज्यावेळेस आपण आपल्या मनामधुन ही भिती काढुन टाकाल तेव्हाच या शहरामध्ये सुधारणा होतील. १० वर्षामध्ये आपण या शहरामध्ये जी दुर्गंधी केली आहे त्यामध्ये सुधारणा आणण्यासाठी आम्हांला काही वेळ दया. आम्ही या शहरास एवढे सुंदर बनवुन देवु की, लोक सुरतला जसे खुबसुरत म्हणतात, तसे उल्हासनगरचे नाव सुध्दा सुवर्ण अक्षरांनी लिहिले जाईल. धन्यवाद ।

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—**मा. महापौरजी, आता श्री. जमनादास पुरस्वानी यांनी काही उदाहरण देवुन सभागृहाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला. तुम्ही काही गव्हाच्या, मक्याच्या शेतीची उदाहरणे देता. मी असे म्हणतो की श्री. जमनादास पुरस्वानी यांनी माझ्याकडे बघावे, दोन वर्ष भाजपा सेनेची सत्ता होती या उल्हासनगर महापालिकेमध्ये त्यावेळेस त्यांनी काय केले आहे? यांनी सुध्दा हेच केले आहे? आणि मागच्यांनी काय केले म्हणुन हे कोणी कार्ट मारले तर हे, पोरगं मारत आहेत, हे असे चालले आहे यांचे तसेच त्यांनी हे लक्षात घ्यावे की १३ किलोमिटरचे हे शहर आहे. आणि या शहरामध्ये जवळ जवळ १२५ झोपडपट्टया आहेत. या झोपडपट्टयांचा विचार जर सत्ताधा—यांनी व महापालिकेने केला नाही तर हे बरोबर होणार नाही. तुम्ही पहिल्याच वर्षी अशा पध्दतीने वाढ केली आहे की जेणेकरुन जो लाभार्थी आहे लाभार्थी त्यास सुट दयावयास पाहिजे होती ती देखील तुम्ही दिली नाही म्हणजे तुम्ही किती रक्त पिणारी माणसे आहात. व ते रक्त पिऊन चाटणारी माणसे आहात म्हणुन तुम्हांला समजले पाहिजे हे शहर १३ चौरस किलोमिटरचे आहे. या शहरामध्ये आपण कर वाढ करत असतांना श्री. जमनुजी तुम्ही सुध्दा सत्ताधारीत होते. तुम्ही सुध्दा तेच केले होते जे मागचे उदाहरण देता आम्हांला माहित नाही आहे. परंतु आज आपण जो अर्थसंकल्प सादर केला आहे तो बोगस आहे. तो बोगस असल्याकारणाने आम्ही जी सूचना केली आहे, तिचा सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब यांनी विचार करावा व आमच्या विनंतीला मान देवुन या सभागृहामध्ये सूचनाचा आदर करा. हा अर्थसंकल्प बरोबर नाही आहे, तो बोगस आहे, हा शहराच्या विकासासाठी नाही आहे. शहरातील कित्येक दुकानदार व बिल्डर कुणी पुणे तर कुणी नाशिक इकडे तिकडे स्थलांतरित झाले आहेत. तरीही तुम्ही मालमत्ता कर वाढविता. पाणीपट्टी वाढविता. अहो दिवसभरात एक दुकानदार एक मटके पाणी पितो. त्यास सुध्दा तुम्ही पाणी पट्टीचे एवढे दर आकारता? एवढे दर आकारावयास नकोत, आपण झोपडपट्टयामध्ये तर.........

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—**मा. महापौरजी........

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**श्री. बच्चाराम रुपचंदानी तुम्ही बसुन घ्या, तुम्ही बसुन घ्या. माझे बोलणे पुर्ण होवु दया. नंतर आपण माझ्या बोलण्यास विरोध करा. या उल्हासनगर महापालिकेत झोपडपट्टयांमध्ये पिण्याचे पाणी पुरविले जात नाही. टॅकरद्वारेही पाणी पुरविले जात नाही. टॅकर इमारतींमध्ये जातात. त्यामुळे महानगरपालिकेवर टॅकरवरील खर्चाचा एवढा मोठा भुर्दंड वाढत आहे. असे असतांना अर्थसंकल्पात काही बाबींवर कराचे दर वाढवत आहात हे बरोबर नाही. मी म्हटले आहे, यापुर्वी सुध्दा म्हटले आहे. हा बोगस आहे. पास होता कामा ये असे मी बोलतो.

**काही सदस्य :—** श्री. बी.बी. मोरे तुम्ही हिंदीत सांगा, मराठीत कशाला बोलता?

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. स्थायी समिती सभापती, मी स्थायी समिती सभापतींचे अभिनंदन करतो. आम्ही सभागृहास एक निवेदन करु इच्छितो की, एक सदस्याने एकाच वेळी बोलावे. एकच सदस्य वारंवार उठुन बोलु लागेल तर इतर सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार नाही. या अर्थसंकल्पाबाबत मी एक निवेदन करु इच्छितो की, जेवढे काही जलकुंभ आहेत, आज शहरामध्ये विदयुत भार नियमनाचा (लोड शेंडिंगचा) फार मोठा त्रास आहे, त्यामुळे जलकुंभ भरण्यास अडचणीचे होते. यासाठी तेथे डबल फिडरची व्यवस्था केली जावी. व दुसरे असे की, दरवर्षी अर्थसंकल्पाचे पुस्तक असो, सभेचा अजेंडा असो, पत्र असो अशी कोणतीही प्रत्येक आपण प्रत्येक नगरसेवकाच्या घरी पाठवितो. याकामी आपणांस पेपर, प्रिंटींग यावर खर्च करावा लागतो तसेच आपला माणुस व वाहन याकामी नगरसेवकांच्या घरोघरी पाठविला जातो. हा खर्च वाचविण्यासाठी प्रत्येक नगरसेवकास एक लॅपटॉप देण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद केली जावी. कारण की, अजेंडा वाटप करण्यासाठी महापालिकेचा माणुस रात्री बे—रात्री नगरसेवकांच्या घरी व ऑफीसमध्ये जातो ते बंद होईल. व ई—मेलद्वारे सर्वांना सभेचा अजेंडा व अर्थसंकल्प मिळेल धन्यवाद।

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**व नगरसेवकांना प्रशिक्षण देण्यात यावे.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**दुसरे असे निवेदन आहे की, प्रत्येक नगरसेवकांस संगणकाचे प्रशिक्षण देण्यासाठी आपल्या येथे एक शिबीर आयोजित केले जावे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**मा. महापौरजी आणि मा. आयुक्त साहेब, श्री. विनोद ठाकुर यांनी लॅपटॉपबाबत आता सांगितले त्याबाबतीत मला असे म्हणायचे आहे की महानगरपालिकेत शिकलेले नगरसेवक किती आहेत? आणि अशिक्षीत नगरसेवक किती आहेत? सर्वांना संगणक हाताळण्याचे ज्ञान आहे काय?

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**त्यासाठीच सर्वांना स्रंगणक हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात यावे.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**संगणक हाताळता येत नाही असे म्हणुन कसे जमेल? ते तर शिकावेच लागेल. त्यासाठी प्रशिक्षण दिले जावे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**आपल्या महानगरपालिकेमध्ये शिकलेले नगरसेवक किती आहेत? शिक्षित किती आहेत? काही सदस्यांचे शिक्षणच झाले नाही. लॅपटॉप काय आहे हेच त्यांना माहित नाही.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**माझे म्हणणे असे आहे की, आजकाल पाच वर्षाचा मुलगा घरी संगणक हाताळतो. आपण पाच वर्षाचे नाहीत.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**त्यांच्यासाठी प्रशिक्षणाची सुध्दा व्यवस्था करु.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, सचिव साहेब, सर्व अधिकारी आणि सर्व सदस्य, अर्थसंकल्पावर भरपुर चर्चा झाली आहे. काही चर्चा भरकटली सुध्दा मनात असलेली खवखव सर्व बाहेर निघाली. वास्तविक पाहता आजचा तो दिवस नव्हता. आज शहरासाठी आपण काय देवु शकतो? यांनी काय केले? त्यांनी काय केले? हे बोलण्याची जरुरत नव्हती. परंतु आपला सहभाग काय आहे? आमची कल्पना काय आहे? ती कल्पना देण्याची आवश्यकता आहे. या अर्थसंकल्पामध्ये हे आहे त्या ठिकाणी हे असले पाहिजे. एक सकारात्मक दृष्टीकोन जसा असतो. श्री. मोरे साहेब एका वेळेस म्हणतात की आम्ही याच्यामध्ये सुधारणा सुचवतो. सुधारणा करण्यास आपणांस कोणी नाही म्हटले आहे काय? एका बाजुने आपण म्हणता की आमच्या वतीने या—या सुधारणा करा आणि दुस—या बाजुने म्हणता की आमचा या अर्थसंकल्पास विरोध आहे. मुळात आपण सुचविलेली सुधारणा स्विकृत केली किंवा नाही? केली नसती तर आपण म्हणु शकत होता की आमचा विरोध आहे परंतु त्या अगोदरच आपण विरोध असल्याचे म्हणत आहात. म्हणजेच आपणांस प्रत्यक्षात काय म्हणायचे आहे तेच आमच्या लक्षात आले नाही. आपण सूचना केली आणि त्याचबरोबर आपण म्हणता की हा अर्थसंकल्प बोगस आहे आणि आमचा त्यास विरोध आहे. जर आपली सूचना मंजुर झाली नसती तर त्यानंतर जर आपण म्हणाला असतात की आमचा त्यास विरोध आहे. आपण सूचना दिलेली आहे की याठिकाणी अमुक अशी दुरुस्ती करा? तसेच श्री. राजु जग्यासी आपण तर काहीही सूचना दिली नाही. श्री. मोरे साहेबांनी सूचना दिली. परंतु त्यांनी आम्हांला द्विधा मनस्थितीमध्ये टाकले. जर आपला विरोधच आहे तर आपल्या सूचनांचे पालन करण्याची जरुरत नाही. म्हणजेच आपण विरोधासाठी विरोध करत आहात. जनतेला दाखविण्यासाठी विरोध करत आहात जर आपल्या मनामध्ये काही स्पष्ट अशी भूमिका आहे तर ती आपण सांगावयास हवी होती की, आमचे हे म्हणणे आहे, असे झाले पाहिजे. आणि त्यास जर स्विकृती दिली नसती तर त्यानंतर आपले बोलणे योग्य होते. याचाच अर्थ आपण अगोदरपासुन तयारी करुन आला आहात की, आपण सुचविलेल्या सूचना स्विकृत होणार नाहीत. यास्तव आम्ही म्हणतो की आपण जे म्हणता ते चुकीचे आहे. मा. महापौर महोदया, स्थायी समिती सभापतींचे मी अभिनंदन करतो की, जो अर्थसंकल्प १९९७ साली वारंवार १४ कोटी, १५ कोटी जकात उत्पन्न असलेला अर्थसंकल्प त्यावेळेस नगरपालिकेमध्ये एकछत्री अंमल होता. ८५—८६ पासुन ते जवळ जवळ ९७ पर्यंत एकछत्री अंमल असतांना अर्थसंकल्प होता तो ३० आणि ३५ कोटीच्या आतमध्ये, १९९७ मध्ये या महानगरपालिकेमध्ये शिवसेना, भाजपाची सत्ता आली. आणि त्यानंतर ख—या अर्थाने या महानगरपालिकेच्या आर्थिक विकासाला सुरुवात झाली नाहीतर त्या अगोदर जाणुनबुजुन जकात, पाणी पट्टी ही वर्षानुवर्षे तेवढीच होती. त्यापुर्वी जकातीचे उत्पन्न पाच—सहा वर्ष १४ कोटी, १५ कोटी एवढेच होते. परंतु शिवसेना भाजपाची सत्ता आल्यानंतर जकात दर न वाढविता १५ कोटीचे उत्पन्न सरळ २८ कोटी वर गेले. दुस—या वर्षीचे उत्पन्न ३० कोटीवर गेले. अशा प्रकारे अर्थसंकल्पामध्ये वाढ होत गेली. आणि त्या नुसार सुधारणा होत गेली. श्री. राजु जग्यासी साहेब हे बरोबर आहे काय? नगरपालिकेच्या कालावधीत अर्थसंकल्प ३० ते ३५ कोटीच्या आत होता. तो आज ३१९ ते ३९२ कोटीच्या आसपास घेवुन आलो आहोत. २ वर्षामध्ये आम्ही जो पाया घातला होता त्यामध्ये कोणतीही सुधारणा केली नाही फक्त आकडयांची आदलाबदल केली. हे चालत होते?

३६ कोटीचा अर्थसंकल्प २ वर्षामध्ये आम्ही जवळ जवळ ८६ कोटी पर्यंत घेवुन गेलो. त्यासाठी आम्ही प्रशासनाच्या मागे लागलो. जकातीची वसुली वाढविली. मालमत्ता कराची वसुली वाढविली तेही दर न वाढविता. ८६ पासुन मागील ५—६ वर्षापर्यंत प्रत्येक वर्षी जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, २००३ मध्ये जकात दरांमध्ये वाढ केली. २००४—२००५ मध्ये पुन्हा एकदा वाढ केली. ९ बाबींवर जकात दरात वाढ केली. २००५—२००६ मध्ये मालमत्ता दरामध्ये वाढ केली. त्यानंतर पाणी पट्टी दरात वाढ केली त्यानंतर सुध्दा लोकांना आपण काय दिले? श्री. राजु जग्यासी यांना मी उत्तर देतो, उत्तर देण्याची आवश्यकता नव्हती परंतु त्यांनी आमच्यावर लांच्छन लावले आहे. याचे समर्पक उत्तर श्री. जमनादास पुरस्वानी यांनी दिले आहे. परंतु जे काही राहिले आहे ते मी पुर्ण करतो. मागील ८ वर्षामध्ये सलगपणे खर्च अर्थसंकल्प सादर केला. शहराला रंगीत स्वप्ने दाखविण्यात आली. कधी ३३ रोड तर कधी ४० रोड. वारंवार तेच रोड येत होते. कधी बीओटीचे स्वप्न दाखविले परंतु साकार झाले नाही. गुलशन नगरमध्ये आयटी पार्कचे स्वप्न दाखविले परंतु ते होवु शकले नाही. आमच्या श्री. लाल पंजाबी यांनी त्या अर्थसंकल्पाच्या वेळी सांगितले होते, ''हो ना सका.'' अतिशय चांगल्याप्रकारे उत्तर त्यांनी दिले होते परंतु प्रशासनाकडुन ते काम होवु शकले नाही. त्यानंतर सुध्दा आपल्यामध्ये काही फरक पडला नाही. जे आठ वर्षामध्ये किंवा मागील अठरा वर्षामध्ये होवु शकले नाही त्याबाबत आपण आम्हांस म्हणत आहात की तीन महिन्यामध्ये आपण काय केले? तीन महिने असेच गेले. अदयापपर्यंत अर्थसंकल्प सुध्दा झाला नव्हता. तो अर्थसंकल्प आम्ही सादर करत आहोत. लोकांना आम्ही देवु इच्छितो. त्या अगोदरच आपण म्हणत आहात की, काय करणार? आपण आमच्यावर विश्वास ठेवा. आम्ही जे बोलतो ते करत असतो. जे १९९७ पासुन ९९ पर्यंत झाले तेच यापुढे पाच वर्ष होईल. व शहराचा विकास होईल जसे ३३ रोड. तसेच पाणी पुरवठयासाठी किर्लोस्कर कंन्सटंन्सीची जी योजना होती त्या वेळेस श्री. मोरे साहेब सुध्दा आमच्या बरोबर होते. बरोबर ना? त्या योजनेसाठी आपण आम्हांला सहकार्य दिले होते. ३३ रोडसाठी सुध्दा विरोध झाला होता परंतु आपण सहकार्य दिले होते. त्याचप्रकारे आजसुध्दा मोरे साहेब सहकार्य करतील. ते आज विरोध करत आहेत. परंतु ते सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन आहेत. आज त्यांनी अर्थसंकल्पामध्ये काही सुधारणा सुचविल्या परंतु आमचा विरोध आहे. असे ही ते म्हणतात ते द्विधा मनस्थितीत आहेत. परंतु जेव्हा वेळ येईल तेव्हा श्री. मोरे साहेब आमच्या बरोबर असतील. याची मला खात्री आहे. कारण याबाबत मला पुर्वीचे दोन अनुभव आहेत. ३३ रोडच्या वेळेस त्यांनी साथ दिलेली आहे. बरोबर आहे ना? विकासाला तुमची साथ आहे की नाही? बोला ना, नाही तर नाही म्हणा. ३३ रस्त्यांच्या वेळेस विरोध झाला होता तुम्ही साथ दिली होती म्हणुनच ते रस्ते होवु शकले हे तुम्ही मान्य करता आता आमची विनंती आहे या विकासाच्या गंगेमध्ये तुम्हीही सामिल व्हा. फक्त विरोध करु नका. ३९२ कोटीचा अर्थसंकल्प, ठिक आहे काही चुका होत असतील. चुका सुधारायला वेळ मिळेल. आज श्री. राजु जग्यासी व श्री. बी.बी. मोरे साहेब तुम्ही विरोध करता बाकी सदस्य बाके वाजवत आहेत. परंतु १५९९ कोटीचा जेएनएनयुआरएमचा जो प्रकल्प आम्ही शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला या वर्षी १७१ कोटी जेएनएनयुआरएम कडुन आपणाला मिळणार आहेत आणि त्यावेळेस तो ठराव पारीत करतांना आम्ही त्याच्यामध्ये वचने दिली आहेत, खात्री दिली आहे की आम्ही मालमत्ता करामध्ये, पाणी करामध्ये वृध्दी करु जेणेकरुन महानगरपालिका घेतलेले कर्ज परत फेड करेल. आणि या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये आम्ही तरतुद केली आहे आणि त्यांना तसे वचन दिले आहे. जर ते आपण पाळले नाही तर आपल्या या संकोचीत वृत्तीमुळे लोकांना काय वाटले? त्यामुळे आपले १५९९ कोटीचे वेगवेगळे प्रकल्प तसेच रखडुन पडतील आणि त्या रवरव घाणीमध्ये आपणांस तसेच राहावे लागेल. आपली तशी इच्छा आहे का? की उल्हासनगरचे काही काम होवु नये? ही आपली इच्छा आहे काय? वाढ करायची असेल? रोग झाला आहे, औषध नाही घेतले, औषध कडु असेल तरीही ते घेतले पाहिजे नाही घेतले तर रोग बरा होणार नाही. डेंग्यु, साधा आजार मलेरीयावर जाईल, डेंग्यु असेल तर लेप्टोस्पायरेस वर जाईल आणि मग सर्व बंद होईल त्याऐवजी एखादी गोळी घेतली तर बरे पडेल. ती गोळी कडु असली तरी चालेल. लोकांना समजुन सांगु. लोकांना सुविधा दिल्यानंतर ते पाच काय दहा रुपये भरतील. लोकांना सुविधा दिल्या पाहिजेत. आपण सुविधा देवु शकत नाही. मागच्या अर्थसंकल्पाच्या वेळी आम्ही सांगितले होते की सर्व नाटक करता येते परंतु पैश्याचे नाटक करता येत नाही. तुम्ही आणि आम्ही मिळुन लोकांना समजावुन सांगितले पाहिजे. फक्त विरोध करु नका. उल्हासनगर महानगरपालिका जी आर्थिक संकटात सापडली आहे. तिला बाहेर काढणेसाठी आपण आपल्या उत्पन्नाचे साधन निर्माण करायचे आहे. दुसरे कोणी येणार नाही. दुसरे कोणी यायला त्यांनी अट टाकली आहे. तुमची आर्थिक स्थिती जर व्यवस्थित असेल त्यासाठी करावयाच्या तरतुदी ज्या आहेत त्या आपण मान्य केल्या आहेत. त्यामुळे आता तुम्हांला सुध्दा पर्याय नाही. जेएनएनयुआरएमचा जो प्रस्ताव मंजुर केला आहे त्याच्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे उल्हासनगर महानगरपालिकेस जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियानात सहभागी होण्यासाठी तसेच त्या अंतर्गत येणा—या विविध प्रकल्पांना खालील बाबींच्या अंतर्भावासह मान्यता देत आहे. एक मताने झालेला हा ठराव आहे. त्याच्यामध्ये अट क्र. ७ मध्ये सर्वसाधारण

मिळकत कर म्हणजे प्रॉपर्टी टॅक्स सध्या २६.०० टक्के सदर दर २००३–०४ सालापासून सुधारीत केलेला नाही. श्री. जग्यासी साहेब, येथे नमुद आहे. जवाहरलाल नेहरू अभियानात सदर कर हा महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत करणे अनिवार्य असल्यामुळे अर्थसंकल्पात आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यास मंजूरी देत आहोत. याचा अर्थ काय? म्हणजे त्यावेळेस आपण मान्य करतो की अर्थसंकल्पामध्ये आम्ही वाढवु. आणि आता ते वाढल्यानंतर विरोध करतो. श्री. मोरे साहेब तुम्ही सांगितल्याप्रमाणे १५० रुपये, १२५ आणि १०० किंवा ७५ रुपये सांगितले. उल्हासनगर महानगरपालिका ही आर्थिक संकटात सापडली आहे ती त्यातुन बाहेर निघाली पाहिजे. त्याच बरोबर उल्हासनगर महानगरपालिकेच्या जनतेवर जास्त बोझा पडला नाही पाहिजे. त्याचेही भान याठिकाणी बाळगले पाहिजे. १७१ कोटी केंद्रशासनाकडुन मिळणार आहेत आणि त्याची तरतुद महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात करणे आवश्यक आहे. ती जर केली नाही तर १७१ कोटी या वर्षाचे असे २०१२ पर्यंत १५९९ कोटी आपणांस मिळणार नाहीत. म्हणुन त्याची तरतुद या अर्थसंकल्पात आपण केली. नाही तर ५० रुपये हे शहरातील नागरीकांना फार जास्त नाहीत यासाठी आपण लोकांना समजावुन सांगा. १५९९ कोटी रुपय बुडवायचे की ५० रुपये वाढ थांबवायची. हे तुम्ही ठरवा. महिन्याचे ५० रुपये म्हणजे वर्षाचे ६०० रुपये या वाढीमुळे जर १५९९ कोटी उल्हासनगर महानगरपालिकेला मिळत असतील तर विरोध करण्यामध्ये काहीही अर्थ नाही. माझी आपणांस विनंती आहे की तुम्ही याबाबतीत विचार करा. आणि विरोध न करता हा अर्थसंकल्प सर्वानुमते मंजुर व्हावा आणि एकमताने मंजुर व्हावा. आम्ही उल्हासनगरच्या विकासासाठी आणि १५९९ कोटी संपुर्ण उल्हासनगरला नवी दिशा देणार आहे. हे कोणी केले काय केले वगैरे. यामध्ये वाद होता कामा नये. म्हणुन सर्वानुमते तो ठराव स्थायी समितीत ज्या पध्दतीने मंजुर केला आहे त्याच पध्दतीने हा ठराव मंजुर करावा. आणि यामागे काय झाले? आम्ही नेहमी सांगत असतो की कोळसा कितीही उगळला तरी तो काळाच. जो कोळसा होता तो उगळुन उगळुन कितीही उगाळला तरी एक मणभर सर्फ टाकली तरी तो धुवुन निघणार नाही त्यामुळे पुर्वी काय झाले हे कुणी काढु नये. आम्ही काढणार नाही. यापुढे उल्हासनगरसाठी विकास, विकास आणि विकास हे एकच स्वप्न आणि ध्यास ठेवुन हा जो अर्थसंकल्प आहे तो पहिल्यांदाच आम्हांस सादर करावयास मिळतो आहे. त्यासाठी तुम्ही बरोबर असा. ३९२ कोटी ही फार मोठी रक्कम आहे. त्यामध्ये महानगरपालिकेची रक्कम फार कमी आहे आणि ती भरुन काढण्यासाठी जे काही २६ कोटीची तुम्ही सांगितली १४५ आणि १२१ मागच्या वर्षीचे १२१ व या वर्षीचे १४५ कोटी यामधील जी २६ कोटीची जी तुट आहे त्यासाठी मालमत्ता करामध्ये फार थोडी वाढ आहे. आणि जकातीमध्ये थोडीफार वाढ आहे. जकातीबाबत शासन पूढे काय करेल ते सांगता येणार नाही. परंतु आम्ही आमचे काम करणे आवश्यक आहे. उल्हासनगरसाठी आम्ही हे देत आहोत. बाकी प्रशासनाचे काम आहे. त्यांनी या योजनेची शासनाकडुन किती दिवसात मंजुरी आणायची, आणि आणायची किंवा नाही आणायची? आणली तर ठिक आहे, नाही आणली तर उल्हासनगरच्या लोकांना रडायची गरज नाही. ज्या दिवसापासुन आणली जाईल त्या दिवसापासुन भरावयास उल्हासनगरच्या लोकांना तयार करा. आमची इच्छा उल्हासनगरला एक वेगळी दिशा देण्याची आहे. या प्रक्रियेमध्ये उल्हासनगरच्या लोकांना सहभागी करा. त्यांचे काही गैरसमज असतील किंवा त्यांना कुणी काही फसवत असेल तर त्यांना समजावणे, शांत करणे हे काम आपले आहे. प्रत्येकजण उल्हासनगर चांगले राहण्याचे स्वप्न पाहत आहेत, बरेचसे लोक उल्हासनगर सोडुन जात आहेत. त्याची कारणे काय तर उल्हासनगरमध्ये सुविधा नाहीत. आणि स्वत:च्या उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण केले नाहीत तर शासन काही देणार नाहीत, सुविधा देण्यासाठी साफसफाई ठेवण्यासाठी आपले आर्थिक उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे यापासुनच आपण त्याचा श्रीगणेशा करु या. आणि उल्हासनगरला चांगली दिशा देवु या आणि शासनाचा जास्तीत जास्त निधी वापरुन उल्हासनगर स्वच्छ व सुंदर आणि चांगले करु या. मी पुन्हा एकदा सर्वांना विनंती करतो समजले नसेल तर पुन्हा विचारुन घ्या. काही शंका असतील त्या काढता येतील परंतु उगीचच विरोध नसावा. विकासामध्ये सर्वांचा सहभाग असावा. जय हिंद। जय महाराष्ट्र।

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, अर्थसंकल्पावर बरीचशी चर्चा झाली आहे. म्हणतात की काही मिळविण्यासाठी काही गमवाव लागत. आपले भाग्य आहे की आपल्या कार्यकाळावधी मध्य जेएनएनयुआरएम सारख्या योजना येथे आल्या आहेत या योजनांची जर अंमलबजावणी झाली तर येथे जेवढे नगरसेवक बसले आहेत ते पुढील पाच वर्षाच्या कालावधी नंतर जेव्हा निवडणूकाला सामोरे जातील तेव्हा ते १०० टक्के निवडुन येतील अशी माझी आशा आहे. ७० टक्के रक्कम आपणांस केंद्र व राज्य शासनाकडुन मिळणार आहे. थोडीफार रक्कम आपणांस दयावी लागणार आहे. ती सुध्दा एक रक्कमी दयायची नाही प्रत्येक वर्षी थोडी थोडी रक्कम दयायची आहे. यासाठी आम्ही यावेळेस फक्त जकात दरामध्ये थोडी वाढ केली आहे व पाणी पट्टीमध्ये किरकोळ स्वरुपात वाढ केली

आहे. मला असे वाटते की हे शहर वाशियांवर फार मोठे ओझे नसेल. शहरवासियांनी थोडीफार साथ दिली तर हे शहर विकास कामांमध्ये चमकुन जाईल. जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की यापुर्वी मुंबईला जायला आम्हांला तीन–तीन तास लागत होते आता उड्डानपुल तयार झाल्यामुळे टोल टॅक्स दयावा लागत असला तरी पेट्रोलची बचत होत आहे तसेच एका तासामध्ये जाता येत असल्याने वेळेचीही बचत होत आहे. जेएनएनयुआरएमच्या प्रकल्पांची येथे अंमलबजावणी झाली तर येथे जी वाहतुकीची अडचण आहे, पार्किंगची अडचण आहे त्या सर्व दुर होतील. मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, जो मालमत्ता कर आहे त्याची वसुली खुपच कमी होत आहे. यासाठी मी आपणांस सूचना करतो की, येथे जे कर्मचारी १०–१० वर्षापासुन एकच विभागामध्ये काम करत आहेत, काल धनुष्यधारी वर्तमानपत्रमध्ये एक वृत्त आले होते की एक कर्मचारी आपली स्वत:ची वसुली करत आहे. महानगरपालिकेची वसुली काही करत नाही. मी आपणांस विनंती करतो की, असे जेवढे काही कर्मचारी आहेत त्यांची बदली करा. पंधरा पंधरा वर्ष जे कर्मचारी एकाच ठिकाणी बसले आहेत त्यांची इतर ठिकाणी बदली करा. जसे नगररचना विभाग किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग वगैरे ठिकाणी. मालमत्ता विभागातील कर्मचा–यांची बदली केली तर कर वसुली वाढेल. तसेच पाणी पुरवठयाची पण वसुली कमी येत आहे. जिन्स धुलाईचे किती तरी कारखाने आहेत, जिन्स धुलाईचे जे कारखाने आहेत ते व्यवसायिक वापर दर्शवितात परंतु ते सांगतात की आमच्याकडे बोअरवेल आहे परंतु प्रत्यक्षात ते महानगरपालिकेचे पिण्याचे पाणी जिन्स धुलाईसाठी वापरतात. यासाठी सुध्दा जर दोन सदस्यांची समिती स्थापन केली तर ते धुलाईच्या कारखान्यांवर पाणी वापराबाबतीत नियंत्रण ठेवु शकतील. त्यामुळे पाणी बिलाची आपली जी वसुली आहे ती सुध्दा वाढेल. तसेच अनाधिकृत नळजोडण्या ब–याच आहेत. एकेकाच्या घरात तिन तिन नळजोडण्या आहेत. तसेच इमारतीमध्ये सुध्दा अश्या ब–याच नळजोडण्या आहेत ते बिल भरत नाहीत यासाठी कर्मचा–यांच्या बदल्या करा. काही कर्मचारी एकच विभागामध्ये पंधरा पंधरा वर्षापासून बसले आहेत. आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेत तीन–चार भाजी मार्केट आहेत, एक पाच नंबर येथे आहे, दुसरे दसहरा मैदान येथे आहे व एक कॅम्प नं. ४ येथे आहे, व दुसरे कॅम्प नं. २ येथे सुनिता अपार्टमेंट शेजारी. या मार्केटच्या पुर्न विकासासाठी आपण निविदा काढली तर चांगले होईल. मध्यंतरी कलकत्ता महानगरपालिकेने भाजी मार्केट पुर्न विकसित करण्यासाठी एक निविदा काढली होती. ते मार्केट रिलायन्स कंपनीने ५ कोटी रुपयांच्या बोलीमध्ये पुर्न विकसित करण्यासाठी घेतले. त्याप्रमाणे आपणाकडे जेवढे काही भुखंड आहेत जसे श्री. रामचंद्र चार्ली यांनी सांगितले की गुलशन नगर आहे, जसे फ्लॉट नं. ७०५, बोट

क्लब हे सर्व भुखंड जर आपण विकसित केले तर व बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर दिले तर त्यातुन महानगरपालिकेचे बरेचसे उत्पन्न वाढेल. दुसरे म्हणजे व्हीटीसी गार्डन हे फार मोठे उदयान आहे. तेथे संध्याकाळी १७ सेक्शन येथुन १०० खाजगी बस जातात जर व्हीटीसी गार्डन बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर दिले व १०० रुपये दर ठेवला तर आपला रहदारीचा प्रश्न सुटेल. व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. तसेच मी आपणांस सांगतो की, पाणी पट्टी दर, आरसीसीसाठी, १०० रुपयाचे १५० रुपये करावयाचे आहेत. एसीसीसाठी ५० रुपयाचे ७५ करायचे आहेत. झोपडपट्टीचे ४० रुपयांवरुन ६० रुपये करायचे आहे. जकातीचा दर लोकर रेशमीकापड यावर आता १.८० टक्के आहे त्याचे २.००टक्के करायचे आहे. लेसेस,टेप्स लाकडी व धातुचे रिंगण यावर २.६०टक्के आहे त्याचे ३.५० टक्के करायचे आहे. तसेच लोखंड पोलादवर ३.२०टक्के आहे त्याचे ४.०० टक्के– करायचे आहे. सर्व प्रकारची रसायने यांवर ३.४५–टक्के आहे त्याचे ४.०० टक्के करायचे आहे. अलोह धातू पितळ,तांबे टीन इत्यादीसाठी १.५

टक्के आहे त्याचे २.५ टक्के करायचे आहे. व मालमत्ता करात कसलीच वाढ करायची नाही आहे. जसे आहे तसेच ठेवायचे आहे.

मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. भारत राजवानी, श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी हे सदस्य सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—एक मिनिट श्री. मोहन साधवानीजी, जकातीबाबत आता आपण जे म्हटले त्यामध्ये एक बाब आणखी समाविष्ट करु इच्छितो, ५ बाबीमध्ये ६ वी एक बाब मी समाविष्ट करु इच्छितो. ज्यामुळे आपल्या शहरावर फार मोठे आर्थिक ओझें पडणार नाही. तसेच आपला हा प्रस्ताव शासनाकडे जाणार आहे. एस्कॉर्टची फी जी २० रुपये आहे ती १०० रुपये केली पाहिजे. हि बाब यामध्ये समाविष्ट केली पाहिजे. आज पुर्ण महाराष्ट्रामध्ये एस्कॉर्ट फी १०० रुपये आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. आयुक्त साहेब, पाणीपट्टी मध्ये जी वाढ सुचविली आहे ती दरमहाची आहे. दरमहिन्याचे बिल तयार करण्यात यावे. तसेच दुसरी एक दुरुस्ती आहे, मृत्यु दाखला जो आहे तो श्री. बी.बी. मोरे यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे निःशुल्क देण्यात यावा. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारु नये. तसेच पृष्ठ क्र. २९ वर प्लीन्थ कंप्लीशन सर्टिफिकेटसाठी ५०० रुपये प्रस्तावित केले आहे. त्याऐवजी २००० रुपये केले जावेत.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—५००० करा त्यास. कंप्लीशन सर्टीफिकेट म्हणजे पुर्ण इमारत उभी केली जाते. व ती ठेकेदार उभी करतो.

सदस्य श्री. मोहन साधवानी :— श्री. बी.बी.मोरे साहेब म्हणतात ५००० करा. श्री. मोरे साहेबांचा मान राखा. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यासाठी सुध्दा ५०००/— रुपये घेतले जावेत.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—श्री. मोहन साधवानी आपले बोलणे झाले आहे ना? मा. महापौरजी मला एवढेच सुचित करायचे आहे की, मा. महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती यांचा निधी जो वाढविला आहे. त्याऐवजी सन्माननिय सदस्यांचा नगरसेवक निधी वाढविला असता तर अधिक चांगले झाले असते. कारण तुम्हाला या निधीची जास्त गरज पडत नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—श्री. मोरे साहेबांना धन्यवाद ।

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—महापौर निधी जास्त झालेला आहे आणि नगरसेवकांना निधी कमी आहे. त्यांच्या प्रभागामध्ये जास्तीत जास्त विकास कामे व्हावीत आणि त्यांनी पुन्हा निवडुन यावे. यासाठी सन्माननिय सदस्यांचा निधी वाढविण्यात यावा.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—पगाराबद्दल सुध्दा बोला.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—त्याचप्रमाणे सन्माननिय सदस्यांना माझी एक विनंती आहे, निधी वाढविण्याबाबत उत्तर मिळाले पाहिजे. वेळेला निधी वाढविण्यात आलेला होता परंतु नंतर तो पुन्हा कमी करण्यात आला आहे.

मा. सदस्या श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी व श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

उप—महापौर :—कोणता निधी? कोणता निधी वाढवायचा म्हणता?

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—प्रभाग समितीचा सुध्दा निधी वाढवा.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—मानधन, मानधन.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**मानधन, मानधन, पगार, पगार वाढवा.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**वर्षाचा जो असतो तो विकास निधी असतो आणि दर महिन्याला जे मिळते ते मानधन असते.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**श्री. मोरे साहेब, मानधन बद्दल जर बोलायचे असेल तर आपल्याला जे मानधन आहे ४०००/—रुपये, महापालिकेच्या कनिष्ठात कनिष्ठ दर्जाच्या कर्मचा—याला आपल्यापेक्षा जास्त पगार आहे. त्यामुळे मानधनाचा देखील विचार व्हावा. कारण की मुंबई महानगरपालिकेने नगरसेवकांचे मानधन वाढविले आहे. मी सर्व सदस्यांच्या वतीने बोलतो की, मानधन वाढविले पाहिजे. मुंबई येथे १५,००० रुपये मानधन आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** मा. महापौर महोदया, आताच मृत्यु दाखल्याचा मुद्दा निघाला. आयुक्त साहेब, मृत्यु दाखल्याच्या शुल्काबाबतचा आता जो मुद्दा येथे उपस्थित झाला त्यावरुन आठवले की, या महासभेने मागे दारिद्रय रेषेखालील जे लोक आहेत किंवा जे पैसे भरु शकत नाहीत अशा लोकांच्या घरी जर मयत झाले असेल तर प्रेतावर अग्नीसंस्कारकरण्यासाठी लागणारे जे सर्पण आहे ते विनामुल्य पुरविण्यासाठी महासभेने ठराव केला आहे. त्या ठरावाची अंमलबजावणी झाली तर महापालिकेचा सन्मान होईल. जे गरीब आहेत ते पैसे भरु शकत नाहीत. यासाठी महासभेने एक ठराव केला आहे. ठराव झालेला आहे परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नाही. यापुढे तरी त्याच्या अंमलबजावणीची तरतुद करण्यात यावी.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, जन्म व मृत्युचा दाखला घेण्यासाठी नागरीकांना सहा—सहा वेळा चकरा माराव्या लागतात. याबाबत संबंधीत कर्मचा—यांना सूचना दिल्या तर नागरीकांना जास्त त्रासाचे होणार नाही. मुंबई महानगरपालिका तर आजकाल ऑन लाईन जन्म दाखला देत आहे. तर आपणही अशी काही सुविधा करा की लोकांना जन्म दाखला ऑन लाईन मिळु शकेल. तसेच पान नं. ३० वर दर्शविलेला थेटर शो टॅक्स जो आहे तो आपण प्रस्तावित केला आहे ५० रुपये, आम्हांला असे वाटते की, प्रत्येक शो चा शो टॅक्स १०० रुपये केला जावा. मी सर्वांना विनंती करतो की, हा अर्थसंकल्प सर्व संमतीने पारीत केला तर फारच चांगले होईल. यामध्ये फार मोठी काही वाढ केलेली नाही. मालमत्ता करामध्ये कोणतीही वाढ केलेली नाही. पाणीपट्टी मध्ये किरकोळ वाढ केली आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**मा. महापौरजी, सभागृहनेताजी यांनी एक फार मोठी चुक केली आहे. ती अशी की या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये पुर्वी काय झाले असेल ते सोडुन दया. परंतु अर्थसंकल्प सादर करतांना स्थायी समिती सभापतीने आणि आमच्या सभागृह नेत्याने विरोधी पक्षाची आणि सत्ताधारी पक्षाची एक बैठक बोलवावयास पाहिजे होती. श्री. बोडारे साहेब, आपण जरा ऐकुन घ्या. तुम्ही म्हणता आम्हांला सहकार्य करा. परंतु एक मोठी घोडचुक झालेली आहे. ती तुमच्या लक्षात आणुन देतो. या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ज्यावेळेला तुम्ही हा अर्थसंकल्प सादर करणार होतात त्यावेळेला तुम्ही अगोदर सर्व गटनेत्यांची बैठक घ्यायला पहिजे होती. मग त्याच्यामध्ये विरोधी पक्ष असो किंवा सत्ताधारी असो यांची एक बैठक घेतली असती आणि सांगितले असते की, शहराच्या दृष्टीने तुम्हांला काय—काय सुचवायचे आहे, त्यावेळेस तुम्ही सुचवा, आमच्या परिने आम्ही सुचवितो. तुमच्या परीने तुम्ही सुचविले असते तर श्री. बोडारे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे उल्हासनगर शहर हे एक सुंदर नंदनवन करण्याची ताकत आमच्या रिपब्लीकन पक्ष आणि विरोधी पक्षात राहिली असती आणि आहे देखिल. हे तुम्हांलाही कळते, ही सत्ता एकटया पक्षाची नाही. थोडयाश्या वेगळया पध्दतीने बोलतो की ही खिचडी आहे. आणि खिचडीची जेथे सत्ता असते तिथे कोणताही निर्णय घेतला जावु शकत नाही. आणि मागे भाजपा, सेनेची सत्ता होती. त्यावेळेस ऐनवेळेला रिपब्लीकन पक्षाने त्यांना सहकार्य दिले होते. कारण शहराचा विकास झाला पाहिजे. शहरामध्ये ते रस्ते झाले पाहिजे होते. आणि म्हणुन त्योवेळेस १९९७ मध्ये आम्ही सत्ताधारी पक्षांना सहकार्य केले होते. म्हणुन त्यांचे आता हे चुकले आहे. त्यांनी ही चुक यापुढे कधी करु नये. असे मी सभागृहाच्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, माझी आपणांस एक विनंती आहे की, महानगरपालिकेच्या जेवढया काही शाळा आहेत तेथे वॉटर क्युरिफिकेशन यंत्रणा सक्तीने लावली पाहिजे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे की प्रत्येक शाळेमध्ये वॉटर क्युरिफिकेशन यंत्रणा लावली पाहिजे. तसेच

शहरामधील कचरा उचलण्यासाठी फारच त्रासाचे होत आहे. आमचे सफाई कामगार बंधु जे नाली सफाईचे काम करतात, त्यांच्याकडे कचरा उचलण्यासाठी व्हिलबोरोज नाहीत. त्या लवकरात लवकर मागविण्याची कृपा करावी. तसेच हे तीन रस्ते जे आहेत ते विकसित करण्यासाठी यामध्ये समाविष्ट केले जावेत. ब्लॉक नं. सी ४ ते डॉ. डॉ. मुंदडा हॉस्पीटल हा २५० रस्ता, ब्लॉक नं. ए १०१ ते ११७ हा २५० रस्ता व सेक्शन १७ ते अनंतपुरी दरबार, साई बाबा मंदिर हा ३५० रस्ता.

<u>**सदस्य श्री. सतिश चहाळ:—**</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर साहेब, आयुक्त साहेब, आज ३९२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मंजुर होत आहे. महाराष्ट्रामध्ये लहान—मोठी खेडे गावे आहेत. ती सुध्दा टॅकरमुक्त आहेत. ब—याचशा गावच्या सरपंचांनी आपली गावे टॅकरमुक्त केली आहेत. आज आपली ही महानगरपालिका असून व पाणी पुरवठयाची मात्रा वाढवुन सुध्दा जर उल्हासनगरमध्ये पाणी टॅकरची स्थिती अशीच राहिली तर माझ्या मते ३९२ कोटीचा जो अर्थसंकल्प आहे. त्यामध्ये उल्हासनगर शहरामध्ये मोटार न लावता नळाद्वारे स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे. अशी कळकळीची विनंती आहे. या कामी मा. महापौर व आयुक्त साहेबांनी लक्ष घालावे. आणि उल्हासनगर टॅकरमुक्त करावे हीच इच्छा आहे.

<u>**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**</u>तर हा अर्थसंकल्प सर्वसंमतीने पारीत केला जावा? तसेच श्री मोरे साहेब श्री. बोडारे साहेबांनी आपणास एवढे सांगितले की, शहराच्या विकासासाठी सहकार्य देवुन हा ठराव सर्वसंमतीने पारीत केला जावा. तर आपले मत काय आहे?

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**</u>शोले या चित्रपटामध्ये बसंतीची मावशी आहे तसे आहे हे. एवढे समजावुन सांगितल्यानंतर सुध्दा त्यांनी मानले नाही.

<u>**सदस्य श्री. सतिश चहाळ:—**</u>आम्ही सुधारणार नाहीत?

<u>**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**</u>अर्थसंकल्प सर्वसंमतीने पारीत समजायचा काय?

<u>**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**</u>नाही, नाही आमचा विरोध आहे.फसविण्याचा प्रयत्न करू नका, मतदान घ्या.

<u>सदस्या श्रीम.सुरेखा वेलकर :—</u>मतदान घ्या.

<u>महापौर :—</u>सचिव साहेब, सदर प्रस्ताव मतदानास टाका.

<u>महापालिका सचिव :—</u>जे सन्माननिय सदस्य सत्ताधारी पक्षाकडुन जो प्रस्ताव आला आहे, त्याचे समर्थन करु इच्छितात त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.



<u>**प्रस्तावाच्या बाजुने ४५ मते**</u>

१ श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण
२ श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान
३ श्री. सुरेश मधुकर जाधव
४ श्री. मोहन (गारो) रामरख्यानी
५ श्री. गोविंदराम डोलुमल लुंड
६ श्री. ठाकूर विनोद लालसिंग
७ श्री. लालबिहारी यादव
८ श्रीमती वनवारी मोना अशोक
९ श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी
१० श्रीमती चेनानी ज्योती रमेश
११ श्रीमती निलम प्रेमसिंग रावत
१२ श्री. दत्तात्रय नारायण पवार

१३ श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी
१४ श्री. प्रशांत किशनराव धांडे
१५ श्री. राम (चार्ली) फुंदुमल पारवानी
१६ श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद
१७ श्री. लाल देवनदास पंजाबी
१८ श्री. आयलानी कुमार उत्तमचंद
१९ श्री. बच्चाराम रूपचंदानी
२० श्री. सुखरामानी महेश पहलाजराय
२१ श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी
२२ श्रीमती जया प्रकाश माखीजा
२३ कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल
२४ श्रीमती शकुंतला पाटील
२५ श्री. किशोर जग्यासी
२६ श्री. चव्हाण रमेश महादेव
२७ श्री. बोडारे धनंजय बाबूराव
२८ श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज)
२९ श्री. राजेश देवेंद्र वानखेडे
३० श्री. रामसागर जनार्दन यादव
३१ श्री. गायकवाड दिलीप
३२ श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे
३३ श्रीमती मीना सोनेजी (सोंडे)
३४ श्रीमती बोडारे वसुधा धनंजय
३५ श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र
३६ श्री. मुकेश सोहन तेजी
३७ श्री. विजय खंडु सुपाळे
३८ श्री. शेखर केशव यादव
३९ श्रीमती विद्या विजय निर्मले
४० श्रीमती ज्योती शाम माने
४१ श्री. पाटील प्रधान धर्मा
४२ श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर
४३ श्री. मोहन साधवानी
४४ श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास
४५ श्रीमती मालती राधाचरण करोतिया

<u>महापालिका सचिव :–</u>जे सन्माननिय सदस्य सत्ताधारी पक्षाकडुन जो प्रस्ताव आला आहे, त्यास विरोध करु इच्छितात त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात १८ मते</u>

१ श्री. मोरे भानजी भिकाजी
२ श्री. ढोके जनार्दन किशनराव
३ श्रीमती पंचशिला नाना पवार
४ श्रीमती लता शांताराम निकम
५ श्रीमती सुमन गजानन शेळके

६ श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील

७ श्री. राजू जग्यासी
८ श्रीमती वेलकर सुरेखा राजन
९ श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती
१० श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम
११ श्रीमती सुजाता रमेश रिझवानी
१२ श्री. भठीजा (बब्बु) संजय
१३ श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा
१४ श्री. रविंद्र दशरथ बागूल
१५ श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी
१६ श्री. नरेंद्र दवणे
१७ श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी
१८ श्री. नीलु ठाकुर चांदवाणी

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—अर्थसंकल्प फुगविलेला आहे.

मा. सदस्या श्रीमती मंजु पोपटानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

महापौर :— सदरच्या विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय :— स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००७—०८ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००६—०७ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे.**

प्रस्तावना :

सन २००६—२००७ या वर्षा करिता अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न रू. **१९७.३० कोटी** अपेक्षीत होते आणि खर्च **रू. १९७.२० कोटी** अपेक्षित होता. अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न झाले नाही त्यामूळे खर्चात कपात करणे आवश्यक असून सदर वर्षात उत्पन्नाचा खर्चाशी मेळ बसविण्यासाठी आयुक्तांनी सन २००६—२००७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात येणे प्रमाणे स्थायी समितीसमोर सुधारणा प्रस्तुत केलेली होती.

उत्पन्न : १२१.४५ कोटी

खर्च : ११५.६७ कोटी

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदी प्रमाणे आयुक्तांनी सन २००७—२००८ करिता उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले असून ते स्थायी समितीसमोर खालील प्रमाणे सादर केले हाते.

उत्पन्न : ३१९.७६ कोटी

खर्च : ४०५.२६ कोटी

वित्तीय वर्ष २००७—२००८ चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट **रू. ८५.५० कोटी** जकात, मालमत्ता कर, पाणी पट्टी, टॅंकर भाडे व इतर फी च्या दरामध्ये वाढ करणेचा स्वतंत्र प्रस्ताव आयुक्तांनी पुस्तीकेच्या स्वरुपात स्थायी समितीपुढे सादर केला होते. तसेच आयुक्तांनी स्थायी समितीकडे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करताना त्या सोबत वर्ष २००५—०६ व २००६—०७ चे लेखा विवरण पत्र व अर्थसहाय देवून पुरवण्यात आलेल्या सेवां बाबत अहवाल सादर केला होता. सदर सेवा म्हणजे पाणीपुरवठा व मलजलाची विल्हेवाट, कचरा साफ करणे त्याची वाहतुक करणे व विल्हेवाट लावणे आणि रस्त्यावरील दिवाबत्तीची व्यवस्था इत्यादी.

शिक्षण मंडळाचे सन २००६ — ०७ चे सुधारित व २००७ — ०८ चे मुळ अंदाजपत्रक. :

## सन २००६ – ०७ चे सुधारित अंदाज

वर्ष २००६ – ०७ करिता शिक्षण मंडळातर्फे खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रु :– १२,४२,०३,०००/–**

**अंदाजपत्रकीय खर्च रु :– १२,४२,०३,०००/–**

उपरोक्त दर्शविलेल्या एकुण अंदाजात एकुण रु. ६,८३,९८,२५०/– महापालिका हिस्सा म्हणून अदा करण्याची तरतुद करण्यात आली होती.

## सन २००७ – ०८ चे मुळ अंदाज

मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडाव्याची कार्य व कर्तव्य लक्षात घेता उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे ठराव क्र. १८४ दिनांक ३०/०८/२००६ अन्वये खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : १३,८१,५४,०००/–

**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : १३,८१,५४,०००/–

उपरोक्त दर्शविलेल्या एकुण अंदाजात रुपये ४,९९,००,०००/– शासकीय अनुदान अपेक्षित असुन उर्वरित रक्कम रुपये ७,५७,२४,०००/– महानगरपालिकेकडून महापालिका अनुदान म्हणून अदा करावयाची असल्याने ती ही तरतुद करण्यात आली होती.

शिक्षण मंडळाचे सन २००६ – २००७ चे सुधारित अंदाजपत्रक व २००७ – २००८ चे मुळ अंदाजपत्रक, आयुक्तांचे महानगरपालिकेसाठी सन २००६–२००७ चे सुधारीत अंदाजपत्रक, सन २००७–२००८ चे जमा–खर्चाचे अंदाज, कर वाढीचे प्रस्ताव व प्रशासनाकडून तपशिलवार माहिती घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार स्थायी समितीने पुढीलप्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले आहे.

## महानगरपालिकेचे सन २००६ – ०७ चे सुधारित अंदाजपत्रक :

उत्पन्न : १२१.४५ कोटी

खर्च : ११५.६७ कोटी

अखेरची शिल्लक : ५.७८ कोटी

## महानगरपालिकेचे सन २००७ – ०८ चे मुळ अंदाजपत्रक :

प्रशासनातर्फे सन २००७ – २००८ करिता **उत्पन्न रु. ३१९.७६ कोटी व खर्च रु. ४०५.२६ कोटी** चे सादर करण्यात आलेल्या अंदाजात स्थायी समितीने पुढील प्रमाणे फेरफार करुन अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले आहे.

| पान क्र. | INCOME / उत्पन्न (Commissioner's Est.) | | ३१९७६२१ | EXPENDITURE / खर्च (Commissioner's Est.) | | ४०५२६२३ | पान क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जकात | + | ४४७०० | अ अंदाजपत्रक ( अ–१ सामान्य प्रशासन) ( १ ते २७) | – | ५६५६ | ११ ,१२ व १३ |
| ०२ | सर्व साधारण कर | + | १३८००० | रजा प्रवास भत्ता | – | ५०० | १३ |
| ०२ | महापालिका शिक्षण कर | + | २७००० | अधिका–यांना वाहन भत्ता | – | २०० | १४ |
| ०२ | वृक्ष कर | + | ३००० | कार्यालयीन विदयूत साहित्य बसविणे व दुरुस्ती | – | १००० | १५ |
| ०२ | पथ कर | + | ३३००० | संगणकीकरण खर्च | – | ७०० | १५ |
| ०९ | शिक्षण कर | + | ४५००० | वाहने दुरुस्ती व निगा | – | २०० | १६ |
| ०९ | रोजगार हमी कर | + | ६००० | इतर आकस्मिक खर्च (अग्निशमन सेवादल) | + | ५० | १७ |
| ३६ | पाणी पट्टी | + | ५००० | जंतुनाशक खरेदी | – – | १५०० | १७ |
| ३६ | पाणी पुरवठा लाभ कर | + | १५००० | पर्यावरण सनियंत्रन | – | ५०० | १७ |
| ३६ | मल प्रवाह सुविधा लाभकर | + | ६००० | श्वान निर्बिजीकरण | – | १५०० | १९ |
| ३६ | मल प्रवाह कर | + | २७००० | पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण | + | १५०० | २० |
| ३६ | विशेष मल प्रवाह कर | + | १३०० | महिला व बालकल्याण | + + + + + + | १००० | २० |
| ३६ | पाणी बिले वसूली (कर) | + | १७०००० | इतर सांस्कृतिक कार्यक्रम व इतर खर्च | + + + | ५०० | २० |
| ३६ | पाणी बिले वसूली (पा.पु.) | + | १९०००० | रस्ते दुरुस्ती व निगा ( अ–अंदाज) (प्र.स. क्र.–१ ) | + | ९५० | २२ |
| ०३ | विकास शुल्क | + | १५००० | रस्ते दुरुस्ती व निगा ( अ–अंदाज) (प्र.स. क्र.–२ ) | + | ९५० | २२ |
| ०४ | रस्ते खोदाई फी | + | ५००० | रस्ते दुरुस्ती व निगा ( अ–अंदाज) (प्र.स. क्र.–३ ) | + | ९५० | २२ |
| | | | | रस्ते दुरुस्ती व निगा ( अ–अंदाज) (प्र.स. क्र.–४) | + | ९५० | २३ |
| | | | | क्रिडा खर्च | + | १००० | २४ |
| | | | | कार्योलयीन कामासाठी भाडे तत्वावरील वाहनाचा खर्च | – | २१०० | २४ |
| | | | | संगणक व संगणक साहित्य खरेदी | – | १००० | २५ |
| | | | | नविन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | – | ५०० | २५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | साफसफाई साहित्य खरेदी | – | ५०० | २६ |
| | | | | नगरसेवक निधीतून विकास कार्य | + | ८१०० | २८ |
| | | | | शिक्षण कर परतावा | + | ४५००० | ३२ |
| | | | | रोजगार हमी कर परतावा | + | ६००० | ३२ |
| | | | | एम.आय.डी.सी पाणी पुरवठा बिले | – | ११०४०८ | ४३ |
| | | | | एम.आय.डी.सी थकबाकी | – | ५९५०० | ४३ |
| | | | | ड्रेनेज पंप प्लांट, ड्रेनेज पंप स्टेशन देखभाल व दुरुस्ती खर्च | – | ८०० | ४४ |
| | | | | ड्रेनेज पंप प्लांट, ड्रेनेज पंप स्टेशन व अन्य, मल नि:सारण इमारती विदयूत व टेलिफोन बीले | – | १००० | ४४ |
| | | | | भुयारी गटार जोडणी साहित्य खरेदी व बसविणे | – | ५०० | ४५ |
| | | | | भुयारी गटार निगा | – | २००० | ४५ |
| | | | | सार्वजनिक नाला व गटार दुरुस्ती | – | ५०० | ४५ |
| | | | | कुपनलिका /जेट पंप बसविणे खर्च | + | ५०० | ४९ |
| | | | | स्वतंत्र पाणी पुरवठा योजना | – | ५००० | ४९ |
| | | | | ड्रेनेज पंप प्लांट, ड्रेनेज पंप स्टेशन उपकरणे व साहित्य खरेदी | – | ५०० | ५० |
| | | | | भुयारी गटार जोडणी साहित्य खरेदी व बसविणे खर्च ( नविन) | – | ५०० | ५० |
| | | | | सार्वजनिक नाला व गटार बांधणी | + | ५०० | ५० |
| | | | | जे.एन.एन.यु.आर.एन. अंतर्गत विकास कार्य (जल नि :सारण खाते ) | + | २९५६ | ५० |
| | TOTAL / एकूण | | ३९२ ८६२१ | TOTAL / एकूण | | ३९२६९६५ | |
| | | | | CL. BALANCE / अखेरची शिल्लक | | १६५६ | |

**<u>शिक्षण मंडळाचे सन २००७ – ०८ चे मुळ अंदाजपत्रक. :</u>**

मागील ३ वर्षात शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेला उत्पन्न व खर्चाचा आढावा घेवून वर्ष २००७ –०८ चे अंदाज पुढीलप्रमाणे सुधारित करण्याचे स्थायी समितीने शिफारीश केली आहे.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १२,६९,१५,५८०/–**

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ११,६७,७१,३८४/—

अखेरची शिल्लक : १,०१,४४,१९६/—

उपरोक्त अंदाजात रक्कम रुपये ६,३०,२७,०००/— महानगरपालिकेकडून अनुदान व शासकिय अनुदान म्हणून रक्कम रु. ५,३७,४४,३८४/— मंजूर करण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

सन २००६ — ०७ चे सुधारित अंदाज

शिक्षण मंडळाचे वर्ष २००६ — ०७ करिता मुळ अंदाजपत्रकिय तरतुद, जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात उपलब्ध करुन देण्यात आलेला प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तिय परिस्थिती लक्षात घेता शिक्षण मंडळाचे वर्ष २००६ — ०७ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे स्थायी समितीने शिफारीश केली आहे.

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १०,३५,३९,५३९ /—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ९,४३,०५,२४६ /—

अखेरची शिल्लक : ९२,३४,२९३/—

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ४,९९,३१,७०३/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्याची शिफारीश करण्यात आली आहे.

विविध कर व दराचा प्रस्ताव :—

१) पाणी टॅंकर भाडे :—

पाणी टॅंकर भाडयाची प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

२) मालमत्ता कर :—

मालमत्ता कराच्या दरात पुढील प्रमाणे वाढ करण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

| | तपशिल | प्रचलीत दर | प्रस्तावीत दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | पाणी पट्टी | निरंक | १० टक्के | फक्त अनिवासी वापर होत असलेल्या मिळकती ज्यामध्ये नळजोडणी नाही |
| २) | पाणी पुरवठा लाभ कर | ३ टक्के | १० टक्के | फक्त अनिवासी वापर होत असलेल्या मिळकतींसाठी . |

३) पाणी पट्टी दर :—

पाणी पट्टीच्या दरात पुढीलप्रमाणे वाढ करण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

१ . बांधकामाच्या स्वरुपाप्रमाणे :

| अ क्र | बांधकामाचे स्वरुप | सन २००६—२००७ चे प्रचलीत दर | उत्पन्न | सन् २००७—२००८ साठी स्थायी समितीने | उत्पन्न | वाढ |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | शिफारिश केलेले दर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सदनीका | दर | रक्कम | | सदनीका | दर | रक्कम | |
| १ | आर सी सी व टीअर गर्डर बांधकाम. | रु. १०० प्रतिमहा रु. १२०० प्रतिवर्ष | ४११४१ | १२०० | ४९३६९२०० | रु. २२५ प्रतिमहा रु. २७०० प्रतिवर्ष | ४११४१ | २७०० | १११०८०७०० | ६१७११५०० |
| २ | पत्र्याचे छत व विट बांधकाम | रु. ५० प्रतिमहा रु. ६०० प्रतिवर्ष | ६१८४३ | ६०० | ३७१०५८०० | रु. १२५ प्रतिमहा रु. १५०० प्रतिवर्ष | ६१८४३ | १५०० | ९२७६४५०० | ५५६५८७०० |
| ३ | झोपडपट्टी धारक (लफाटा किंवा पत्र्याचे किंवा मातीचे झोपडे) | रु. ४० प्रतिमहा रु. ४८० प्रतिवर्ष | १४१०६ | ४८० | ६७७०८८० | रु. १०० प्रतिमहा रु. १२०० प्रतिवर्ष | १४१०६ | १२०० | १६९२७२०० | १०१५६३२० |
| | एकुण उत्पन्न :— | | | | ९३२४५८८० | एकुण उत्पन्न :— | | | २२०७७२४०० | १२७५२६५२० |

२ . मीटरव्दारे पाणी पुरवठा :

जे नळ जोडणी धारक मिटरद्वारे मोजणी करून पाणी पुरविण्याची मागणी करतील, अशा निवासी / अनिवासी नळजोडणीसाठी पुढील प्रमाणे दर मान्य करण्यास शिफारिश करण्यात आली आहे .

| अ क्र | वापराचा प्रकार | दर प्रति १००० लिटर | |
|---|---|---|---|
| | | प्रचलित दर (रूपये) | स्थायी समितीने शिफारिश केलेले दर (रूपये) |
| १ | निवासी | ९/— | १२/— |
| २ | अ निवासी अ) वाणिज्य | २४/— | २६/— |
| | ब) औद्योगिक | २४/— | २६/— |
| | क) सार्वजनिक संस्था | १२/— | १५/— |

अ) मिटर चालू स्थितीत प्रति महा किमान आकारणी

| | | वाणिज्य | | घरगुती | | विशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | व्यास (मी. मी.) | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावीत दर |
| १ | १५ | ४३२ | ४६८ | १२२ | १६२ | १६२ | २०३ |
| २ | २० | ७९५ | ८६१ | २२३ | ३०० | २९८ | ३७५ |
| ३ | २५ | ११५२ | १२४८ | ३२४ | ४३२ | ४३२ | ५४० |
| ४ | ३२ | १७२८ | १८७२ | ४८६ | ६४८ | ६४८ | ८१० |
| ५ | ४० | ३०२४ | ३२७६ | ८५० | ११४० | ११३४ | १४२५ |
| ६ | ५० | ३८१९ | ४१३७ | १०७४ | १४४० | १४३२ | १८०० |
| ७ | ६५ | ४६८३ | ५०७३ | १३१७ | १८०० | १७५६ | २१९० |

ब) मिटर नादुरूस्त स्थितीत किमान आकारणी—

| | | वाणिज्य | | घरगुती | | विशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क | व्यास (मी.मी.) | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावीत दर | प्रचलित दर | प्रस्तावीत दर |
| १ | १५ | ६४८ | ७०२ | १६२ | २१६ | २५० | ३१५ |
| २ | २० | १२०० | १३०० | २६७ | ३६० | ४६२ | ५७८ |
| ३ | २५ | १७२८ | १८७२ | ४३२ | ५७६ | ६७२ | ८४० |
| ४ | ३२ | ३१३१ | ३३८० | ७८३ | १०४४ | १२१९ | १५३० |
| ५ | ४० | ४५३३ | ४९४० | ११३४ | १५१२ | १७६६ | २२४० |
| ६ | ५० | ५६०० | ६०५८ | १५९४ | २१६० | २००० | २४७५ |
| ७ | ६५ | ६२६० | ६७६० | १७५६ | २३४० | २४३८ | ३०४८ |

नवीन नळ जोडणी करणे किंवा खंडीत करण्यात आलेल्या नळ जोडणीची पुर्नजोडणी करणे यासाठी खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात मजुंरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | आकार (मी.मी.) | नवीन नळ जोडणी | | नळसंयोजकांची जोडणी व तोडणी | | खडडा् खोदणे | | रस्ता खोदाई खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रचलीत | प्रस्तावीत | प्रचलीत | प्रस्तावीत | प्रचलीत | प्रस्तावीत | |
| १ | १५ | ४० | १०० | ४० | १०० | ७०० | १००० | अ) प्रति मिटर रू ३५०/— कच्च्या रस्त्यासाठी ब) प्रति मिटर रू ७००/— डांबरी रस्त्यांसाठी क) प्रतिमिटर रू १५००/— कॉक्रिट रस्त्यांसाठी |
| २ | २० | ४५ | १५० | ४५ | १५० | ७०० | १००० | |
| ३ | २५ | ५० | २०० | ५० | २०० | ७०० | १००० | |
| ४ | ४० | ६० | ३०० | ६० | ३०० | ७०० | १००० | |
| ५ | ५० | ५० मी.मी.किंवा त्यापेक्षा जास्त प्रत्येक संयोजकाच्या स्थितीनुसार अंदाजित केल्या प्रमाणे ५०० | | | | ७०० | १००० | |

नळ जोडणी अनामत रक्कम :—

| अ. क्र. | आकार | घरगुती वापरासाठी दर | | बिगर घरगुती वापरासाठी दर | | सार्वजनिक संस्था व सरकारी संस्था दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रचलीत | प्रस्तावीत | प्रचलीत | प्रस्तावीत | प्रचलीत | प्रस्तावीत |
| १ | १५ मि.मि. | ५०० | १००० | २००० | ४००० | १००० | २००० |
| २ | २० मि.मि. | ९०० | १८०० | ३६०० | ६००० | १८०० | ३६०० |
| ३ | २५ मि.मि. | १३०० | ३००० | ५२०० | १०००० | २६०० | ५२०० |
| ४ | ४० मि.मि. | ३४०० | ७५०० | १३६०० | २०००० | ६८०० | १२००० |
| ५ | ५० मि.मि.व त्यापेक्षा जास्त | ४३०० | ९००० | १७२०० | ३०००० | ८६०० | १६००० |
| | | प्रत्येक जलवाहिनीच्या वाहनधारक क्षमतेच्या तीन किंवा त्यापेक्षा जास्त महिन्याच्या देयकावर आधारित | | | | | |

मीटर तपासणी फी :—

| अ. क्र. | नळ जाडणीचा आकार | तपासणी फी | | संयोजकावरुन मीटर काढण्याचे शुल्क | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रचलीत (रूपये) | प्रस्तावीत (रूपये) | प्रचलीत (रूपये) | प्रस्तावीत (रूपये) |
| १ | १५ मि.मि. | ४० | १०० | ३० | १०० |
| २ | २० मि.मि. | ४५ | १५० | ४० | १५० |
| ३ | २५ मि.मि. | ५० | २०० | ४० | २०० |
| ४ | ४० मि.मि. | ६० | ३०० | ५० | ३०० |
| ५ | ५० मि.मि. | ७० | ५०० | ६० | ५०० |
| ६ | ८० मि.मि. | १०० | ५०० | ७० | ५०० |
| ७ | १०० मि.मि. ते ३०० मि.मि पर्यत | ३०० | | १५० | |

४) जकात दर :—

शहरात आयत होणा—या जकात पात्र मालाच्या खालील गटात दर वाढ मंजूर करण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

| वस्तु गट क्र. | वस्तुचे नांव | किमान दर (%) | कमाल दर (%) | प्रचलित दर (%) | प्रशासना मार्फत प्रस्तावित दर (%) | स्थायी समितीने शिफारीस केलेले दर | अंदाजित वार्षिक वाढीव उत्पन्न | चालू वित्तीय वर्षात अंदाजित वाढीव उत्पन्न (१/८/०७ ते ३१/३/०८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६१ | लोकर ,रेशमी, लिनल, ताग, कापूस, कृत्रिम व सिन्थेटिक वस्तुचे कापड इ. | ०.५० | २.०० | १.८० | २.०० | २.०० | २०९ | १३९ |
| ५३ क | लेसस, टेप्स, लकडी व धातूच्या रिंगण ...इ. | ०.५० | ४.०० | २.६० | ४.०० | ३.५० | १९४ | १२९ |
| ७१ | लोखंड व पोलाद | ०.५० | ४.०० | ३.२० | ४.०० | ४.०० | ८९ | ५९ |
| ४० ब | सर्व प्रकारचे रसायने, सोडियम सल्फेट ... इ. | ०.५० | ४.०० | ३.४५ | ४.०० | ४.०० | ३८ | २५ |
| ७७ | अलोद धातू म्हणजेच पितळ, तांबे टिन इ.... | ०.५० | ४.०० | १.५० | ४.०० | २.५० | १४२ | ९५ |
| | एकूण | | | | | | ६७२ | ४४७ |

५) विविध विभागामार्फत देण्यात येणा—या सेवाचा दर :—

विविध विभागामार्फत पुरविणा—यात येणा—या सेवाचा दरात पुढीलाप्रमाणे मान्य करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | प्रचलित सेवा शुल्क रुपये. | प्रशासनामार्फत सेवा शुल्क रुपये. | स्थायी समितीने शिफारिश केलेले सेवा शुल्क |
|---|---|---|---|---|
| | जन्म मृत्यू नोंदणी विभाग | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **Birth & Death Registration** | | | |
| १ | जन्म दाखला<br>**Issue of Birth Certificate** | ७ | २० | २० |
| २ | मृत्यू दाखला<br>**Issue of Death Certificate** | ५ | २० | २० |
| ३ | जन्म नोंदणीच्या माहितीत बदल करणे<br>**Correction in Birth Certificate** | ७ | २० | २० |
| ४ | मृत्यु नोंदणीच्या माहितीत बदल करणे<br>**Correction in Death Certificate** | ५ | २० | २० |
| ५ | अंत्यविधी दाखला<br>**Issue of Cremation Certificate** | ५ | २० | २० |
| ६ | जन्म नोंद अनुपलब्धतेचा दाखला<br>**Non Availability Certificate for Birth Registration** | ७ | २० | २० |
| ७ | मृत्यू नोंद अनुपलब्धतेचा दाखला | ५ | २० | २० |
| | **Non Availability Certificate for Death Registration** | | | |
| | पाणीपुरवठा विभाग<br>**Water Supply Department** | | | |
| १ | थकबाकी नसल्याचा दाखला मिळणेबाबत<br>**No dues certificate of Water Tax** | ० | २० | २० |
| २ | ड्रेनेज कनेक्शन परवानगी मिळणेबाबत<br>**Permission for Drainage Connection** | ० | ५०० | ५०० |
| ३ | पाणीकराचे डुप्लीकेट बिल देणे.<br>**Duplicate copy of Water bill** | ० | १० | १० |
| | नगररचना विभाग<br>**Town Planning Department** | | | |
| १ | जोता पुर्णत्वाचा दाखला<br>**Plinth Completion Certificate** | ० | ५०० | २००० |
| २ | इमारत बांधकाम पुर्णत्वाचा/वापर परवाना<br>**Issue of Construction Completion Certificate / Use Permission** | ० | ५०० | ३००० |
| ३ | हस्तांतरणीय विकास हक्क वर्ग करणे<br>**Transfer / Allocation / Handing over of "TDR"** | ० | ५०० | रु. ५/— प्रति चौ.फु. |
| ४ | रस्ता रुंदीकरणाने बाधीत झालेल्या जागेचे दाखले<br>**Certificate of area-affected in the road widening** | ० | ५०० | निरंक |
| ५ | विकास योजनेचा भाग नकाशा<br>**Issue of part map of development plan** | २५० | ५०० | ५०० |
| ६ | बांधकाम मंजूरी व पुर्णतेच्या दाखल्यांच्या सत्यप्रती | १०० | २५० | २५० |
| | **Issue of true copies of Construction Permission / Completion Certificate** | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | विशिष्ट भूखंडाबाबत विकासयोजना तरतूदीचा अभिप्राय<br>**Issue of Development Plan provisions and remarks (For specific piece of land)** | ० | ५०० | ५०० |
| ८ | अंतराचा दाखला<br>**Issue of Distance Certificate** | ० | ५०० | निरंक |
| ९ | विजेच्या पुरवठयासाठी ना हरकत दाखला<br>**NOC for obtaining Electric Supply** | २००० | ५००० | ५००० |
| १० | अभियंता / पर्यवेक्षक परवाना<br>**License for Engineer/ Supervisor** | २५० | ५००० | ५००० |
| ११ | अभियंता / पर्यवेक्षक परवाना नुतनीकरण<br>**Renewal Of Engineer / Supervisor License** | २५० | २५०० | २५०० |
| १२ | प्रस्तवित ठिकाणी व्यवसाय अनुज्ञेय असल्याबाबत दाखला<br>**Certificate regarding - "Business permissible at proposed location"** | ० | १००० | १००० |
| १३ | वापर बदल किंवा विशिष्ट वापरासाठी नाहरकत दाखला<br>**NOC for specific use or change in use** | ० | ५००० | १) आरसीसी बांधकाम असलेल्या मिळकती व औदयोगिक वापर होत असलेल्या मिळकतींसाठी रुपये ५०००/–<br>२) इतर सर्व मिळकतींसाठी रु. ५००/– |
| १४ | तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचेकडुन जमीन मोजणीकरीता नाहरकत दाखला<br>**NOC for measurement of land from TILR** | ० | ५०० | ५०० |
| १५ | इमारत दुरूस्त परवाना मिळणेबाबत<br>**Permission For Repair / Renovation Of Building / Property** | ५०० | १००० | १००० |
| | मालमत्ता कर विभाग<br>**Property Tax Department** | | | |
| १ | वारसा हक्काने मिळकती हस्तांतरण करणे<br>**Change of Name (with heredity) for the purpose of primary liability to property tax** | **2% of R.V.** | किमान रू.२००<br>कमाल २: वि त्पटप | किमान रू.२००<br>कमाल **2% of R.V.** |
| २ | वारसाहक्का व्यतिरीक्त मिळकती हस्तांतरण करण्यास परवानगी मिळणेबाबत<br>**Change of Name for the purpose of primary liability to property tax** | **2% of R.V.** | किमान रू.२००<br>कमाल **2% of R.V.** | किमान रू.२००<br>कमाल **2% of R.V.** |
| ३ | थकबाकी नसल्याचा दाखला<br>**No dues certificate of Property Tax** | ० | २० | २० |
| ४ | मिळकतीचा उतारा मिळणेबाबत<br>**Extract of Property** | २ | २० | २० |
| ५ | मिळकत कराचे डुप्लीकेट बिल देणे.<br>**Duplicate copy of Property Tax bill** | ० | १० | १० |
| ६ | चित्रपट गृट कर<br>**Show Tax** | रु.१० व १२/– प्रति शो. | रु. ५० /– प्रति शो | रु. १००/– प्रति शो. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बाजार परवाना विभाग<br>**Market License Department** | | | |
| १ | ट्रेड / व्यवसाय / साठा / परवाना (लायसन्स) मिळणेबाबत.<br>**License for Trade / Business / Storage** | १०० | ५०० | ५०० |
| २ | परवाना रद्द करणे<br>**Cancellation of License** | ० | १०० | १०० |
| ३ | नामनिर्देशनानुसार परवाना हस्तांतरीत करणे<br>**Transfer Of License by Nomination** | ० | २५० | २५० |
| ४ | विक्रीने, भागीदारीने किंवा इतर मार्गाने परवाना हस्तांतरण<br>**Transfer Of License by Selling / Partnership Deed / Other than Nomination** | ० | २५० | २५० |
| ५ | सर्व प्रकारचे परवाने/ परवानग्या नूतनीकरण (१ वर्षांनी) करणेबाबत (मार्केट विभागाशी संबंधित)<br>**Renewal Of All Type of Licenses (After Every 1 Year - Related to Market Department)** | ० | २५० | २५० |
| ६ | व्यवसायाच्या जागेचे क्षेत्रफळात /वजनांत/परिमाणांत मध्ये वाढ/घट करणे.<br>**Increase or Decrease in Area of business premises / Weight / Quantities / Etc.** | ० | २५० | २५० |
| ७ | दिलेल्या परवान्यात भागीदार समाविष्ट करणे किंवा भागीदार कमी करणे<br>**Add or Remove the partners in the issued license** | ० | २५० | २५० |
| ८ | लायसेन्सची डुप्लीकेट प्रत.<br>**Issue Of Duplicate Copy Of Market License** | ० | ५०० | ५०० |
| ९ | विविध ना हरकत दाखले व परवानग्या मिळणेबाबत (मार्केट विभागाशी संबंधीत)<br>**Various NOC & Permissions from Market Department** | ० | ५०० | ५०० |
| १० | सार्वजनिक जागेत /रस्त्यावर हस्तव्यवसायातील कौशल्याच्या उपयोगासाठी परवाना (लायसन्स) मिळणेबाबत.<br>**License for handicrafts/handiworks at public place / road side** | ० | १०० | १०० |
| ११ | फेरीने माल विकणेसाठी परवाना (लायसन्स) मिळणेबाबत.<br>**License for hawkers/street vendors** | ० | १०० | १०० |
| | मालमत्ता विभाग<br>**Estate Department** | | | |
| १ | रस्त्यावरील मंडपाबाबत नाहरकत दाखला<br>**Issue of No Objection Certificate for Installing / Erecting Pendals on road** | ० | २५० | २५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अग्निशमन विभाग<br>**Fire Brigade Department** | | | |
| १ | विविध व्यवसायांकरिता अग्निशमन दलाचा ना हरकत दाखला<br>**NOC for various businesses** | ० | १५० | १५० |
| २ | विविध व्यवसायांकरिता अग्निशमन दलाच्या ना हरकत दाखल्यांचे नूतनीकरण करणेबाबत<br>**Renewal of NOC for various businesses** | ० | १०० | १०० |
| ३ | बहुमजली इमारत बांधुन झाल्यावर अग्निशमन दलाचा अंतिम नाहरकत दाखला मिळणेबाबत.<br>**NOC after completion of construction of multi-storied building** | ० | ५००० | ५००० |
| ४ | जळीताचा दाखला<br>**Fire Occurrence Certificate** | ० | १५० | १५० |
| ५ | बहुमजली इमारत बांधण्यासाठी अग्निशमन दलाचा नाहरकत दाखला मिळणेबाबत.<br>**NOC for construction of multi-storied building** | ० | २५०० | २५०० |
| | उद्यान व वृक्ष संवर्धन<br>**Garden & Tree Development** | | | |
| १ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम, १९७५ अन्वये झाड तोडणे अथवा छाटणे करीता परवानगी मिळणेबाबत.<br>**Permission for cutting & trimming trees** | ० | २५० | २५० |
| | सार्वजनिक आरोग्य विभाग<br>**Public Health Department** | | | |
| १ | अन्ननिर्मिती संबंधी ना हरकत दाखला<br>**NOC for various businesses related to food** | ० | ५०० | ५०० |

६) वर्ष २००५ – २००६ व २००६ – २००७ चे लेखा विवरणपत्र :–

प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेले वर्ष २००५ – ०६ व २००६ – ०७ चे लेखा विवरण व कर्जाचा तपशिल इत्यादी बाबतची माहिती नोंद करण्यात आली आहे

७) वर्ष २००५ – २००६ व २००६ – २००७ मध्ये अर्थसहाय्य देवून पुरविण्यात आलेल्या सेवाबाबतचा अहवाल :–

प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेले वर्ष २००५ – ०६ व २००६ – ०७ मध्ये अर्थसहाय्य देवून पुरविण्यात आलेल्या सेवाबाबतचा तपशिल विचारात घेवून हा अर्थसहाय्य महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून कायम ठेवण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

८) पाणी पुरवठा व भुयारी गटार योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उभारलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी मुदत वाढ मिळणेबाबत.

थकीत रक्कम एक रक्कमी देण्यास महानगरपालिकेस शक्य नाही त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत व खुल्या बाजारातुन उभारलेल्या कर्ज परतफेड कालावधी पुढील दहा वर्षासाठी व आयुर्विमा विमा महामडंळामार्फत उभारलेल्या कर्ज परतफेड कालावधी पुढील पाच वर्षासाठी वाढविण्यास व विलंब शुल्क आकार माफ करण्यास शासनास विनंती करण्यासाठी

प्रस्ताव मजूंर करण्यास शिफारिश करण्यात आली आहे. थकीत कर्जासाठी देय असलेला व्याज दर हा कर्ज मजुंर करताना लावलेले दर किंवा प्रचलित दर या दोन्हीपैकी कमी असलेल्या व्याज दराने आकारणी करण्यासाठी ही शासनास विनंती करणेसाठी शिफारिश करण्यात आली आहे.

महासभा ठराव क्रमांक : ३६ दिनांक : ३०/०७/२००७

सुचकाचे नांव : श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नांव : श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींच्या अधिन राहुन, लेखा विवरण पत्र व अर्थसहाय्य देवुन पाणी पुरवठा सेवांबाबतचा अहवाल विचारात घेवुन स्थायी समितीने ठराव क्रमांक ३३ दिनांक १७/७/२००७ अन्वये महापालिकेस सादर केलेल्या सन २००७–०८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजास व सन २००६–०७ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास काही फेरफारांसह अंतिम स्विकृती देत आहे.

विविध कर व दराचा प्रस्ताव :–

१) पाणी पट्टी दर :–

स्थायी समितीने शिफारिश केलेल्या पाणी पट्टीच्या दरात पुढीलप्रमाणे फेरफार करण्यात येत आहे.

अ. बांधकामाच्या स्वरुपाप्रमाणे :

| अ क्र | बांधकामाचे स्वरुप | सन २००६–२००७ चे प्रचलीत दर | उत्पन्न | | | सन् २००७–२००८ साठी मंजूर दर | उत्पन्न | | | वाढ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सदनीका | दर | रक्कम | | सदनीका | दर | रक्कम | |
| १ | आर सी सी व टीअर गर्डर बांधकाम. | रु. १०० प्रतिमहा रु. १२०० प्रतिवर्ष | ४११४१ | १२०० | ४९३६९२०० | रु. १५० प्रतिमहा रु १८०० प्रतिवर्ष | ४११४१ | १८०० | ७४०५३८०० | २४६८४६०० |
| २ | पत्र्याचे छत व विट बांधकाम | रु. ५० प्रतिमहा रु. ६०० प्रतिवर्ष | ६१८४३ | ६०० | ३७१०५८०० | रु.७५ प्रतिमहा रु.९०० प्रतिवर्ष | ६१८४३ | ९०० | ५५६५८७०० | १८५५२९०० |
| ३ | झोपडपट्टीधारक (लफाटा किंवा पत्र्याचे किंवा मातीचे झोपडे) | रु. ४० प्रतिमहा रु. ४८० प्रतिवर्ष | १४१०६ | ४८० | ६७७०८८० | रु.६० प्रतिमहा रु.७२० प्रतिवर्ष | १४१०६ | ७२० | १०१५६३२० | ३३८५४४० |
| | एकुण उत्पन्न :– | | | | ९३२४५८८० | एकुण उत्पन्न :– | | | १३९८६८८२० | ४६६२२९४० |

ब . मीटरव्दारे पाणी पुरवठा :

जे नळ जोडणी धारक मिटरद्वारे मोजणी करून पाणी पुरविण्याची मागणी करतील, अशा निवासी / अनिवासी नळजोडणीसाठी दरात स्थायी समितीच्या शिफारिश प्रमाणे वाढ मान्य करण्यात येत आहे .

२) <u>जकात दर :—</u>

शहरात आयत होणा—या जकात पात्र मालाच्या ५ गटात स्थायी समितीच्या शिफारशीप्रमाणे दर वाढ मंजूर करण्यात येत आहे.

दिनांक १८ जानेवारी २००७ पासून १ वर्षाच्या कालावधीसाठी जकात वसुलीकरिता खाजगी अभिकर्ताची नेमणूक करण्यात आली आहे. उपरोक्त प्रस्तावित दराच्या वाढीमुळे होणा—या वाढीव उत्पन्न जकात अभिकर्त्याककडून कराराच्या उर्वरीत कालावधीसाठी वसुल करण्यात यावी.

३) <u>विविध विभागामार्फत देण्यात येणा—या सेवाचा दर :—</u>

विविध विभागामार्फत पुरविणा—यात येणा—या सेवाचा खालील बाबीत फेरफराच्या आधीन राहून इतर सर्व बाबीच्या दरात स्थायी समितीच्या शिफारशिप्रमाणे दर वाढ मान्य करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | प्रचलित सेवा शुल्क रुपये. | प्रशासनामार्फत प्रस्तावित सेवा शुल्क रुपये. | स्थायी समिती मार्फत शिफारिश करण्यात आलेले सेवा शुल्क | महासभेने अंतिम रित्या मान्य केलेले शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| १ | मृत्यू दाखला<br>**Issue of Death Certificate** | ५ | २० | २० | निरकं |
| २ | जोता पुर्णत्वाचा दाखला<br>**Plinth Completion Certificate** | ० | ५०० | २००० | ५००० |
| ३ | इमारत बांधकाम पुर्णत्वाचा/वापर परवाना<br>**Issue of Construction Completion Certificate / Use Permission** | ० | ५०० | ३००० | ५००० |
| ४ | चित्रपट गृट कर<br>**Show Tax** | रु.१० व १२/— प्रति शो. | रु. ५० /— प्रति शो | रु. ५० /— प्रति शो | रु. १०० /— प्रति शो |

४) <u>मालमत्ता कर :—</u>

मालमत्ता कराच्या दरात शिफारीश करण्यात आली कर वाढ अमान्य करण्यात येत आहे.

५) <u>अर्थसहाय्य देवून पुरविण्यात येणा—या सेवा</u>

सन २००५—०६ व २००६—०७ करीता महापालिकेच्या उपलब्ध निधीतुन अर्थसहाय्य देवुन पाणी पुरवठा सेवा देणे कायम राहिल.

६) <u>वर्ष २००५ — २००६ व २००६ — २००७ चे लेखा विवरणपत्र :—</u>

प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेले वर्ष २००५ — ०६ व २००६ — ०७ चे लेखा विवरण व कर्जाचा तपशिल इत्यादी बाबतची माहिती नोंद करण्यात येत आहे

७) <u>पाणी पुरवठा व भुयारी गटार योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उभारलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी मुदत वाढ मिळणेबाबत.</u>

थकीत रक्कम एक रक्कमी देण्यास महानगरपालिकेस शक्य नाही त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत व खुल्या बाजारातुन उभारलेल्या कर्ज परतफेड कालावधी पुढील दहा वर्षासाठी व आयुर्विमा विमा महामडंळामार्फत उभारलेल्या कर्ज परतफेड कालावधी पुढील पाच वर्षासाठी वाढविण्यास व विलंब शुल्क आकार माफ करण्यास

शासनास विनंती करण्यासाठी प्रस्ताव मजूंर करण्यास शिफारिश करण्यात येत आहे. थकीत कर्जासाठी देय असलेला व्याज दर हा कर्ज मजुंर करताना लावलेले दर किंवा प्रचलित दर या दोन्हीपैकी कमी असलेल्या व्याज दराने आकारणी करण्यासाठी ही शासनास विनंती करणेसाठी मंजुरी देण्यात येत आहे.

८) महानगरपालिकेचे सन २००६–०७ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज

सन २००६–०७ करीता उत्पन्न रु १२१.४५ कोटी व खर्च रु ११५.६७ कोटी च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज अंतिम असेल.

९) महानगरपालिकेचे सन २००७ – ०८ चे मुळ अंदाजपत्रक

स्थायी समितीने सन २००७–०८ साठी शिफारीश केलेल्या रु ३९२.८६ कोटीचे उत्पन्न व रु. ३९२.६९ कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाज पुढीलप्रमाणे फेरफारांसह अंतिम असेल.

| पान क्र. | उत्पन्नाचे लेखा शिर्ष | रु. ३९२८६२१ (स्थायी समिति अंदाज) | खर्चाचे लेखा शिर्ष | रु. ३९२६९६५ (स्थायी समिती अंदाज) | पान क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ३६ | पाणी बिले वसुली (पा.पु.) | + ५००० | बुस्टर पंपीग मशीनरी खरेदी | + ५००० | ४९ |
| | एकुण :– | ३९३३६२१ | | ३९३१९६५ | |
| | | | अखेरची शिल्लक :– | १६५६ | |

१०) शिक्षण मंडळाचे सन २००६–०७ चे सुधारित व २००७ – ०८ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज

महापालिका शिक्षण मंडळाचे सन २००६–०७ चे सुधारित व २००७ – ०८ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीच्या शिफारशीप्रमाणे मंजूर करीत आहे.

वरील सर्व बाबींच्या तरतुदीच्या प्रयोजनासाठी उक्त अंदाजपत्रक छापुन प्रत्येक पालिका सदस्यास त्याची प्रत पाठवण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानले जाईल. तसेच अंदाजपत्रक ठरावाच्या दिनांकापासून अमंलात येईल.

सुचकाची सही /–
अनुमोदकाची सही /–

बहुमताने

महापौर / पिठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.३५ वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका